



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय


■ अमरावती, रविवार ५ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४






# डोनाल्ड ट्रम्प चवताळले !

## इराणला इशारा 48 तासांत होर्मुज उघडा; ऐकले नाही तर उध्वस्त करू





**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला पुन्हा एकदा मोठा इशारा दिला आहे. होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी दिलेली मुदत पाळली नाही तर इराणवर भयंकर संकट कोसळेल, असे ट्रम्प म्हणाले आहेत. होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यासाठी ट्रम्प यांनी ६ एप्रिलची मुदत दिली होती. ही मुदत जवळ येत असून आता वेळ निघून जात आहे, अशी आठवण त्यांनी करून दिली आहे.

ट्रुथ सोशल मीडियावर ट्रम्प यांनी काही वेळेपूर्वी पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी इराणवर मोठा हल्ला होणार असल्याचे संकेत दिले आहेत. विशेष म्हणजे, शुक्रवारी इराणने अमेरिकेची दोन लढाउ विमाने पाडली असल्याचा दावा केला. विमानातील काही कर्मचा-यांना कैद केल्याचे इराणी लष्कराने म्हटले. तसेच या कर्मचा-यांना वाचविण्यासाठी आलेल्या अमेरिकन लष्कराच्या ब्लॅक हाक या हेलिकॉप्टरवरही इराणने हल्ला केला. ट्रम्प यांनी पोस्टमध्ये त्यांनी लिहिले, तुम्हाला आठवत असेल तर मी इराणला सांगितले होते की, करार करा किंवा होर्मुझ सामुद्रधुनी खुली करा. यासाठी त्यांना दहा दिवसांची मुदत दिली होती. ही वेळ आता संपत आली आहे. पुढच्या ४८ तासांत त्यांच्यावर आता नरकासमान आपत्ती कोसळेल. देवाचा विजय असो! राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड जे. ट्रम्प.

यापूर्वी ट्रम्प यांनी इराणबरोबर सुरू असलेल्या चर्चेबद्दल आशावाद व्यक्त केला होता. होर्मुझच्या सामुद्रधुनीचा जलमार्ग खुला करण्यासाठीची अंतिम मुदत १० दिवसांनी वाढवून त्यांनी ६ एप्रिल केली होती. २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर हल्ला केल्यानंतर त्यांनी होर्मुझ सामुद्रधुनीचा मार्ग रोखला. या मार्गातून जागतिक उर्जा पुरवठ्यापैकी सुमारे २० टक्के वाहतूक होत असते. हा मार्ग बंद झाल्यामुळे जागतिक उर्जा टंचाई निर्माण झाली आहे.

ट्रम्प वारंवार आपली विधाने बदलत असतात. काही दिवसांपूर्वीच त्यांनी होर्मुझ बंद राहिली तरी चालेल, पण युद्ध थांबवा, असे विधान केले होते. वाल स्ट्रीट जर्नलने प्रशासकीय अधिका-यांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या सहका-यांना सांगितले आहे की, होर्मुझची सामुद्रधुनी बंद राहिली तरीही ते इराणविरुद्धची लष्करी मोहीम थांबवण्यास तयार आहेत. या अहवालानुसार, ट्रम्प हे आधी युद्ध संपवण्याचा आणि सामुद्रधुनी पुन्हा उघडण्याचा विचार नंतर करण्याचा विचार करत आहेत. यासाठी दुसरा पर्याय म्हणजे, हा सागरी मार्ग पुन्हा खुला करण्यासाठी आखाती देश आणि नाटो (NATO) सह मित्रराष्ट्रांना पुढाकार घेण्यास विनंती करणार आहेत.

## इराणचा अमेरिकी वैमानिकाच्या आईला संदेश

### तुमचा मुलगा ट्रम्प यांच्यापेक्षा आमच्याकडे जास्त सुरक्षित



**तेल अवीव/वृत्तसंस्था :** अमेरिका-इराण युद्ध अद्यापही सुरू आहे. या युद्धाला तब्बल एक महिना उलटला आहे. मात्र, अजूनही या युद्धाबाबत कोणताही तोडगा निघालेला नाही. अमेरिका-इराण युद्ध कधी थांबणार? की हे युद्ध आणखी भडकणार? याबाबत संभ्रमाचं वातावरण निर्माण झालं आहे. एकीकडे युद्धविरामाच्या चर्चा सुरू आहेत, तर दुसरीकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दररोज इराणला धमकी देत आहेत. यातच इराणने अमेरिकेचे दोन लढाउ विमाने पाडल्याची माहिती समोर आली आहे. इराणने एकाच दिवसात अमेरिकेची दोन लष्करी विमाने F-15 आणि A-10 पाडल्याचा आणि दोन ब्लॅक हाक हेलिकाप्टरवर हल्ला केल्याचा दावा केला आहे. त्यामुळे अमेरिकेला धक्का बसला आहे. इराणने अमेरिकेचे दोन लढाउ विमाने पाडल्याच्या या घटनेत अमेरिकन पायलटही बेपत्ता आहे. या बेपत्ता पायलटचा शोध सुरू आहे. ⇨(पान २ वर)

# कार विहिरीत कोसळून एकाच परिवारातील 9 जणांचा मृत्यू



**नाशिक/ प्रतिनिधी-** जिल्ह्यातील दिंडोरीमध्ये मध्यरात्री झालेल्या अपघाताने अक्षरशः काळीज पिळवटले आहे. शिवाजीनगर परिसरात एका मंगल कार्यालयात खासगी क्लासचे स्नेहसंमेलन आटोपून घरी इर्टिका कारने परतत असताना सदर कार जवळ असलेल्या शेतातील विहिरीमध्ये कोसळल्याने एकाच कुटुंबातील ९ जणांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शुक्रवारी (दि. ३) रात्री १० वाजेच्या सुमारास घडली. मृतांमध्ये ६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.मिळालेल्या माहितीनुसार, दिंडोरी शहरातील शिवाजीनगर भागात असलेल्या राजे बँक्वेट हालमध्ये एका खासगी क्लासचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनामध्ये शहरासह आसपासच्या गावांतील विद्यार्थी, त्यांचे पालक उपस्थित होते. रात्री १० च्या सुमारास स्नेहसंमेलन आटोपल्यानंतर इंदोरे, (ता. दिंडोरी) येथील दरगोडे कुटुंबियातील सदस्य इर्टिका कारने घरी परतण्यासाठी निघाले असता मंगल कार्यालयाजवळच शेतात असलेल्या एका विहिरीत सदर कार जाउन कोसळली आणि यामध्ये एकाच परिवारातील ९ जणांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे. अपघातात रेश्मा सुनील दरगुडे (वय २७),आशा अनिल दरगुडे (वय ३२), खुशी अनिल दरगुडे (वय १४), ४) श्रेयस अनिल दरगुडे (वय ११), ५) राखी सुनील दरगुडे (वय ११), ६) श्रावणी अनिल दरगुडे (वय ११), ७) समृद्धी राजेंद्र दरगुडे वय (वय ७), ८) माधुरी अनिल दरगुडे (वय १३), ९) सुनील दत्तू दरगुडे (वय ३२) चा मृत्यू झाला.या अपघाताने दरगुडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून सर्वत्र शोककळा पसरली आहे.

**मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ५ लाखांची मदत-** दरम्यान मंत्री नरहरी झिरवाळ आणि मंत्री गिरीश महाजन यांनी घटनास्थळी भेट देउन मृत कुटुंबियांच्या नातेवाईकांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. तसेच गिरीश महाजन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची फोनवर ५ मिनिटे चर्चा झाली. त्यानंतर विहीरमालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आणि मृतांच्या नातेवाईकांना ५ लाखांची मदत जाहीर केली असे मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

## कार कालव्यात बुडाली; 3 ठार

**पंढरपूर /प्रतिनिधी :** नाशकात कार विहिरीत पडल्याने मोठा अपघात झाला, त्या अपघातात ९ जण ठार झाले, ही घटना ताजी असतानाच इर्टिका कार कालव्यात पडल्याने ३ जणांचा मृत्यू झाला. ही घटना पंढरपूरच्या नातेपुते-निरा उजव्या कालव्यादरम्यान घडली. पंढरपूरच्या नातेपुतेजवळ नीरा उजवा कालव्याच्या पुलावरून एक इर्टिका गाडी अचानक कालव्यात पडली. ही कार मुंबईवरून फोंडशिरसकडे जात असताना थेट कालव्यात पडली आणि मोठा अपघात झाला. या घटनेची माहिती मिळताच गावक-यांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेतली. मात्र, ३ जणांना वाचवण्यात यश मिळाले नाही. ज्यावेळी कालव्यात कार पडली, त्यावेळी गाडीत चार जण असल्याची माहिती आहे. गाडीत असलेल्या तीन जणांचा मृत्यू झाला. गाडी कालव्यात पडल्यानंतर तिघेही गाडीतच अडकले होते. पाटबंधारे खात्याचे शाखाअधिकारी घटनास्थळी पहाटेपासून हजर ⇨(पान २ वर)

# दलबदलू आमदारांना मिळणार नाही पेन्शन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पक्षांतरबंदी कायद्यांतर्गत अपात्र ठरलेल्या आमदारांना यापुढे निवृत्तिवेतनाचा लाभ मिळणार नाही. दलबदलू आमदारांना निवृत्तिवेतन नाकारण्याची तरतूद करणारे विधेयक हिमाचल प्रदेश सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी मंजूर केले. त्यामुळे स्वतःच्या स्वार्थासाठी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात उडी मारणा-या आमदारांना दणका बसणार आहे. हिमाचल प्रदेश विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी हिमाचल प्रदेश विधानसभा (सदस्यांचे भत्ते आणि निवृत्तिवेतन) सुधारणा विधेयक, २०२६ मंजूर करण्यात आले. मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांनी मांडलेल्या या विधेयकाद्वारे आमदारांचे वेतन, भत्ते आणि निवृत्तिवेतन नियंत्रित करणा-या १९७१ च्या कायद्यात सुधारणा करण्यात आली आहे. नवीन तरतुदीनुसार पक्षांतर केल्यामुळे संविधानाच्या दहाव्या



अनुसूचीअंतर्गत अपात्र ठरलेला कोणताही आमदार यापुढे निवृत्तिवेतनाच्या लाभासाठी पात्र राहणार नाही. विधानसभेचे अध्यक्ष कुलदीप सिंह पठानिया यांनी या विधेयकाला समर्थन दिले आहे. हा निर्णय इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो तसेच लोकशाही बळकट करण्यासाठी आणि आमदारांना पक्षांतरापासून रोखण्यासाठी याचा फायदा होईल, असे पठानिया म्हणाले.

**आमदारांना पक्षांतरबंदी कायद्याचे भय उरले नाही**

आमदारांना पक्षांतरबंदी कायद्याचे भय उरले नाही. सध्याच्या कायद्यात आमदारांना पक्षांतरापासून परावृत्त करेल अशी तरतूद नाही. मतदारांच्या मतांचा आणि लोकशाहीचा सन्मान करण्यासह पक्षांतराला आळा घाण्यासाठी विधेयकात सुधारणा करण्यात आली आहे, असे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू विधानसभेत म्हणाले. भाजपसह विरोधी बाकावरील आमदारांनी विधेयकाला समर्थन न दिल्याने अशामुळे ऑपरेशन लोटसला बळ मिळते, अशी टीका सुखू यांनी केली.

# टोल प्लाझावर आता कॅशला नो एन्ट्री!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**राष्ट्रीय महामार्गावरून प्रवास करणा-या वाहनधारकांसाठी अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. येत्या १० एप्रिलपासून देशातील सर्व टोलनाक्यांवरील रोख (कॅश ) व्यवहार पूर्ण बंद करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.



यामुळे आता टोल प्लाझावर केवळ फास्टॅग, यूपीआयद्वारेच व्यवहार करता येतील. डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी व टोल नाक्यांवरील वाहतूककोंडी फोडण्यासाठी सरकारने हे पाउल उचलले आहे. देशातील सुमारे १,१५० टोल नाक्यांवर ही नवीन व्यवस्था लागू होणार आहे. यामुळे प्रवासाचा वेळ वाचणार असला, तरी वाढीव दरांमुळे सर्वसामान्यांच्या बजेटवर मात्र परिणाम होणार आहे. त्यामुळे १० एप्रिलपूर्वी फास्टॅग रिचार्ज करून ठेवणे वाहनधारकांसाठी हिताचे ठरेल. एकीकडे डिजिटल क्रांती होत असताना दुसरीकडे वाहनधारकांच्या खिशाला मात्र कात्री बसणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अर्थात एनएचएआय आणि उत्तर प्रदेश एक्स्प्रेस वे औद्योगिक विकास प्राधिकरणाने (यूपीईआयडीए) टोलच्या दरांमध्ये पुढीलप्रमाणे वाढ केली आहे. राष्ट्रीय महामार्ग : कार आणि प्रवासी वाहनांच्या टोलमध्ये १० टक्क्यांपर्यंत वाढ केली आहे.

# दमानियांना ‘सीडीआर’ पुरवतंय कोण?

## अशोक खरातच्या सीडीआरमध्ये भाजपचा एकही माणूस कसा नाही? -सुषमा अंधारेंचा सवाल

**मुंबई-**नाशिकचा भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणावरून महाराष्ट्रात मोठे राजकीय युद्ध सुरू झाले आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी खरातच्या मोबाईलचे काल डिटेल्स (CDR) बाहेर काढल्याने खळबळ उडाली असली, तरी विरोधकांना न मिळणारी गोपनीय माहिती दमानियांपर्यंत पोहोचतेच कशी? आणि या यादीत भाजपच्या एकाही नेत्याचे नाव का नाही? असा टोकदार सवाल शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे. शनिवारी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी



सरकार आणि तपास यंत्रणांना धारेवर धरले. सुषमा अंधारे यांनी अंजली दमानिया यांच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त केला. अंजली दमानियांनी खरातचे सीडीआर रेकार्ड बाहेर काढले ही चांगली गोष्ट आहे. पण ही गुप्त माहिती ⇨(पान २ वर)

# किडनी विकणा-या शेतक-याला हवे इच्छामरण

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** एक लाखाच्या कर्जापायी किडनी विकावी लागलेला हाच तो चंद्रपूरच्या नागभीडमधील शेतकरी रोशन कुडे... आता तर तो थेट इच्छामरणाची परवानगी मागतोय...आणि त्याला कारण ठरलंय अजुनही गळ्याभोवती कायम असलेला सावकारी विळखा...त्यातून बाहेर पडण्यासाठी किडनी विकल्यानंतरही सावकारानं बळकावलेली जमीन परत काही मिळालीच नाही... त्यामुळे रोशन कुडेने सरकार दरबारी धाव घेतली.. मात्र तिथंही त्याच्या पदरी पडली



अवहेलना..अनास्था.... आणि आश्वासनांचा पाउस.....त्यामुळेच उद्विग्न झालेल्या रोशन कुडे या शेतक-यानं आता थेट इच्छामरणाची परवानगी मागितलीय..

खरं तर रोशन कुडेनं खासगी सावकाराकडून शेतीसाठी १ लाख रुपयाचं कर्ज घेतलं होतं..आणि त्याबदल्यात तब्बल ७४ लाख रुपये परत केले... मात्र त्यानंतरही कर्ज काही फिटलं नाही... सावकारी तगादा सुरू च राहिला..अखेर त्यानं कंबोडियात जाउन आपली किडनी विकली... आणि कर्ज भरलं... मात्र यानंतरही सावकाराने बळकावलेली जमीन काही परत केलीच नाही... हे प्रकरण साम टीव्हीनं चव्हाट्यावर आणल्यानंतर त्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशनात तीव्र पडसाद उमटले.. आणि मुख्यमंत्र्यांनी खासगी सावकारावर कारवाईचे आदेश दिले...

**४ महिन्यांपासून रोशन कुडे न्यायासाठी सरकार दरबारी फे-या मारतोय...** मात्र पाषाण हृदयी प्रशासनाला काही पाझर फुटत नाही... आधी किडनी गेली.... त्यानंतर शेतीही गेली.. मग आता उपजिविकेचं साधनच नसल्यानं जगायचं तरी कशासाठी म्हणत रोशन हतबल झालाय..त्याने जिल्हाधिका-यांकडे थेट इच्छामरणाची परवानगी मागितलीय... मात्र प्रश्न उरतोय तो हा की, मुख्यमंत्र्यांनी आदेश देउनही त्यावर कारवाई का नाही.. ४ महिन्यांपासून न्यायासाठी रांगेत असलेल्या रोशनला न्याय मिळणार की नाही? खरंच प्रशासनातील संवेदनशीलता हरवली आहे का? याबरोबरच प्रशासन आता तरी परिस्थितीने हतबल झालेल्या शेतक-याला त्याची शेती परत करुन न्याय देणार आहे का? यावरुनच सरकारला शेतक-यांची खरच कदर आहे का हे स्पष्ट होईल...

# तिहेरी हत्याकांडाने नांदेड हादरले, गँगवारमधून घडला थरार

**नांदेड :** गँगवारमधील वर्चस्वातून नांदेड शहरात तिहेरी हत्याकांडाची घटना शनिवारी पहाटे घडली. यात एकाची निळा रोडलगतच्या कॅनल रोडवरील ई-स्क्वेअर परिसरात हत्या करण्यात आली तर खून का बदला खून असे म्हणत या मयत तरुणाच्या भावाने हल्ल्यात जखमी झालेल्या दोघांची शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असतानाचा चाकूने वार करून हत्या केली. या घटनेमुळे नांदेड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.प्राप्त माहितीनुसार नांदेड शहरालगतच्या कॅनल रोडवरील ई-स्क्वेअर परिसरात शुक्रवारी रात्री सय्यद आवेश सय्यद खलील आणि घनश्याम रेड्डी, मोहम्मद अरबाज यांच्यासह इतर अज्ञात आरोपींनी अर्जितसिंग चव्हाण यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला तर जखमी झालेल्या सय्यद अवेज व आणखी एका युवकास पोलिसांनी शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. यानंतर शनिवारी पहाटेच्या सुमारास मयत अर्जित सिंगच्या भावाने खून का बदला खून असे म्हणत रुग्णालयात जाउन जखमी सय्यद अवेस व मोहम्मद अरबाज या दोघांवर चाकूने हल्ला केला.यात दोघांचाही जागेवरच मृत्यू झाला. सदर घटना गँगवारमधून वर्चस्व गाजवण्याच्या वादामधून झाली असल्याची चर्चा होत आहे.

# पाठिंब्यासाठी सुनेत्रा पवारांचा उद्धव ठाकरेंना फोन

**बारामती / प्रतिनिधी-**बारामती आणि राहुरी मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आल्याचे पाहायला मिळत आहे. बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी महायुती प्रयत्नशील असली, तरीही महाविकास आघाडीतील काँग्रेस, उद्धवसेना विरोधात उमेदवार देण्याचा विचार करत आहेत. काँग्रेसने तर उमेदवारांच्या मुलाखतीही घेतल्या आहेत. यातच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना फोन करून पाठिंबा देण्याचे आवाहन केल्याचे वृत्त आहे. काँग्रेस पक्ष राहुरी आणि बारामती विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी आग्रही आहे, या दोन्ही



मतदारसंघांमध्ये उमेदवार देण्याच्या हालचालीही काँग्रेसने सुरू केल्या आहेत. बारामती विधानसभेची जागा रिक्त झाल्यानंतर आता येथे पोटनिवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असल्याचे काँग्रेसचे नेते प्रशांत जगताप यांनी स्पष्ट केले. काँग्रेसने कुठलीही घुसखोरी केलेली नाही. आम्ही या निवडणुकीकडे लोकशाहीच्या दृष्टीने पाहत आहोत. निवडणुकीत लोकशाही टिकली पाहिजे, ही काँग्रेसची भूमिका आहे, असे जगताप म्हणाले.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरेंना फोन केल्याचे समजते. सुनेत्रा पवार यांनी उद्धव ठाकरे यांना बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत पाठिंबा देण्याची विनंती केली असल्याचे म्हटले जात आहे. काँग्रेस पक्ष बारामती निवडणूक लढण्यावर ठाम असला तरी, काँग्रेस नेत्यांचा पाठिंबा मिळण्यासाठीही सुनेत्रा पवार प्रयत्न करणार असल्याचे सांगितले जात आहे. राहुरी आणि बारामतीसाठी २३ एप्रिलला मतदान होईल तर मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे. बारामती पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने सुनेत्रा पवार यांना पाठिंबा दिला आहे.

## हवाई सुंदरीची गळफास लावत आत्महत्या

**नागपूर/प्रतिनिधी :**कुटुंबाकडून विवाहासाठी तगादा लावला जात असल्याने तणावात आलेल्या हवाई सुंदरीने गळफास लावत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना लकडगंज परिसरात शनिवारी उघडकीस आली. लकडगंज परिसरातील सुखवस्तू कुटुंबात माखोरे पॅलेस येथे ही घटना घडल्याने हळहळ व्यक्त होत आहे. गायत्री उर्फ गौरी राजेंद्र बनसोड (२८) असे सदनिकेतच शुक्रवारी मध्यरात्री अडिचच्या सुमारास आत्महत्या केलेल्या हवाई सुंदरी तरुणीचे नाव आहे. पोलिसांनी ⇨(पान २ वर)



# मयूर सोळंकेच्या मृत्यूनंतर कुटुंबीयांचा आक्रोश

## अंतिम संस्कारच्या वेळी तिसऱ्या आरोपीच्या अटकेची मागणी

### -परिसरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त







अमरावती/प्रतिनिधीः-
गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या संतोषी नगर गार्डन जवळ २४ मार्चला दुपारी झालेल्या हल्ल्यात जखमी असलेल्या मयूर किशोर सोळंके (वय २१, खत्री कॉम्प्लेक्स) याचा उपचारादरम्यान शुक्रवारी रात्री मृत्यू झाला. त्यानंतर पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला. या प्रकरणात पूर्वीच अल्पवयीन आरोपीसह आदित्य पुनसे अटक आहे. एक आरोपी अजून फरार आहे. तिसऱ्या आरोपीला अटक करण्याच्या मागणीसाठी आज शनिवार ४ एप्रिल रोजी कुटुंबीयांनी आक्रोश व्यक्त केला. यामुळे परिसरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावण्यात आला. पोलीस बंदोबस्तात मयूर सोळंके वर अंतिम संस्कार करण्यात आले. त्यामुळे परिसरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. नातेवाईकांनी जबरदस्त आक्रोश येथे व्यक्त केला.

माहिती नुसार शोमेश जुगाणी विश्वकर्मा (वय २०,कॉटन मार्केट) हा २४ मार्च ला दुपारी मित्रांसह मेट्रो वाईन शॉपीमध्ये गेला होता, जिथे त्यांनी दारू पिली. त्यानंतर ते संतोष नगर परिसरातील गार्डन जवळ बसून चर्चा करत होते. यावेळी अचानक आरोपी सॉट्या, चिठ्ठया आणि इतर एक तेथे आले. तक्रार नुसार साट्या,चिठ्ठया जवळ चाकू होते. त्यांनी अचानक चाकूने हल्ला केला. यामुळे सोमेश विश्वकर्मा आणि त्यांचा एक मित्र तेथून पळाले. मृतक मयूर सोळंके त्यांच्या हातात लागला. त्यांनी त्याच्यावर चाकुने सपासप वार केले. या मुळे तो रक्त बोंबळ होऊन जमिनीवर कोसळला. मित्रांनी तत्काळ त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान मयूरचा शुक्रवारी रात्री मृत्यू झाला. त्यानंतर कुटुंबीयांनी रुग्णालयात आक्रोश केला. शनिवारी त्याच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी तिसऱ्या आरोपीच्या अटकेसाठी कुटुंबीय संतापले. त्यांनी पोलिसांकडे तात्काळ आरोपीच्या अटकेची मागणी केली. यामुळे परिसरात मोठा तणाव निर्माण झाला होता. प्रकरणाचे गांभीर्य पाहून विलास नगर ते कॉटन मार्केट मार्गावर पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावण्यात आला होता. पोलीस बंदोबस्तात त्याच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. तणावाची परिस्थिती यामुळे निर्माण झाली होती.

**रक्ताचा बदला रक्ताने-**
माहितीनुसार काही वर्षांपूर्वी शोभानगर मध्ये पॉल हत्याकांड झाले होते. या हत्याकांडात मयूर सोळंके सहभागी होता. यावेळी तो अल्पवयीन होता. अल्पवयीन असताना त्याच्यावर आणखीन काही गुन्हे दाखल आहे. यामुळे कोतवाली पोलिसांनी त्याला तडीपार घोषित केले आहे. काही दिवसापूर्वी तो कारागृहातून बाहेर आला होता. माहितीनुसार घटनाच्या दिवशीच तो सकाळी मुंबई वरून अमरावती आला होता. अशात आरोपींनी संधी साधत मित्राच्या रक्ताचा बदला मयूरच्या रक्ताने घेतला.

# बच्चू कडू नव्हे ते विंचू आहेत

## आमदार प्रवीण तायडे यांची पत्रकार परिषदेतून टीका



**अमरावती/प्रतिनिधीः-**
प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष व माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी राजकीय वैमनस्यातून आपल्याला अपघातात ठार मारण्याचा कट रचल्याची तक्रार भाजपचे आमदार प्रवीण तायडे यांचे चुलत बंधू अभिजीत तायडे यांनी दिल्यानंतर पोलिसांनी बच्चू कडू यांच्यासह तिघांविरूद्ध गुन्हा दाखल केला. त्या वरून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. बच्चू कडू यांनी या आरोपांचे खंडन केले असताना 'बच्चू कडू हे नाव नसून तो एक 'बिच्छू' (विंचू) आहे', अशी टीका आमदार प्रवीण तायडे यांनी आज शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेच्या माध्यमातून माजी मंत्री कडू यांच्यावर केली आहे.

आमदार तायडे यांचे चुलत बंधू अभिजीत तायडे यांना अपघाताचा बनाव करून ठार मारण्याचा कट या कथित ऑडिओ क्लिपमध्ये चर्चिला गेल्याचा दावा करण्यात आला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना तायडे म्हणाले की, राजकारणात वैचारिक मतभेद नवे नाहीत. पण, एखाद्याचा जीव घेण्याची भाषा बोलण्यापर्यंत मजल जाणे, हे धक्कादायक आहे. ही क्लिप समोर आली नसती, तर एका निष्पाप बालकाने आपले वडील गमावले असते. सुरक्षेच्या कारणास्तव सध्या अभिजीत तायडे यांना सक्रिय राजकारणापासून दूर राहण्याचा सल्ला दिल्याचेही त्यांनी नमूद केले.

**पराभव जिव्हारी लागल्याने हिसेंचा मार्ग-**
या वादाला केवळ गुन्हेगारी स्वरूप नसून त्याला अचलपूर मधील 'क्रेडिट वॉर'ची किनार आहे. गेल्या २० वर्षांत रखडलेला अमरावती-परतवाडा मार्ग, सिंचन प्रकल्प आणि एमआयडीसीचे प्रश्न मार्गी लागत असल्यामुळे बच्चू कडू अस्वस्थ झाल्याचा आरोप तायडे यांनी केला. फिनले मिल बंद पडणे आणि संत्री प्रक्रिया उद्योगात आलेले अपयश झाकण्यासाठी कडू आता हिंसेचा मार्ग अवलंबत आहेत. निवडणुकीतील पराभव हा कडू यांच्या जिव्हारी लागला असून मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांच्या पाठबळावर सुरू असलेल्या विकासकामांचा त्यांना हेवा वाटत आहे, असे तायडे म्हणाले.

**यवतमाळ व वणीच्या टोळ्यांचा उल्लेख-**
या प्रकरणी कथित ऑडिओ क्लिपमध्ये यवतमाळ आणि वणी येथील गुन्हेगारी टोळ्यांचा उल्लेख असल्याचे सांगण्यात येते. यावर भाष्य करताना तायडे यांनी या कथित टोळ्यांचे 'म्होरक्या' बच्चू कडू आहेत का, असा सवाल उपस्थित केला. ज्या ८० हजार मतदारांनी कडू यांचा पराभव केला, त्यांच्यावर कडू यांनी बॉम्ब टाकावा का?, असा सवालही त्यांनी विचारला. पत्रकार परिषदेला भाजपचे शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी, तुषार भारतीय आदी उपस्थित होते.

### कुटुंबीयांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर

आपल्या कुटुंबाच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करत आमदार प्रवीण तायडे म्हणाले 'ही क्लिप समोर आली नसती तर एखाद्या चार वर्षाच्या मुलानं वडील गमावला असता. मी तर आमदार आहे. मात्र, माझ्या चुलत भावाच्या आई-वडिलांना मी काय तोंड दाखवलं असतं? हा प्रकार समोर आल्यावर मी माझ्या भावाला सध्या राजकीय कामांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला.

### पोलीस तपासाची मागणी

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी. विशेष म्हणजे, या क्लिपमध्ये यवतमाळ जिल्ह्यातील टोळ्यांचा उल्लेख येतो. यवतमाळची टोळी, वणी येथील टोळी यासोबतच चाटू बाबांचा उल्लेखही आहे. या सर्व प्रकाराची चौकशी व्हायला हवी. ज्या टोळीचा उल्लेख ऑडिओ क्लिपमध्ये आहे त्या टोळीचा मोरक्या स्वतः बच्चू कडू आहेत का? याची देखील चौकशी व्हावी आणि गत वीस वर्षात या टोळीच्या माध्यमातून बच्चू कडू यांनी किती जणांना यमसदनी पाठवलं याची देखील चौकशी व्हावी. तसेच यांची सत्ता असताना त्यांनी या गोष्टी दडपून टाकल्यात का? याची देखील चौकशी व्हावी,' असं आमदार प्रवीण तायडे म्हणाले.

## १ व १० वरिल उर्वरित

### त्या पाचही आरोपींची ओळख

उमेश बेनीराम भोयर (वय ४७, सर्व रा. भानखेडा) यांचा समावेश आहे. घटनेनंतर काही तासांतच पोलिसांनी या सर्व आरोपींना अटक केली होती.

**जंगल परिसरात नेमके काय घडले-** मिळालेल्या माहितीनुसार, २८ मार्च रोजी सायंकाळी पीडित व तिचा मित्र भानखेडा फाटा परिसरातील जंगलाजवळ उभे असताना आरोपी तेथे आले. त्यांनी दोघांशी वाद घालत शिवीगाळ व मारहाण केली. एका आरोपीने पीडितेच्या मित्रावर काठीने हल्ला करून त्याला जंगल परिसरात ओढून नेले आणि मारहाण केली. या दरम्यान आरोपींनी दोघांकडील दोन मोबाईल फोन आणि १२० रुपये रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावून घेतली. यानंतर आरोपींपैकी एका व्यक्तीने पीडितेला बाजूला नेऊन तिच्यावर अत्याचार केला, तर इतर आरोपींनी तिच्या मित्राला दोरीने बांधून ठेवले. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी या घटनेचा व्हिडिओ बनवून तो व्हायरल करण्याची धमकीही दिल्याची माहिती समोर आली आहे.

### तिवसा जंगलात अनधिकृत

कार्यरत असल्याची चर्चा सुरू झाली असून वनविभागाने तपास अधिक तीव्र केला आहे. संबंधित व्यक्ती आणि संपूर्ण साखळीचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, जंगल क्षेत्रात वन्यजीवांचे मोठे वास्तव्य असतानाही अशा प्रकारचे खोदकाम झाल्याने पर्यावरण व वनसंपदेच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणी उपवनसंरक्षक अर्जुना के. आर. यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे वनविभागाने स्पष्ट केले आहे.

### दर्यापूर-दहीहांडा रोडसाठी

यांचे या रोडकडे होत असलेले दुर्लक्ष नागरिकांच्या निदर्शनास आणून दिल्याने हा चर्चेचा विषय बनला. दर्यापूर-दहीहांडा या रहदारीच्या रोडची दयनिय अवस्था झाली असून या रोडसाठी बऱ्याचदा सार्वजनिक बांधकाम विभाग,लोकप्रतिनिधीला निवेदन देऊन आंदोलनही केले. परंतु याकडे कुणीही लक्षच दिले नाही.

या रोडने शेतकरी, शेतमजूर, शालेय विद्यार्थी, प्रवासीवर्ग, वयोवृद्ध नागरिक यांची खुप मोठया प्रमाणता रहदारी असून अनेकवेळा छोटे मोठे अपघातही घडले आहेत. मात्र याकडे लोक प्रतिनिधी असलेले खासदार व आमदार यांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष चंदू रायबोले यांनी केला. लोकप्रतिनिधीचे होत असलेले दुर्लक्ष सर्वसामान्य नागरिकांना माहीत व्हावे यासाठी चंदू रायबोले यांनी स्वखर्चाने खासदार व आमदार यांचा दुर्लक्षपणा सर्वसामान्य जनतेच्या निदर्शनास आणून दिला.

### युवासेनेने फलक फाडले

प्रयत्न असल्याचा आरोप सागर गिरे यांनी केला. दर्यापूर दहीहांडा रस्त्यासाठी शासन स्तरावर दोन्ही लोकप्रतिनिधी यांनी अथक प्रयत्न केले असून लवकर या रस्त्याच्या कामाला सुरुवात होणार आहे.

### प्राणघातक हल्ल्याच्या गुन्ह्यात

मार्च २०२६ रोजी सायंकाळी घरासमोर वाहन उभे करण्याच्या किरकोळ कारणावरून सुरुवातीला वाद झाला होता. मात्र हा वाद रात्री उशिरा गंभीर वळणावर गेला. रात्री सुमारे ९ वाजता आरोपी आनंद आडोळे, त्यांची पत्नी सविता आडोळे, मुलगा सुमित उर्फ चुहा तसेच इतर साथीदारांनी फिर्यादींच्या घरात प्रवेश करून वाद घालत अचानक हल्ला चढवला. या वेळी चाकू आणि लाथाबुक्यांनी झालेल्या मारहाणीत दोन जण गंभीर जखमी झाले. या प्रकरणात फ्रेजरपुरा पोलिसांनी तात्काळ गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. घटनास्थळाचा पंचनामा, सीसीटीव्ही फुटेजची तपासणी तसेच गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींची ओळख पटवण्यात आली. त्यानंतर वेगाने हालचाल करत पोलिसांनी यश उर्फ चारू चरणदास मेश्राम (वय २१), सुमित उर्फ चुहा आनंद आडोळे (वय २२), आनंद नारायणराव आडोळे (वय ४४) आणि अखिल संतोष इंगळे (वय १९) यांना अटक केली आहे. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट, निरीक्षक निलेश गावंडे व डीबी पथक प्रमुख राहुल महाजन यांच्या पथकाने केली. दरम्यान, या प्रकरणातील इतर फरार आरोपींचा शोध सुरू असून पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस करीत आहेत.

### भटक्या श्वानाला अमानुष

शोरूममधील वस्तूंचे नुकसान करतो,' असे सांगण्यात आले. मात्र, याबाबत महानगरपालिकेकडे तक्रार का करण्यात आली नाही, या प्रश्नावर त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. घटनेनंतर जखमी श्वान पुन्हा त्या परिसरात दिसून न आल्याने त्याच्या जीविताबाबत शंका व्यक्त केली जात आहे. या प्रकरणामुळे प्राणी संरक्षण आणि भटक्या प्राण्यांबाबत संवेदनशीलतेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी कार्तिक गोले यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी आरोपी वॉचमन लक्ष्मण नेवारे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### गोवंश तस्करीचा डाव उधळला

मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी एमएच ४३ / डी ६५६१ क्रमांकाची पांढऱ्या रंगाची तवेरा गाडी आढळून आली. वाहनाचा पुढील टायर पंक्चर होता आणि चालक घटनास्थळावरून फरार झाला होता. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता आतमध्ये चार बैल आणि तीन गायी अत्यंत अमानुष पद्धतीने कोंबून ठेवलेल्या अवस्थेत आढळून आल्या. सर्व जनावरांचे पाय व तोंड बांधलेले होते. या प्रकाराची गंभीर दखल घेत पोलिसांनी पंचांना बोलावून पंचनामा केला आणि सर्व ७ गोवंशांची सुटका केली. सुटका करण्यात आलेल्या जनावरांची किंमत सुमारे ९५ हजार रुपये तर जप्त वाहनाची किंमत ३ लाख ५० हजार रुपये असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यानंतर वैद्यकीय तपासणी करून जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक ज्योती देवकते यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

### खारी गावात आगीचे तांडव

शर्थीचे प्रयत्न करत पाण्याचा मारा केला आणि आगीवर नियंत्रण मिळवले. वेळेवर मदत पोहोचल्यामुळे आगीचा प्रसार थांबला आणि संपूर्ण वस्ती भस्मसात होण्यापासून वाचली. या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, बाधित कुटुंबांवर मोठा आर्थिक आघात झाला आहे. सध्या या कुटुंबांकडे राहण्यासाठी छप्परही उरलेले नाही. 'आगीत आमचे सर्वस्व नष्ट झाले आहे. खाण्यासाठी धान्य आणि अंगावरच्या कपड्यांशिवाय काहीही उरले नाही. प्रशासनाने तातडीने पंचनामा करून आर्थिक मदत द्यावी,' अशी मागणी पीडितांनी केली आहे.

आगीची तीव्रता लक्षात घेता यंत्रणांनी तत्परता दाखवली. खारी ग्रामपंचायतीने तात्काळ पाण्याचा टँकर उपलब्ध करून दिला, तर धारणी नगर पंचायतीच्या अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करत आग आटोक्यात आणली. मदत वेळेवर पोहोचल्यामुळे मोठी जीवितहानी टळली आणि आगीचा विस्तार रोखण्यात यश आले. मात्र, आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले असून बाधित कुटुंबे सध्या शासकीय मदतीच्या प्रतीक्षेत आहेत.

# या.द.व. देशमुख महाविद्यालयात ६ एप्रिल ला राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**तिवसा/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारा संचालित या. द. व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा येथील इतिहास विभागाच्या वतीने 'उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेचा उद्घाटन समारंभ सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या ग्रंथालय सभागृहात संपन्न होणार आहे.

या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी दिलीपराव इंगोले, कोषाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती राहणार असून उद्घाटन डॉ. मिलिंद बारहाते, कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख बीजभाषक म्हणून डॉ. ए. बी. मराठे ,कुलपती नामनिर्देशित सल्लागार मंडळ सदस्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून हेमंत काळमेघ, कार्यकारी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती तसेच डॉ. रवींद्र कडू, व्यवस्थापन परिषद सदस्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ उपस्थित राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून सुरेश जे. खोटरे व प्राचार्य डॉ. दीपक धोटे यांची उपस्थिती लाभणार आहे.

या परिषदेअंतर्गत विविध सत्रांमध्ये संशोधनपर लेख सादरीकरण, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, तसेच विज्ञान, वाणिज्य, व्यवस्थापन, मानवशास्त्र आणि आंतरशाखीय विषयांवरील चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारनंतर विविध सत्रांमध्ये संशोधकांना आपले संशोधन सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सायंकाळी ४.३० वाजता समारोप समारंभ आयोजित करण्यात आला असून या प्रसंगी प्राचार्य डॉ. महेंद्र ढोरे प्र-कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ प्रमुख अतिथी म्हणून तर समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख उपस्थित राहणार आहेत.

या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन व इतर सत्रांसाठी विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख तसेच संयोजक डॉ. के. जी. सोनटक्के व सर्व प्राध्यापक वृंद यांनी केले आहे.

### एसटी चालकाच्या सतर्कतेने

एसटी चालकाने प्रसंगावधान राखून तात्काळ ब्रेक लावला. यामुळे बस मध्ये बसलेले शालेय विद्यार्थी प्रवासी आणि नागरिकांचे प्राण वाचले. घटनेनंतर काही काळासाठी प्रवाशांमध्ये दहशत निर्माण झाली होती. नागरिकांनी प्रशासनाच्या निष्काळजीपणाच्या विरोधात आक्रोश व्यक्त केला. महसूल आणि पोलीस विभागाच्या वतीने अवैध गौण खनिजची वाहतूक करणाऱ्या वाहनावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी या घटनेनंतर करण्यात आली.

### एलपीजी ट्रकमधून

चालक म्हणून कार्यरत आहेत. २ एप्रिल रोजी दुपारी त्यांनी ट्रक टिपू सुलतान मार्केट परिसरात, फायर ब्रिगेड कार्यालयाजवळ उभा करून घरी गेले होते. मात्र दुसऱ्या दिवशी पहाटे सुमारे ४ वाजता ते ट्रकजवळ परत आल्यानंतर ही चोरी उघडकीस आली. ट्रकचे मागील लोखंडी फाटक उघडे असून कुलूप तोडल्याचे दिसून आले. आत पाहणी केली असता इंडियन ऑईल कंपनीचे १६ भरलेले एलपीजी सिलेंडर गायब असल्याचे स्पष्ट झाले. या घटनेत अंदाजे ६० हजारांहून अधिक किमतीचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केल्याचे समोर आले आहे. चोरी रात्रीच्या सुमारास झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. घटनेनंतर तक्रार दाखल होताच गाडगे नगर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा नोंदवला असून तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात असून आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके कार्यरत आहेत. दरम्यान, सतत घडणाऱ्या अशा चोरीच्या घटनांमुळे शहरातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### अज्ञात वाहनाची दुचाकीला

नागपूर वरून अमरावतीच्या दिशेने जाणाऱ्या अज्ञात कारने कोहळे यांच्या दुचाकीला वणी ममदापूर फाट्यावर जबर धडक दिली.ज्यात कोहळे हे गंभीर जखमी झाले.अपघातानंतर जखमी ला सोडून कारचालकाने पळ काढला.मात्र काही नागरिकांनी रक्तबंबाळ अवस्थेत रोडवर पडलेल्या नीलकंठ कोहळे यांना तिवसा ग्रामीण रुग्णालयात व नंतर अमरावती येथे उपचारार्थ दाखल केले.याप्रकरणी तिवसा पोलिसांनी अज्ञात कार चालकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत

झाले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आणि मृतक कोल्ह्याचा मृतदेह पोस्टमार्टम साठी घेऊन गेले. रात्रीच्या वेळेस ही घटना घडली पण नागरिकांनी याकडे लक्ष दिले नाही. रात्रीच्या अंधारात कोल्हा आणि श्वानामध्ये फरक न वाटल्याने कोल्हा रात्रभर तिथेच पडला राहिला आणि यातच त्याचा मृत्यू झाला असल्याची माहिती आहे. वन विभाग अज्ञात वाहन चालकाचा शोध घेत आहे.

### दमानियांना 'सीडीआर' पुरवतंय

त्यांना पुरवतंय कोण? असा सवाल अंधारे यांनी केला. दमानिया म्हणतात की तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी खरातला १७ कॉल केले होते. त्यांचा रोख एकनाथ शिंदेंच्या दिशेने आहे. मात्र, ज्यांनी खरातच्या इशान्येश्वर मंदिराला पर्यटन स्थळाचा दर्जा दिला आणि १ कोटींचा निधी मंजूर केला, त्यांच्या कालचा रेकार्ड का समोर आला नाही? या यादीत भाजपच्या एकाही नेत्याचे नाव नसणे ही मोठी गडबड वाटते, असेही सुषमा अंधारे म्हणाल्या. अशोक खरातच्या संपत्तीची आणि त्याच्या संपर्कातील लोकांची चौकशी करण्यासाठी स्थापन झालेल्या एसआयटीकडून (SIT) अद्याप कोणतीही ठोस माहिती समोर का आली नाही? असा सवाल सुषमा अंधारे यांनी विचारला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात आश्वासन दिले होते, मग अद्याप गमे, आवारे आणि पोफळे यांना ताब्यात का घेण्यात आले नाही? एसआरए खात्यातील अधिकारी भांडे तिथे काय करत होते? सरकारला हे प्रकरण तडीला न्यायचे आहे की फक्त काही लोकांना राजकीयदृष्ट्या डॅमेज करायचे आहे? असा घणाघात अंधारे यांनी केला

### कार कालव्यात बुडाली;

आहेत. यासोबतच अनेक अधिकारीही घटनास्थळी आहेत.

पोकलेनद्वारे गाडी कुठे अडकली हे शोधले जात आहे. गाडीतील प्रवासी मूळचे सातारा जिल्ह्यातील दुधबावी येथील असल्याची माहिती मिळत आहे. ते मुंबई येथे नोकरीनिमित्त स्थायिक झाले होते. फोंडशिरस येथे येत असताना आज पहाटे हा अपघात झाला. अपघातानंतर मोठा आवाज आल्याचेही सांगितले जाते. ही घटना पहाटे पाचच्या सुमारास घडली. गाडीचालक सुनील टिळेकर हा अपघातामध्ये बचावला असल्याची माहिती मिळत आहे. या गाडीमध्ये सुनील टिळेकर याची पत्नी, सासू आणि सासरे होते, ते तिघेही मयत झाले. गाडी कालव्यातून काढण्यात आली आहे. मात्र, या अपघातानंतर सर्वांनाच मोठा धक्का बसला. अपघात नक्की कसा झाला याबाबत पोलिसांकडून अधिकचा तपास केला जात आहे.

### इराणचा अमेरिकी वैमानिकाच्या

अमेरिकेसह इराणदेखील त्याचा शोध घेत आहे. दरम्यान, या बेपत्ता पायलटच्या आईने सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर केली होती. त्यामध्ये ती आपल्या मुलाच्या सुरक्षिततेसाठी प्रार्थना करत असल्याचं दिसून आलं. त्या अमेरिकी महिलेच्या भावनिक पोस्टवर इराणने आता प्रतिक्रिया दिली. तुमचा मुलगा ट्रम्प यांच्यापेक्षा आमच्याकडे जास्त सुरक्षित आहे, असं एका पोस्टमध्ये इराणने म्हटलं आहे. तुमच्या मुलाला इराणी कैदेपेक्षा जास्त धोका अमेरिकेत ट्रम्प यांच्यासोबत राहण्यात आहे. त्यामुळे तुम्ही प्रार्थना करा की तो अमेरिकेच्या बचाव पथकाला सापडू नये. तो इराणी कैदेतच राहो. कारण मुस्लिम आणि सुसंस्कृत इराणी लोकांना ताब्यात असलेल्या कैद्यांशी कसं वागावं हे माहिती आहे, असं इराणी दूतावासाने सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.इराणने पाडलेल्या विमानांच्या पायलटसाठी प्रार्थना करण्याचं आवाहन एका अमेरिकी महिलेने सोशल मीडियावर केलं होतं. त्या पोस्टमध्ये तिने म्हटलं की, माझा एक मुलगा लढाउ पायलट आहे आणि मला अजून त्याच्याकडून किंवा त्याच्या युनिटकडून काहीही माहिती कळलेली नाही. त्यामुळे मला चिंता वाटत आहे. कृपया सर्व वैमानिक आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी प्रार्थना करा असं अमेरिकन महिलेने म्हटलं होतं.

इराणने अमेरिकेची विमाने कशी पाडली?

अमेरिकेची विमाने कशी पाडली, हे इराणने अद्याप उघड केलेले नाही. तरी विश्लेषकांच्या मते, हे माजिद इन्फ्रारेड हवाई संरक्षण प्रणाली किंवा खांद्यावरून डागता येणारी क्षेपणास्त्रे वापरून विमानांना लक्ष्य केले असावे. ज्यांचा शोध घेणे कठीण असते. १९ मार्च रोजी अमेरिकेचे सर्वात प्रगत स्टेल्थ लढाउ विमान असलेल्या एफ-३५ वर हल्ला झाला होता. या हल्ल्यामागे जमिनीवरून हवेत मारा करणा-या माजिद प्रणालीचाच हात असल्याचे मानले जाते.

### हवाई सुंदरीची गळफास

दिलेल्या माहितीनुसार गायत्रीचे वडील राजेंद्र हे हॉटेल व्यावसायिक आहेत. हवाई सुंदरी अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घेतल्यानंतर गायत्री एका विमान कंपनीतीही सेवा देत होती. दरम्यान तिची एका डॉक्टर तरुणाशी ओळख झाली. दोघांमध्ये प्रेम झाले. गायत्रीने कुटुंबाला डॉक्टर तरुणाबद्दल माहिती दिली. कुटुंबाचा देखील तिच्या प्रेमाला विरोध नव्हता. मात्र कुटुंबाकडून विवाहाचा आग्रह धरला जात असल्याने गायत्री तणावात होती. दरम्यान कुटुंबिय शुक्रवारी सायंकाळी भंडारा येथे नातेवाईकांकडे गेले. रात्री दोनच्या सुमारास गायत्रीने डॉक्टर मित्राला भ्रमणदूरध्वनीवरून संपर्क केला. बोलता बोलता आक्रमक झालेल्या गायत्रीने आपण जीव देणार असल्याचे सांगितले.

**पाहिजे**

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
--पत्ता--
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड,
अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/
८००७३४२३३५

अकोला । वाशिम । बुलडाणा

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

■ रविवार, ५ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# ज्वेलर्स संचालकाकडून त्या ७०० ग्राम गहाण सोन्याचे गूढ अद्याप कायमच

## परवाना आहे का ? मर्यादा किती ? आणि 'त्या' ज्वेलर्सला आश्रय कुणाचा ? शहरात नानाविध चर्चांना आले उधाण

■ **समीर ठाकूर** ■

*अकोला : नेकलेस रोडवरील ७०० ग्रॅम गहाण सोन्याच्या कथित विल्हेवाटीच्या प्रकरणाने आता केवळ ग्राहक–ज्वेलर्स वादाच्या पलीकडे जात गंभीर कायदेशीर आणि प्रशासकीय प्रश्न निर्माण केले आहेत. भाग १ आणि भाग २ मध्ये उघड झालेल्या धक्कादायक तपशीलांनंतर आता या संपूर्ण व्यवहाराच्या वैधतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले असून, 'हा व्यवसाय नियमांनुसार चालतोय की मनमानीने ?' असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.*

सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संबंधित ज्वेलर्स संचालकाकडे गहाण व्यवहार (पॉन ब्रोकिंग) करण्यासाठी अधिकृत परवाना आहे का? असल्यास, त्या परवान्याची आर्थिक मर्यादा किती आहे? ५० लाख रुपयांसारखा मोठा व्यवहार करण्याची परवानगी त्यांना आहे का? की नियमांना हरताळ फासून बेकायदेशीररित्या कोट्यवधींचे व्यवहार सुरू आहेत? जर परवाना नसेल, तर हा प्रकार थेट बेकायदेशीर आर्थिक व्यवहारांच्या अर्थात अनुचित व्यापाराच्या कक्षेत येतो. आणि परवाना असूनही मर्यादा ओलांडली असेल, तर तीही गंभीर उल्लंघनाची बाब ठरते.

दरम्यान, या प्रकरणात आणखी एक धक्कादायक मुद्दा समोर येत आहे की इतक्या गंभीर आरोपांनंतरही संबंधित ज्वेलर्स संचालकाविरोधात कोणतीही ठोस कारवाई अद्याप का झालेली नाही? 'या मागे कुणाचा राजकीय किंवा प्रशासकीय आश्रय आहे का?' असा थेट सवाल आता नागरिकांकडून विचारला जात आहे.

स्थानिक पातळीवर प्रभावशाली व्यक्तींचे पाठबळ असल्यामुळेच कारवाईला विलंब होत आहे का? की काही 'साखळी' कार्यरत आहे? या संशयामुळेच प्रकरण अधिकच गडद होत चालले आहे.

या संपूर्ण घडामोडींचा सर्वात मोठा फटका बसत आहे तो प्रामाणिक सराफा व्यावसायिकांना. एका



ज्वेलर्सच्या कथित गैरप्रकारामुळे संपूर्ण बाजारपेठेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण असून, 'कोणावर विश्वास ठेवायचा?' असा प्रश्न उपस्थित होत आहे.

याच पार्श्वभूमीवर आता सराफा असोसिएशनची भूमिका निर्णायक ठरणार आहे. संबंधित ज्वेलर्सविरोधात अंतर्गत चौकशी होणार का? दोष सिद्ध झाल्यास सदस्यत्वावर कारवाई केली जाणार का? की असोसिएशनही मौन बाळगणार? प्रामाणिक व्यावसायिकांची प्रतिमा वाचवण्यासाठी असोसिएशन पुढे येणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, ग्राहक पोलिसांत तक्रार दाखल करण्याच्या तयारीत असून, हे प्रकरण लवकरच फौजदारी गुन्ह्यांच्या चौकटीत जाण्याची शक्यता आहे.

एकीकडे 'आयकर धाडीचा दावा', दुसरीकडे 'पर्यायी सोने देण्याचा प्रस्ताव', आणि आता 'परवान्याचा प्रश्न' या सगळ्या विसंगतींमुळे संशय अधिकच बळावत आहे.

आता या प्रकरणात प्रशासन, पोलिस आणि संबंधित यंत्रणा किती वेगाने आणि किती निष्पक्षपणे कारवाई करतात, यावरच पुढील घडामोडी अवलंबून असणार आहेत.

### परवाना की बेकायदेशीर व्यवहार? उत्तर देणार कोण?

गहाण व्यवहारासाठी शासनाचा अधिकृत परवाना आवश्यक असतो. संबंधित ज्वेलर्सकडे तो आहे का? असल्यास, व्यवहाराची मर्यादा किती? ५० लाखांचा व्यवहार त्या चौकटीत बसतो का? या प्रश्नांची उत्तरे अद्याप गुलदस्त्यातच आहेत.

### सराफा असोसिएशनची भुमिका गुलदस्त्यात

एका घटनेमुळे संपूर्ण बाजारपेठेची प्रतिमा धोक्यात. असोसिएशन चौकशी करणार का? दोषींवर कारवाई होणार का? की 'मौन'च कायम राहणार?

प्रामाणिक व्यावसायिकांच्या सन्मानासाठी ठोस भूमिका घेणे आता गरजेचे ठरत आहे.

---

# रिसोडमध्ये बीएलओला बेदम मारहाण
## आरोपींवर कठोर कारवाईची मागणी



■ **प्रतिनिधी | रिसोड** ■

निवडणूक आयोगाच्या मतदार यादी पुनर्निरीक्षण कार्यक्रमा अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात एसआयआर प्रक्रिया सुरू आहे. मतदारांची मॅपिंग प्रक्रिया सुरू असून शहर व तालुक्यात बिरो सदर काम करत आहेत. शहरात 'एस. आय. आर.' (SIR) मॅपिंगचे काम करत असलेल्या एका बीएलओला (BLO) बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना आज, ३ मार्च रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास घडली. या हल्ल्यात नवनाथ पांडुरंग बोंडे (वय ४३) हे गंभीर जखमी झाले असून, या घटनेमुळे शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नवनाथ बोंडे हे रिसोड शहरात आपल्या नेमून दिलेल्या क्षेत्रात एस.आय.आर. मॅपिंगचे शासकीय काम करत होते. सकाळी ११ वाजेच्या सुमारास ते कर्तव्यावर असताना त्यांच्यावर अचानक हल्ला करण्यात आला. या मारहाणीत बोंडे यांच्या शरीराला गंभीर जखमा झाल्या आहेत. घटनेनंतर जखमी अवस्थेत बोंडे यांना तातडीने रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी वाशिम येथील जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

### बीएलओंमध्ये भीतीचे सावट

सध्या सर्वत्र निवडणूक विभागाच्या वतीने महत्त्वाची कामे सुरू आहेत. अशा परिस्थितीत भरदिवसा एका कर्मचाऱ्यावर झालेल्या हल्ल्यामुळे मॅपिंगचे काम करणाऱ्या इतर बीएलओंमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. 'आम्ही सुरक्षित नसू असा सवाल कर्मचाऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. या भ्याड हल्ल्याचा निषेध करत, एस.आय.आर. मॅपिंग करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांनी सुरक्षिततेची मागणी केली आहे. दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशा मागणीचे निवेदन बीएलओ चे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्याकडे सोपविले व या संदर्भात कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

---

# विकासासाठी ५ हजार कोटींची मागणी; वृक्षसंवर्धनासाठी सागर कोकास आक्रमक



■ **प्रतिनिधी | वाशिम** ■

वाशिम मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा 'आप'चे नेते सागर कोकास यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे तब्बल ५,००० कोटींच्या विशेष विकास निधीची मागणी केली आहे. यासोबतच पर्यावरण रक्षणाच्या मुद्द्यावरही त्यांनी आक्रमक भूमिका घेत झाडतोडीविरोधात चिपको आंदोलन छेडत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

दिनांक १ एप्रिल रोजी मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई येथे सागर कोकास यांनी वाशिम जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखड्याचे निवेदन सादर केले. या निवेदनात कारंजा येथे Educational Hub, रिसोड येथे Agriculture Hub, मंगरुळपीर येथे MSME विकास, तसेच वाशिम आणि मालेगाव येथे औद्योगिक प्रकल्प, Skill Development केंद्रे आणि पायाभूत सुविधा विकास यांचा समावेश करण्यात आला आहे.

वाशिम जिल्हा हा विदर्भातील अत्यंत दुर्लक्षित जिल्हा मानला जात असून, शिक्षण, उद्योग, कृषी, रोजगार आणि मूलभूत सुविधा या क्षेत्रांत तो अद्याप मागे असल्याचे सागर कोकास यांनी निवेदनात नमूद केले आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या नियोजनबद्ध विकासासाठी मोठ्या निधीची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शहरातील झाडतोडीच्या मुद्द्यावरूनही सागर कोकास यांनी तीव्र भूमिका घेतली आहे. 'कोणत्याही परिस्थितीत झाडांची कत्तल होऊ देणार नाही' असा निर्धार व्यक्त करत त्यांनी संबंधित झाडाला मिठी मारून चिपको आंदोलन केले. या आंदोलनानंतर नागरिकांनीही पुढाकार घेत झाडतोडीविरोधात आवाज उठविला.

---

# नवीन कायद्यांवर जिल्हा पोलीस दलाची मार्गदर्शक कार्यशाळा

■ **प्रतिनिधी | अकोला** ■

अकोला पोलीस दलाच्या वतीने नवीन फौजदारी कायद्यांविषयी मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित कार्यशाळा शनिवारी (दि. ४ एप्रिल) राणी महल येथे उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत पोलीस अंमलदारांना कायद्याचे धडे देत नवीन तरतुदींचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेत भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) २०२३ आणि भारतीय साक्ष्य अधिनियम (BSA) २०२३ या नव्या कायद्यांतील महत्त्वाच्या तरतुदी, त्यातील बदल तसेच प्रत्यक्ष कामकाजात त्यांची प्रभावी अंमलबजावणी कशी करावी याबाबत सखोल माहिती देण्यात आली. या उपक्रमाची संकल्पना पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांची होती.



यावेळी ॲड. भूतडा, ॲड. वसीम तसेच पोलीस हवालदार सतीश भातखेडे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून गुन्हे नोंदणी प्रक्रिया, तपास पद्धती आणि न्यायालयीन कामकाजातील बदल यावर मार्गदर्शन केले. तसेच ण्ण्ऊ्ए प्रणालीविषयीही माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी मनोहर उलेमाले यांनी केले. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना नवीन कायद्यांचे आकलन सुलभ झाल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या कार्यशाळेत सुमारे १५० पोलीस अंमलदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सर्व उपस्थितांनी सक्रिय सहभाग घेत नवीन कायद्यांची माहिती आत्मसात केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे पोलीस दलाची कार्यक्षमता वाढून नागरिकांना अधिक सक्षम व प्रभावी सेवा देणे शक्य होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

---

# राज्यस्तरीय शालेय टेनिकॉईट स्पर्धेत जे. डी. चवरे विद्यामंदिरची चमू विजयी



■ **प्रतिनिधी | कारंजा** ■

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वाशीम आणि वाशीम जिल्हा टेनिकॉईट संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने २७ ते २९ मार्च दरम्यान वाशीम जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित राज्यस्तरीय शालेय टेनिकॉईट स्पर्धेत कारंजा लाड येथील जे. डी. चवरे विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत १७ वर्षांखालील मुलांच्या गटात सुवर्णपदक पटकावले.

या स्पर्धेत अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जे. डी. चवरे विद्यामंदिरच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत लातूर, पुणे आणि कोल्हापूर विभागांवर मात केली. अटीतटीच्या अंतिम सामन्यात नागपूर विभागावर २१-१६ अशा फरकाने विजय मिळवत त्यांनी विजेतेपद निश्चित केले.

विजयी संघात कर्णधार नैतिक लिलाधर वर्मा याच्यासह उत्कर्ष दिलीप पुणेवार, रूत्विक पवन रोडे, सौम्य मंगेश सरोदे आणि स्वरूप राहुल एक्कलवार या खेळाडूंचा समावेश होता. सर्व खेळाडू लोकमान्य व्यायाम शाळेच्या मैदानावर नियमित सराव करतात.

या यशामागे शिक्षक विवेक गहाणकरी व राज्य प्रशिक्षक अक्षय गवारे यांचे मार्गदर्शन लाभले. संघाच्या या यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापन मंडळ, शाळा समिती अध्यक्षा डॉ. सौ. लिनाताई चवरे, मुख्याध्यापक श्रीनिवास जोशी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. याशिवाय जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोडें, तालुका क्रीडा अधिकारी मंगला शेंडे, लोकमान्य व्यायाम शाळेचे पदाधिकारी आनंद पेंटे तसेच वाशीम जिल्हा टेनिकॉईट संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनीही विजेत्या खेळाडूंचे कौतुक केले.

---

# मोफत लाठी काठी स्वसंरक्षण प्रशिक्षण

**अकोला :** लाठी काठी स्वसंरक्षण प्रशिक्षण मोफत आयोजन महाराष्ट्रात सिलंबम असोसिएशन व स्वयंसिद्धा असोसिएशन च्या वतीने राज्य प्रमुख डॉ.खुशबु चोपडे यांनी केले आहे. लाठी काठी प्रशिक्षण शारदा समाज मंदिर ऊँ जिमच्या बाजुला मराठा नगर सध्याकाळी ६:३० ते ७:३० वा दि ५/ ४/२०२६ ते १४/ ४/२०२६ पर्यंत राहणार आहे. प्रशिक्षणासाठी स्वसंरक्षण ही आजच्या काळाची अत्यावश्यक गरज आजच्या वेगाने बदलणाऱ्या समाजात स्वसंरक्षण ही केवळ एक कला नसून प्रत्येकासाठी आवश्यक जीवनकौशल्य बनले आहे. वाढत्या घटना आणि असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर विशेषतः महिला, मुली आणि विद्यार्थ्यांनी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेणे अत्यंत गरजेचे ठरत आहे.

---

# 'प्रेमा माथुर प्रेरणा' पुरस्काराने हंसिनी उचित सन्मानित !



■ **प्रतिनिधी | वाशिम** ■

माही संदेश पत्रिका यांच्या वतीने आयोजित नारी शक्ती सन्मान २०२६ सोहळा रविवार दि. २९ मार्च रोजी गुलाबी शहर जयपूर राजस्थान येथे संपन्न झाला.सी. के. बिर्ला हॉस्पिटल एडमिन ब्लॉक मध्ये पार पडलेल्या सोहळ्यात राजस्थान सहित देशाच्या आठ राज्यातून निवड झालेल्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना या वेळी सन्मानित करण्यात आले आहे.

सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक, साहित्य क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या वाशिमच्या हंसिनी अरविंद उचित यांना प्रमुख मान्यवर चिकित्सा विशेषज्ञ डॉ.अनुकृति सूद, डॉ.आशिष अग्रवाल, माही संरक्षक सुधीर माथुर, प्रधान संपादक रोहित कृष्ण नंदन, समन्वयक भरत कोराना यांच्या हस्ते ' प्रेमा माथुर प्रेरणा पुरस्काराने ' सन्मानित करण्यात आले आहे.

कवयित्री, अभिनेत्री अशी ओळख असलेल्या हंसिनी उचित यांची नाटक, नृत्य, गायन, लेखन आणि वाचन ही विशेष आवड असून त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांतही सक्रिय सहभाग नोंदवला आहे. त्या दिव्यरत्न प्रज्ञालंकार बहुउद्देशीय संस्था, वाशिम तसेच आर्टिस्ट्री फ्युजन अकॅडमीच्या अध्यक्षा आहेत. याशिवाय साऊथ इंडियन बुद्धिस्ट फेडरेशनच्या सचिव, बेटी बचाओ बेटी पढ़ाओ अभियानच्या प्रचारक तसेच ह्युमन राइट्स अँड डेव्हलपमेंट असोसिएट, महाराष्ट्र राज्य या स्वरूपातही कार्यरत आहेत. मराठी चित्रपट, लघुपट, नाटके, दूरचित्रवाणी मालिका आणि गीत-अल्बम अशा विविध माध्यमांत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी आजतागायत करीत आहे. 'श्रीनाथ नंगेमहाराज दर्शन', 'कष्टाची भाकर', 'व्यथा', 'बिरसा', 'आई मला जग पाहू दे', 'तेरवं' आणि 'माईसाहेब, सविता भीमराव आंबेडकर' यांसारख्या चित्रपटांत त्यांनी भूमिका साकारल्या आहेत. अनेक नाट्यप्रयोग, सामाजिक प्रबोधनपर उपक्रम, महिला आरोग्य मेळावे, रक्तदान जनजागृती, पर्यावरण जागृती आणि स्वयंरोजगार शिबिरांच्या आयोजनातून त्यांनी समाजाशी घट्ट नाते जपले आहे.

---

# फार्मर कप स्पर्धेसाठी दुसरी बॅच रवाना



■ **प्रतिनिधी | मालेगाव** ■

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी फार्मर कप स्पर्धेच्या निवासी प्रशिक्षणासाठी मालेगाव तालुक्यातून दुसरी बॅच आज जल्लोषात रवाना करण्यात आली उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके यांच्या हस्ते सजवलेल्या एसटी बसला हिरवी झेंडी दाखवून प्रशिक्षणार्थींना अमरावती येथील दुर्गापूर कृषी विज्ञान केंद्राकडे पाठविण्यात आले.

पानी फाउंडेशनच्या माध्यमातून खरीप हंगाम २०२६ साठी राज्यातील ३५१ तालुक्यांत ही स्पर्धा राबविण्यात येणार असून शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान व जलव्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. कृषी विभाग व उमेद यांच्या संयुक्त सहकार्याने तालुक्यातील पुरुष व महिला शेतकऱ्यांची निवड या प्रशिक्षणासाठी करण्यात आली आहे.

या वेळी तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर, उमेद तालुका व्यवस्थापक एस. चक्रे, प्रिया पाठक यांनी प्रशिक्षणासाठी विशेष परिश्रम घेत शेतकरी महिलांना सहभागी करून घेतले प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा देताना संतोष वाळके यांनी सांगितले की या प्रशिक्षणातून मिळणारे ज्ञान जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून शेतीत सकारात्मक बदल घडवून आणावा. कार्यक्रमास के. सरनाईक, वैभव फुलारी, शितोळे यांच्यासह कृषी विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

---

# गहू कांदा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

**अकोला :** पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या बाभुळगाव जहाँ सर्कलमधील गावांमध्ये ३० मार्च २०२६ तसेच २ व ३ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास सुसाट वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने अक्षरशः हाहाकार माजवला आहे. या अचानक आलेल्या नैसर्गिक संकटामुळे परिसरातील रब्बी पिकांसह फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

बाभुळगाव जहाँगीर, कुंभारी, मासा, उदेगाव, डोंगरगाव, येवता, सिसा, बोंदरखेड, हिंगणा कुंभारी या गावांमध्ये गहू, हरभरा, कांदा, भाजीपाला तसेच विविध फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

---

# १२ एप्रिल रोजी वाशीम येथे 'आंबेडकरी साहित्य संमेलन'

## संमेलनाध्यक्षपदी, ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक प्रा. अशोक इंगळे तर उद्घाटन ज्येष्ठ कवी, लोकनाथ यशवंत यांच्या हस्ते

■ **प्रतिनिधी | वाशिम** ■

प्रज्ञासूर्य, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पर्वावर, प्रज्ञा साहित्य संघ वाशीम यांच्या वतीने वाशीम येथे आंबेडकरी साहित्य संमेलनाचे जोरदार आयोजन केले आहे. दि, १२ एप्रिल रोजी स्थानिक शिक्षण महर्षी ॲड, आप्पासाहेब सरनाईक सभागृह, श्री शिवाजी विद्यालय वाशीम येथील येथे म्हणजेच ज्येष्ठ कवी, नामदेव ढसाळ साहित्य नगरी परिसर व ज्येष्ठ कवी, स्मृतीशेष प्रसेनजित ताकसांडे विचारमंच वाशीम या ठिकाणी पार पडणार आहे.

साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षपदी अकोला येथील प्रख्यात ज्येष्ठ समीक्षक, ज्येष्ठ कवी, डॉ.अशोक इंगळे तर उद्घाटन नागपूर येथील विसावे विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, ज्येष्ठ कवी, लोकनाथ यशवंत राहणार आहेत. या आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी वाशीम येथील, संत चोखामेळा वस्तीगृहाचे संचालक व आदर्श समाजसेवक अनंतकुमार केशवराव जुमडे राहणार आहेत.



साहित्य संमेलनात दिवसभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिकेशी बांधील असलेले भरगच्च कार्यक्रम राहणार आहेत. सकाळी, डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्यापासून साहित्य संमेलनाच्या स्थळापर्यंत संविधान फेरीने प्रारंभ होणार आहे. ष्उद्घाटकीय समारंभात, आदर्श उद्योजक पद्मकुमार धोंडोपंत राऊत, रिपाईचे जिल्हाध्यक्ष, तेजराव वानखेडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, राजूभाऊ चौधरी, जि. प. पतसंस्थेचे अध्यक्ष, विजय मनवर, पिरिपाचे जिल्हाध्यक्ष, दौलतराव हिवराळे, वाशीम ग्रामीण पोलीस स्टेशनच्या ठाणेदार, श्रीदेवी पाटील, पनवेल येथील ज्येष्ठ साहित्यिक, नागनाथ डोलारे आदींची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.

उद्घाटन सत्र सकाळी दहा वाजता पासून रात्री समारोप दहा वाजेपर्यंत राहणार आहे. पुस्तक प्रकाशन, पुरस्कार प्रदान, ग्रंथ प्रदर्शन, डॉ.दिपाली गवई यांचा एकपात्री 'रमाई' नाट्य प्रयोग, आंबेडकरी चळवळ आणि कविता, या विषयाच्या अनुषंगाने ज्येष्ठ कवी, शेषराव पिराजी धांडे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद. परिसंवादात, महेंद्र ताजणे, प्रशांत वंजारे, डॉ.हेमंतकुमार कांबळे आदी सहभागी होणार आहेत. अमरावती येथील ज्येष्ठ साहित्यिक सुदाम सोनुले यांचे अध्यक्षतेखाली कथाकथन, कथाकथनात, प्रा.संजय घरडे, संजय डोंगरे, धोंडुजा इंगोले, प्रा.सुनिता अवचार, आर.आर.पठाण सहभागी होणार आहेत. नागपूर येथील ज्येष्ठ कवी मच्छिंद्र चोरमारे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन. यात महाराष्ट्रातील अनेक ज्येष्ठ कवी सहभागी होणार आहेत. शेवटी समारोप ज्येष्ठ कमी अनिल कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून यावेळी प्रमुख उपस्थिती, डॉ. अशोक इंगळे, उद्घाटक, ज्येष्ठ कवी, लोकनाथ यशवंत, ज्येष्ठ साहित्यिक, विलास अंभोरे, नागपूर खंडपीठाचे ज्येष्ठ विधीज्ञ, ॲड, डॉ.मोहन गवई आदींची राहणार आहे.

हे आंबेडकरी साहित्य संमेलन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारसौंदर्य घेऊन चालणारे असल्याने या साहित्य संमेलनातील वैचारिक सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी, सर्व साहित्यप्रेमी आणि आंबेडकरी चळवळीतील भगिनी आणि बंधूंनी अथवा सर्वच माणसांवर प्रेम करणाऱ्या माणूसप्रेमी सन्भगिनी आणि सन्बंधूंनी या आंबेडकरी साहित्य संमेलनाचा आस्वाद आणि सहभाग घेण्याचे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १२८ ■ रविवार, ५ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# 'दत्ताभाऊ' नावातच माया; सर्वसामान्य माणूस असायचा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## व्हीसीए जामठा येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली; फडणवीस-गडकरींची भावनिक आठवण

**नागपूर जनमाध्यम :** दत्ताभाऊंच्या विचारांच्या केंद्रस्थानी कायम सर्वसामान्य माणूसच होता. ते फक्त नेते नव्हते, तर खऱ्या अर्थाने 'दाता' होते, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.व्हीसीए जामठा येथे आयोजित सर्वपक्षीय शोकसभेत विविध राजकीय पक्षांतील नेते, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी अनेक मान्यवरांनी दत्ताभाऊंच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या सामाजिक बांधिलकीची आठवण केली.







मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दत्ताभाऊंनी आपल्या आयुष्यात वंचित आणि दुर्बल घटकांसाठी उभी केलेली व्यवस्था ही त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष आहे. आपल्याला जे मिळाले नाही, ते इतरांना कसे मिळेल, या विचारातून त्यांनी आरोग्य, शिक्षण आणि सहकार क्षेत्रात भक्कम काम उभे केले. गुणवत्तेशी तडजोड न करता उभारलेल्या संस्थांमुळे समाजातील अनेकांना नवी दिशा मिळाली, असे त्यांनी नमूद केले. सर्वपक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या या शोकसभेत 'दत्ताभाऊ' या नावामागील माणुसकीची उब पुन्हा एकदा अनुभवायला मिळाली.

### कर्तृत्व दर्शविणारी दोन स्मारके नागपूर आणि वर्धा येथे लवकरच

स्व दत्ता मेघे यांची कर्तृत्व दर्शवणारी दोन स्मारके नागपूर आणि वर्धा येथे लवकरच निर्माण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. या माध्यमातून पुढील पिढ्यांना त्यांच्या कार्याचा परिचय होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### राजकारणात असतानाही पूर्ण वेळ समाजकारण- नितीन गडकरी

केंद्रीय मंत्री गडकरी यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, राजकारणात असूनही पूर्णवेळ समाजकारण करणारे दत्ताभाऊ हे दुर्मिळ व्यक्तिमत्त्व होते. आयुष्याच्या सुरुवातीच्या संघर्षांनी त्यांना संवेदनशील बनवले आणि शेवटपर्यंत त्यांनी गरजूंच्या पाठीशी उभे राहण्याची परंपरा कायम ठेवली, असे ते म्हणाले.

## श्रेयासाठी धडपड... पण काम केंद्राचे

# पुलगाव उड्डाण पुलावरून राजकीय कुरघोडी; निधी अखेर मोकळा, पण श्रेयवाद तापला

**पुलगाव जनमाध्यम :** तब्बल १७ वर्षे रखडलेल्या पुलगाव रेल्वे उड्डाण पुलाच्या कामाला अखेर गती मिळण्याची चिन्हे दिसत असतानाच, या प्रकल्पावरून श्रेयवादाचे राजकारण तापले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निधी महारेलकडे हस्तांतरित केल्यानंतर कामाचा मार्ग मोकळा झाला असला, तरी स्थानिक आमदाराने या कामाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे.



सन २००९ मध्ये मंजूर झालेला हा पूल वर्षानुवर्षे रखडलेला होता. दरम्यान, वळण मार्गामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. संतप्त नागरिकांनी काही महिन्यांपूर्वी रेल्वे फाटकासमोर आंदोलन छेडत प्रशासनाला जागे केले. पूल पूर्ण करा किंवा फाटक खुले करा, अशी आक्रमक भूमिका घेतल्याने हा मुद्दा ऐरणीवर आला.

या प्रश्नावर खासदार अमर काळे यांनी सातत्याने पाठपुरावा करत रेल्वे मंत्र्यांना अनेक वेळा पत्रे लिहिली. फेब्रुवारी २०२६ पर्यंतही निधीअभावी काम ठप्प होते. अखेर मार्च २०२६ च्या संसद अधिवेशनात हा मुद्दा जोरदारपणे मांडल्यानंतरच प्रशासन खडबडून जागे झाले आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने निधी महारेलकडे वर्ग केला.मात्र, याच दरम्यान स्थानिक आमदाराने या उड्डाण पुलाच्या कामाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा रंगू लागली आहे. प्रत्यक्षात हा रेल्वे उड्डाण पूल केंद्र सरकारच्या अखत्यारीत येणारा प्रकल्प असून, त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे किंवा केंद्राकडे मागणी करणे हे मुख्यत्वे खासदारांच्या पातळीवर होते, ही बाब सर्वज्ञात आहे. त्यामुळे ज्यांचा संबंधच नाही, ते श्रेय कशाच्या जोरावर घेतात असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, महारेलकडून संकल्पचित्र नव्याने तयार होणार असल्याने कामाला काहीसा विलंब होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मात्र निधी उपलब्ध झाल्याने आता तरी रेल्वे विभाग आणि महारेल यांनी संयुक्तपणे काम वेगाने पूर्ण करावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

# वरातीत चाकू हल्ला; काका-चुलत भाऊ गंभीर

## महिला आश्रम परिसरातील घटना

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील महिला आश्रम परिसरात लग्नाच्या वरातीत चाकू हल्ल्याची धक्कादायक घटना घडून दोन जण गंभीर जखमी झाले. कौटुंबिक वादातून पुतण्याने स्वतःच्या काकावर व चुलत भावावर हल्ला केल्याची माहिती पोलिसांनी दिली.



माहितीनुसार, शनिवारी रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास हनुमान मंदिरातून नवरदेव व वरात दर्शन घेऊन बरबडी रोडवरील गजानन लॉनकडे विवाहासाठी निघाली होती. यावेळी वरातीत अचानक वाद निर्माण झाला. जुन्या कौटुंबिक वैमनस्यातून आरोपी नयन भलावे या पुतण्याने धारदार चाकूने काका प्रभाकर भलावे व मुलगा रितीक भलावे यांच्या वर सपासप वार केले. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले. घटनेनंतर वरातीत एकच गोंधळ उडाला. उपस्थितांनी तत्काळ जखमींना उचलून सेवाग्राम रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांकडून दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच वर्धा शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. आरोपी नयन भलावे हल्ल्यानंतर पसार झाला असून त्याचा शोध सुरू आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

लग्नाच्या आनंदी वातावरणात घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

# थेंबासाठी हंबरडा बोरखेडी-बांबरडा तहानले, मंजूर निधीचा ठावठिकाणा कुठे

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील बोरखेडी व बांबरडा या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असून, ग्रामस्थांना अक्षरशः पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. शासनाने सार्वजनिक विहिरींच्या गाळ उपसा व खोलीकरणासाठी निधी मंजूर करूनही प्रत्यक्ष काम न झाल्याने संतापाची लाट उसळली आहे.



माजी सरपंच लता काढताई यांनी गंभीर आरोप करत सांगितले की, बांबरडा ग्रामपंचायतीने या कामासाठी कंत्राट दिले, मात्र एक वर्ष उलटूनही विहिरींचे खोलीकरण व गाळ उपसा झालेला नाही. निधी मंजूर झाला, करार झाला, पण काम कुठे असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.या दोन्ही गावांची ओळखच पाणीटंचाईग्रस्त म्हणून असताना, दर दोन दिवसांनीच पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. बांबरड्यात तर एक दिवसाआडच पाणी मिळते. शेतशिवारातही पाणी नसल्याने महिलांना दूरवरून पाणी आणावे लागत आहे. ग्रामस्थांनी वेळोवेळी तक्रारी करून गटविकास अधिकारी नागेश ढोरे यांच्याशी चर्चा केली, मात्र आज होईल, उद्या होईल अशा आश्वासनांपलीकडे काहीच घडले नाही. त्यामुळे मंजूर निधीचा दुरुपयोग झाला का, असा संशय व्यक्त केला जात आहे.

# अवकाळीचा तडाखा; साहूर हादरलं शेतकऱ्यांच्या स्वप्नांची राख

**साहूर जनमाध्यम :** वादळी वाऱ्यांसह कोसळलेल्या अवकाळी पावसाने साहूर परिसराला अक्षरशः झोडपून काढले असून, शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास हिरावून नेला आहे. अचानक बदललेल्या वातावरणामुळे निर्माण झालेल्या या संकटाने शेतीचे मोठे नुकसान झाले आहे.



कापणीसाठी सज्ज असलेला गहू पावसात भिजल्याने गहू उत्पादकांचे कंबरडे मोडले आहे. दुसरीकडे, वादळी वाऱ्यांच्या तडाख्याने संत्रा व मोसंबीच्या बागांमध्ये मोठ्या प्रमाणात फळगळ झाली असून, फळबाग उत्पादकांवर आर्थिक संकट कोसळले आहे.

संत्रा-मोसंबी उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या साहूर परिसरात या नैसर्गिक आपत्तीने शेतकऱ्यांचे डोळे पाणावले आहेत. एका क्षणात सगळं उद्ध्वस्त झालं, अशी वेदनादायक प्रतिक्रिया शेतकऱ्यांतून उमटत आहे.

नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना त्वरित मदत द्यावी, अन्यथा हा आक्रोश आणखी तीव्र होईल, अशी संतप्त मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

# नाल्याच्या खोलीकरणाने इटलापूरचे शेतशिवार झाले पाणीदार

## शेतकऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू : लोकसहभागाला जमनालाल बजाज सेवा ट्रस्टकडून मदतीचा हात

**वर्धा जनमाध्यम :** माणसाच्या डोळ्यांतील पाणी आणि शेतात शिरणारे पाणी, या दोन्ही गोष्टी वेदनाच देतात. हिंगणघाट लगतच्या इटलापूर शिवारातील शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून याच वेदनेचा सामना करत होते. जो नाला शेतीची तहान भागवण्यासाठी असायला हवा होता, तोच नाला गाळामुळे उथळ होऊन शेतकऱ्यांच्या स्वप्नांना जलसमाधी देत होता. पण म्हणतात ना, जिथे जिद्द असते तिथे मार्ग सापडतोच! अखेर तो मार्ग जमनालाल बजाज सेवा ट्रस्टच्या माध्यमातून सापडल्याने शेतशिवार पाणीदार झालं.





हिंगणघाट लगतच्या इटलापूर या गावापासून एक मोठा नाला वाहत असून तो वणा नदीला जाऊन मिळतो. या नाल्याच्या आजुबाजुला मोठ्या प्रमाणात शेती आहे. अनेक वर्षांपासून या नाल्याचे खोलीकरण झाले नसल्याने पावसाळ्यात नाल्याचे पाणी शेतात शिरले की, उभ्या पिकाचे नुकसान व्हायचे. परिणामी, नाल्यालगतची जमीन अनेक वर्षांपासून पडीक होती. जर जलमार्गच अडवलेले असतील, तर पाण्याला आजूबाजूच्या शेतात शिरण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरत नाही, हे शेतकऱ्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी वर्ध्यातील जमनालाल बजाज सेवा ट्रस्टशी संपर्क साधला. शेतकऱ्यांच्या हाकेला प्रतिसाद देत १० टक्के लोकसहभागातून अवघ्या महिनाभरात अडीच किलोमीटर लांबीच्या नाल्याचे खोलीकरण करण्यात आले. या नाल्यामुळे नवसंजीवनी मिळाल्याचे नासिर सिद्दिकी, सचिन हिवसे, रामदास वैद्य, रवी खडतकर आदी शेतकऱ्यांनी बोलून दाखविले.

**३०० एकर जमिनीला संजीवनी-** महिन्याभरात अडीच किलोमीटर लांब नाल्याचे खोलीकरण करण्यात आले आहे. या नाल्याची रुंदी २५ मीटर असून दीड मीटर खोली आहे. यातून काढलेली माती काठावरच टाकल्याने पावसाळ्यातील पाणी अडविले जाणार आहे. या खोलीकरणामुळे केवळ नाला स्वच्छ झाला नाही, तर २० ते २५ शेतकऱ्यांची जवळपास ३०० एकर जमीन वाहितीखाली आली असून त्यांना सिंचनाचीही सोय झाली आहे. त्यामुळे पडीत जमिनीवर पिके डोलणार असून शेतकरी दुबार पीक घेण्यासही सज्ज झाले आहेत.

माझ्याकडे १२ एकर शेती आहे. कपाशी, सोयाबीन, चना आदी पीक घेत असतो. शेतालगत नाला वाहत असल्याने पावसाळ्यात या नाल्याचे पाणी शेतात शिरुन पिकांचे नुकसान व्हायचे. ही परिस्थिती माझ्या एकट्याची नसून लगतच्या सर्वच शेतकऱ्यांची होती. अखेर जमनालाल बजाज सेवा ट्रस्टने या नाल्याच्या खोलीकरणाकरिता मोलाचे सहकार्य केले. त्यामुळे आमच्या शेतीचे नुकसान टळणार असून सिंचनाचीही सोय झाली आहे. या खोलीकरणामुळे ३०० एकरपेक्षा अधिक शेतीला फायदा झाला आहे.

**नासिर सिद्दिकी, शेतकरी, इटलापूर**

जमनालाल बजाज सेवा ट्रस्ट शिक्षण आणि शेती या दोन प्रश्नांवर सातत्याने कार्य करीत आहे. नाला खोलीकरण व सरळीकरणाच्या कामातून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा आमचा प्रयत्न आहे. इटलापूर येथील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार नाल्याचे खोलीकरण करण्यात आले. विशेष म्हणजे, हे संपूर्ण काम २० लाखांपेक्षा कमी खर्चात पूर्ण झाले. जर हेच काम शासनाव्दारे केले असते, तर त्यासाठी यापेक्षा जास्त खर्च आला असता.

**संजय भार्गव,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जमनालाल बजाज सेवा ट्रस्ट, वर्धा.

# २४ तासांत पोलिसांची करडी नजर; चोरीची दुचाकी हस्तगत, चोरट्याला बेड्या

**वर्धा जनमाध्यम :** सावंगी मेघे पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरीस गेलेली मोटरसायकल अवघ्या २४ तासांत शोधून काढत पोलिसांनी चोरट्याला अटक करून धाडसी कामगिरी बजावली आहे. या कारवाईमुळे पोलिसांच्या तत्परतेचे पुन्हा एकदा दर्शन घडले.



फिर्यादी प्रफुल्ल सुधाकर घोडे (रा. कुरझडी, जामठा, ता. जि. वर्धा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २ एप्रिल रोजी त्यांनी त्यांची होंडा शाईन मोटरसायकल (क्र. श्पैं/०३४८, किंमत ३२ हजार रुपये) भुगाव टी-पॉईंट चौकात उभी केली होती. मात्र काही वेळातच अज्ञात चोरट्याने ती लंपास केली. या प्रकरणी सावंगी मेघे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, मौसा परिसरात एक इसम विनाक्रमांकाची मोटरसायकल घेऊन फिरत असल्याचे समोर आले. ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तात्काळ सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने संकेत अनिल राऊत (वय १९, रा. बोरगाव मेघे) असे नाव सांगत गुन्ह्याची कबुली दिली.

त्याच्या ताब्यातून चोरीची मोटरसायकल पंचासमक्ष जप्त करण्यात आली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे व उपविभागीय अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पुढील तपास सुरू असून नागरिकांनी पोलिसांच्या या कार्याचे स्वागत केले आहे.

# काळरात्र ठरलेली दिंडोरीची ती रात्र; विहिरीने गिळले ९ जीव, इंदोरे गाव शोकसागरात

**नाशिक जनमाध्यम :** शुक्रवारची ती भयाण रात्र दिंडोरी तालुक्यातील इंदोरे गावासाठी अक्षरशः काळरात्र ठरली. आनंदाच्या क्षणांसाठी घराबाहेर पडलेले दरगोडे कुटुंबीय पुन्हा कधीच परतले नाहीत. भरधाव वेगाने धावणारी कार रस्त्याच्या मधोमध असलेल्या विहिरीत कोसळली आणि एका क्षणात ९ जणांचा दुर्दैवी अंत झाला. सुनील दत्तू दरगोडे यांच्यासह संपूर्ण कुटुंब त्या गाडीत होते; मात्र पाण्याने काठोकाठ भरलेल्या विहिरीने त्यांना जिवंत गिळले आणि मागे उरला तो फक्त आक्रोश.

रात्री सुमारे १०.१५ वाजताच्या सुमारास झालेल्या या दुर्घटनेनंतर मोठा आवाज ऐकून ग्रामस्थ घटनास्थळी धावले. समोरचे दृश्य पाहून सर्वजण सुन्न झाले. विहिरीत पडलेली कार काही मिनिटे वर दिसत होती, टेल लॅम्प लुकलुकत होते; पण क्षणातच ती पाण्याखाली नाहीशी झाली. गाडीच्या काचा बंद असल्याने आत अडकलेल्या प्रवाशांना बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग उरला नव्हता. आतून काचा फोडण्याचे प्रयत्न सुरू होते, पण काळाने त्यांना वेळच दिला नाही.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच प्रशासन व अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने विहिरीत दोरखंड टाकून बचावकार्य सुरू झाले. काहींनी मोटार लावून पाणी बाहेर काढण्याचाही प्रयत्न केला; मात्र तब्बल तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर कार बाहेर काढण्यात आली, तोपर्यंत सर्व काही संपले होते. गाडीत ८ जणांचे मृतदेह आढळले, तर एक चिमुकली विहिरीत आढळून आली. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण इंदोरे गावावर शोककळा पसरली आहे.

प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत चौकशीचे आदेश दिले असून संबंधित विहीर मालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

# डांगरी वॉर्डातून दुचाकी लंपास; हँडल लॉक तोडून चोरट्याची करामत

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरातील डांगरी वॉर्ड परिसरात अज्ञात चोरट्याने हँडल लॉक तोडून दुचाकी लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली आहे. औरंगपूर येथील अविनाश इरपाते हे हिंगणघाट येथे रॅली पाहण्यासाठी आले होते. त्यांनी माता मंदिराजवळील झाडाजवळ एमएच-३२-एसी-०९२३ क्रमांकाची दुचाकी उभी केली होती. काही वेळानंतर परत येऊन पाहिले असता दुचाकी जागेवरून गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अज्ञात चोरट्याने हँडल लॉक तोडून दुचाकी पळवून नेल्याचे स्पष्ट झाले.

# आनंदनगरमध्ये अवैध दारूविरोधात धडक कारवाई; १.२३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** शहर पोलिसांनी आनंदनगर परिसरात अवैध दारूविरोधात मोठी कारवाई करत १ लाख २३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसायाला मोठा फटका बसला आहे.

पोलिसांनी वॉच आऊट मोहिमेअंतर्गत आनंदनगर परिसरात छापा टाकला. या वेळी लोखंडी ड्रम, कच्चे मोह रसायन, सडवा तसेच तयार मोहा दारू असा मोठा साठा आढळून आला. पोलिसांनी तत्काळ हा सर्व मुद्देमाल जप्त केला.

# वर्तमान व भविष्यातील आव्हानांचा विचार करुन शैक्षणिक पद्धतीला नवी दिशा आवश्यक -मुख्यमंत्री







## महाराष्ट्र ज्ञान सभा-2026 राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**नागपूर/प्रतिनिधी :** वैश्विक ज्ञानाचे भारतीयीकरण व भारतीय ज्ञानाचे वैश्विकरण करणे, हेच नव्या शैक्षणिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. केवळ ऐतिहासिक बाबींचा गौरवपूर्ण उल्लेख करु न आम्ही महान होणार नाही, तर यासह वर्तमान आणि भविष्याची वैश्विाक आव्हाने लक्षात घेउन त्यानुसार आमच्या शैक्षणिक पद्धतीला दिशा द्यावी लागेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज येथे केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ, विश्वेश्वरैया राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्था, आयआयएम नागपूर आणि शिक्षा संस्कृती उत्थान न्यास, नवी दिल्ली या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने व्हीएनआयटी येथे महाराष्ट्र ज्ञान सभा-२०२६ : विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षणया राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्राचे विशेष अतिथी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. याप्रसंगी शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय सचिव अतुल कोठारी, राज्यपालांचे सचिव डा. प्रशांत नारनवरे, आयआयएम नागपूरचे संचालक भीमराया मेत्री, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु डा मनाली क्षीरसागर, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु प्रशांत बोकारे, व्हीएनआयटीच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष मदाभूशी मदन गोपाल, संचालक डा. प्रेमलाल पटेल, लघु उद्योग भारतीचे रवनीत खुराना या मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आज जग अत्यंत वेगाने पुढे जात आहे. पहिली औद्योगिक क्रांती १७६० मध्ये आली होती. त्यानंतरच्या आलेल्या तीन औद्योगिक क्रांतींचा काळ हा सुमारे अडीचशे वर्षांचा आहे. मात्र, मागील पंधरा वर्षांतच तीन औद्योगिक क्रांतींचा अनुभव जगाने घेतला आहे. बदलांची गती लक्षात घेतली नाही, तर आम्ही मागे राहू शकतो. या क्रांतीला गती देणारे एआयआणि डीप टेक्नालाजीच्या विकासात भारतीयांचे अत्यंत मोलाचे योगदान राहिले आहे. आम्हाला शैक्षणिक धोरणातून असे मानव संसाधन घडवायचे आहे, ज्यात व्यक्तीमध्ये सर्वंकष विकासासह नैतिक व व्यावसायिक गुणांचे रोपणही अपेक्षित आहे. भौतिक, नैतिक, शारीरिक क्षमतेसह व्यावसायिक म्हणून ती व्यक्ती देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देणारीही ठरावी, अशी अपेक्षा आहे. जागतिक ज्ञान आणि भारतीय ज्ञान व्यवस्थेचा मेळ साधणारी आणि जागतिक आव्हानांचा सामना करणारी शिक्षण पद्धती आम्हाला विकसित करायची आहे, याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले.

मुख्यमंत्री म्हणाले, साठ टक्के नोक-यांचे स्वरुप येत्या एक हजार दिवसांमध्येच बदलणार आहे. डीप टेक व एआय तंत्रज्ञान सर्व क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल घडवत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढेल, असा याचा अर्थ नाही. देशात संगणक क्रांती आली, त्यावेळीही अशीच चर्चा सुरु झाली होती. मात्र, आम्ही त्या क्षेत्रातही आमचा ठसा उमटविला होता. तंत्रज्ञान कधीच थांबत नाही. अशावेळी तंत्रज्ञानासोबत आपणही पुढे जाण्याची गरज आहे. विद्यापीठे तसेच शिक्षकांनी आजच्या काळात कुठले विषय सुसंगत व अनुरूप आहेत, याचाही विचार करण्याची गरज आहे. पंधरा वर्षात तीन औद्योगिक क्रांती येणार असतील, तर समाजात काहीही स्थायी राहू शकत नाही. प्रत्येकाला नव्या पद्धती स्विकाराव्या लागतील व शैक्षणिक क्षेत्र त्यासाठी अनुकूल करून घ्यावे लागेल आणि ज्ञानाचा प्रवाह पुढे न्यावा लागेल, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.विदेशी विद्यापीठांना आम्ही अनुकूल नव्हतो, असाही एक काळ होता. कारण त्यावेळी आम्ही त्यांच्याशी स्पर्धा करू शकत नव्हतो. आज ती परिस्थिती राहिलेली नाही. नवी मुंबईत आम्ही एज्युसिटी विकसित करत आहोत. त्यात अनेक विदेशी विद्यापीठाचे शिक्षण कमी खर्चात घेण्याची संधी आमच्या मुलांना उपलब्ध होणार आहे. आमच्या विद्यापीठांनीही या स्पर्धेत उतरून शिक्षणाचा तो स्तर गाठायला हवा, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

याप्रसंगी मुख्यमंत्री व मान्यवरांच्या हस्ते एका स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्याचप्रमाणे बेस्ट प्रॅक्टीसेस ऑफ गोंडवाना युनिव्हर्सिटी या पुस्तिकेचे प्रकाशनही याप्रसंगी पार पडले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मनाली क्षीरसागर यांनी आभार मानले. दोन दिवस चालणा-या या परिषदेत देशभरातील शिक्षण व उद्योग क्षेत्राशी निगडित तज्ज्ञ आणि प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाच्या संदर्भातून विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण या थीमवर आधारित महाराष्ट्र ज्ञान सभेचे हे आयोजन होत आहे.

# भारतात गेलो तरी बेरोजगारीने आम्ही मरणारच आहोत

## दुबई सोडण्यास भारतीयांचा नकार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** उदरनिर्वाहासाठी पैसे नसतील तर भारतात गेल्यानंतरही आम्ही मरणारच आहोत, त्यापेक्षा इथेच राहून जीवाचा धोका पत्कारण्याची आमची तयारी आहे, अशी भावना दुबईत अडकलेले बिहारमधील ३७ वर्षीय कामगार दिलीप यादव यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्तकेली. गेल्या पाच आठवड्यांपासून पश्चिम आशियात पेटलेल्या युद्धाची धग अद्यापही कायम आहे. या संघर्षादरम्यान आखाती देशात अनेक भारतीय कामगार अडकून पडले आहेत. दुबई, सौदी अरेबिया, बहरीन, कुवेत, कतार आणि ओमानमध्ये काम करणा-या भारतीयांची संख्या सर्वाधिक आहे. इराणकडून या देशांवर सातत्याने हल्ले होत असतानाही हे कामगार आपली नोकरी सोडून मायदेशी परतण्यास तयार नसल्याचे समोर आले आहे.

बिहारच्या सहरसा येथील दिलीप यादव दशकभरापूर्वी कामाच्या शोधात दुबईला गेले होते. तिथे त्यांना एका कंपनीत मॅकनिकल फिटर म्हणून चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. मात्र, पश्चिम आशियात युद्धाचा वणवा पेटल्यानंतर दुबईत राहणा-या अनेक भारतीयांच्या जीवाला धोका निर्माण झाला. भारत सरकारने त्यांना सुखरूप मायदेशी परत आणण्यासाठी मोहीम हाती घेतली, तरीदेखील दिलीप यादव यांच्यासह बहुतांश भारतीय कामगारांनी दुबई सोडण्यास नकार दिला आहे. नोकरी सोडून रिकाम्या हाताने मायदेशी परतण्यापेक्षा कुटुंबाला आर्थिक आधार देण्यासाठी त्यांनी दुबईतच राहण्याचा निर्णय घेतला आहे.

गेल्या काही वर्षांत भारतात बेरोजगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून आले आहे, त्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी अनेक भारतीय कामगार दुबई, सौदी अरेबिया, बहरीन, कुवेत, कतार आणि ओमानमध्ये काम करीत आहेत. भारताच्या तुलनेत आखाती देशात काम करणा-या कामगारांना चांगल्या पगाराची नोकरी मिळते. परिणामी घराचे कर्ज, मुलांचे शिक्षण आणि उदरनिर्वाहासाठी अनेक भारतीय कामगार परदेशातील नोकरीला प्राधान्य देतात. मायदेशी परतल्यावर रोजगाराची कोणतीही शाश्वाती नसल्यामुळे ते परदेशातच राहून तेथील धोक्यांचा सामना करण्यास तयार असतात. दिलीप यादव यांनी मांडलेल्या भूमिकेमुळे इराणचे क्षेपणास्त्र आणि ड्रोनच्या मा-यापेक्षाही बेरोजगारी आणि गरिबीची भीती भारतीय कामगारांच्या मनात जास्त असल्याचे दिसून येते.



पश्चिम आशियातील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीमुळे आखाती देशांतील लाखो भारतीय कामगारांच्या सुरक्षेचा आणि रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. २८ फेब्रु वारी रोजी अमेरिका व इस्रायलने केलेल्या संयुक्त हल्ल्यात इराणचे तत्कालीन सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला होता. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणनेही आखातातील अमेरिका व इस्रायलच्या मित्रदेशांवर हल्ले करण्यास सुरु वात केली. या संघर्षामुळे आखाती देशांतील अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसल्याने तिथे काम करणा-या भारतीय कामगारांवर याचा मोठा परिणाम होत आहे. कामावरून कमी केले जाणे किंवा पगार वेळेवर न मिळणे अशा समस्यांना त्यांना सामोरे जावे लागत आहे.

# 9 जणांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेली विहीर बुजविणार

### मंत्री गिरीश महाजन

**नाशिक :** दिंडोरी येथे नउ जणांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेली विहीर तातडीने बुजविण्याचे निर्देश नगरपालिकेला दिले आहेत. या घटनेची सखोल चौकशी करण्यात येईल. मृतांच्या कुटुंबांना पाच लाख रु पयांची मदत करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीष महाजन यांनी दिली. दिंडोरी येथे काल रात्री विहिरीत कार कोसळून ६ शालेय विद्यार्थ्यांसह नउ जणांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळाल्यावर मंत्री श्री. महाजन यांनी आज सकाळी घटनास्थळाची पाहणी केली. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. यावेळी अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय मंत्री नरहरी झिरवाळ, खासदार भास्कर भगरे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. मंत्री श्री. महाजन म्हणाले की, नउ जणांच्या मृत्यूची घटना अत्यंत दुर्दैवी आणि धक्कादायक आहे. या घटनेची सखोल चौकशीचे निर्देश जिल्हाधिका-यांना दिले आहेत. त्यानुसार ते चौकशी करून अहवाल सादर करतील. या अपघातप्रकरणी संबंधिताच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संवाद साधला असून त्यांना घटनेची माहिती देण्यात आली आहे. त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाख रु पयांची मदत जाहीर केली आहे, असेही त्यांनी सांगितले.

# कुंभमेळा विषयक विकास कामांची मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याकडून पाहणी





**मुंबई/प्रतिनिधी :** सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर नाशिक शहर आणि परिसरात सुरू असलेल्या विविध पायाभूत सुविधा विषयक कामांना मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी भेटी दिल्या. पायाभूत सुविधांची कामे विहित वेळेत आणि दर्जेदार झाली पाहिजेत. त्यादृष्टीने सर्व यंत्रणांनी काम करण्याच्या सूचना यावेळी दिल्या.मुख्य सचिव श्री. अग्रवाल यांनी आज कुंभमेळा विषयक रस्ता कामे तसेच रेल्वे विषयक विकास कामे, विमानतळ विस्तारीकरण, पार्किंग सुविधा आदी कामांना भेटी दिल्या. कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्तडा. प्रवीण गेडाम, रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक पुनीत अग्रवाल, कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, महापालिका आयुक्त मनीषा खत्री, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता प्रशांत औटी, अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग, विमानतळ प्राधिकरण आणि एचएएलचे अधिकारी तसेच विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते. मुख्य सचिव श्री. अग्रवाल यांनी सुरु वातीला स्व. मीनाताई ठाकरे क्रीडा संकुल येथे जाउन पाहणी केली. तेथे सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत करावयाच्या पार्किंग सुविधा संदर्भातील नियोजनाची माहिती घेतली.

मुख्य सचिव श्री. अग्रवाल यांनी ओढा रेल्वे स्टेशन येथे जाउन तेथे होत असलेल्या विकासकामांचा आढावा घेतला. यावेळी रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक पुनीत अग्रवाल आणि विभागीय आयुक्तडा. गेडाम यांनी माहिती दिली. नाशिक रोड रेल्वे स्थानकासह ओढा, कसबे सुकेणे, खेरवाडी, देवळाली कॅम्प रेल्वे स्थानक परिसर विकास, प्रवाशांसाठी सोई सुविधा, येणा-या भाविकांसाठी बस कनेक्टिव्हिटी आदींची माहिती मुख्य सचिव श्री. अग्रवाल यांनी घेतली. ओढा येथे कुंभमेळा साठी बांधण्यात येत असलेल्या घाट कामांचीही त्यांनी पाहणी केली.त्यानंतर मुख्य सचिव श्री. अग्रवाल यांनी, राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणामार्फत मुंबई धुळे महामार्गावरील नाशिक शहरातील विकास कामांची पाहणी केली. कामांची गती वाढविण्याच्या सूचना यावेळी त्यांनी यंत्रणेला केल्या. काम करताना प्रशासकीय आणि तांत्रिक पातळीवर काही अडचणी जाणवत असतील तर त्या तत्काळ निदर्शनास आणून द्याव्यात आणि कोणत्याही परिस्थितीत कामांना विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी सर्व यंत्रणांना केल्या. विमानतळ विस्तारीकरण कामाचीही त्यांनी पाहणी केली. ही कामे करताना यंत्रणांनी एकमेकांशी समन्वय ठेवून कोणतीही तांत्रिक अडचण जाणवणार नाही , याची काळजी घ्यावी. एकदा सुरू केलेली कामे बंद राहणार नाहीत. त्याची गती कायम राखत ती वेळेत पूर्ण होतील, ही सर्व यंत्रणांची जबाबदारी आहे, त्यादृष्टीने काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळेस सर्व संबंधित विभागामार्फत सुरू असलेल्या कामांची माहिती उपस्थित अधिका-यांनी दिली.

# भारताची सागरी ताकद वाढली

## आयएनएस तारागिरी आणि आयएनएस अरिधमन नौदलात दाखल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**आखाती देशातील परिस्थिती दिवसेंदिवस तणावपूर्ण होत असताना भारताने आपल्या लष्करी सामर्थ्याची ताकद वाढवली आहे. भारतीय नौदलाने आज (३ एप्रिल) विशाखापट्टणम येथे आयएनएस तारागिरी आणि आयएनएस अरिधमन यांना अधिकृतपणे नौदलात दाखल केले आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे या समारंभाला उपस्थित होते. भारताची सागरी



सुरक्षा आणि आण्विक प्रतिबंधक क्षमता मजबूत करण्यासाठी आयएनएस तारागिरी व आयएनएस अरिधमन या दोन पाणबुडीचे योगदान महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

आयएनएस तारागिरी आणि आयएनएस अरिधमन या दोन्ही युद्धनौका भारतीय नौदलाच्या प्रोजेक्ट १७ए अंतर्गत विकसित केलेल्या प्रगत स्टेल्थ फ्रिगेट्स आहेत. आयएनएस अरिधमनमध्ये समुद्राच्या खोल पाण्यात दबा धरू न शत्रू सैन्याचा नाश करण्याची क्षमता आहे. याउलट, आयएनएस तारागिरी समुद्राच्या पृष्ठभागावर कार्यरत असून शत्रूंना नेस्तनाबूत करण्यासाठी वेगाचा आणि आधुनिक शस्त्रास्त्रांचा वापर करते. विशाखापट्टणम येथे झालेल्या कार्यक्रमात राजनाथ सिंह यांनी आपल्या भाषणात म्हटले की, जेव्हा कधी तणाव निर्माण होतो, तेव्हा व्यापारी जहाजे आणि तेलवाहू टँकर्सच्या सुरक्षेची हमी देण्यासाठी भारतीय नौदल तत्परतेने पुढे येते. हे नौदल केवळ भारताच्या राष्ट्रीय हितांचेच रक्षण करत नाही, तर जगभरातील आपले नागरिक आणि व्यापारी मार्गांच्या संरक्षणासाठी आवश्यक ती प्रत्येक उपाययोजना करण्यासही सज्ज असते. हीच क्षमता भारताला एक जबाबदार आणि सामर्थ्यवान सागरी सत्ता म्हणून ठामपणे प्रस्थापित करते.

# दत्ताभाउंच्या केंद्रस्थानी कायम सर्वसामान्य माणूस असायचा-मुख्यमंत्री





## ● स्व. दत्ता मेघे यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली ● केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती

**नागपूर/प्रतिनिधी :**स्व. दत्ता मेघे हे जनसामान्यांचे, बहुजनांचे, गोरगरिबांचे नेते होते. लोक त्यांना प्रेमाने दत्ताभाउ म्हणायचे. पण ते ख-या अर्थाने 'दाता'भाउ होते. लोकनेते होते. समाजातील वंचितांसाठी त्यांनी व्यवस्था उभी केली. सर्वसामान्य माणूस त्यांच्या कायम केंद्रस्थानी असायचा. त्यांच्या मदतीसाठी कायम ते तत्पर असायचे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. व्हीसीए जामठा येथे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री स्व. दत्ता मेघे यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. कामगार मंत्री आकाश फुंडकर, गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल, महापौर नीता ठाकरे, खासदार माया इवनाते, खासदार अमर काळे, आमदार संजय कुटे, आ. नाना पटोले, आ. विकास ठाकरे, आ.अभिजित वंजारी, माजी मंत्री रणजीत देशमुख, माजी मंत्री रमेश बंग, माजी मंत्री अनिल देशमुख, माजी खासदार विलास मुत्तेमवार, माजी मंत्री राजेंद्र मुळक, माजी मंत्री सुलेखा कुंभारे, माजी खासदार अजय संचेती, माजी आमदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांचीही उपस्थिती होती. स्व. दत्ता मेघे यांचे सुपूत्र आमदार समीर मेघे, सागर मेघे यांच्यासह मेघे कुटुंबिय, विविध क्षेत्रातील मान्यवर आदी यावेळी उपस्थित होते.मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, दत्ताभाउंनी आपल्याला जी गोष्ट मिळाली नाही ती इतरांना कशी मिळेल, यासाठी विविध क्षेत्रात काम उभे करीत मदत केली. हा विस्तार करतानाही त्यांच्या डोळ्यासमोरून सर्वसामान्य माणूस गेला नाही. संस्था उभ्या करतानाही त्यांनी गुणवत्तेशी कधी तडजोड केली नाही. आरोग्य, शिक्षण, सहकार अशा प्रत्येक क्षेत्रात आपला विस्तार गुणवत्तापूर्वक होईल, असा विचार केला. अशा प्रकारचे नेते फार कमी पहायला मिळतात, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

**कर्तृत्व दर्शविणारी दोन स्मारके नागपूर आणि वर्धा येथे लवकरच**

स्व. दत्ता मेघे यांची कर्तृत्व दर्शविणारी दोन स्मारके नागपूर आणि वर्धा येथे लवकरच निर्माण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. सर्वसामान्य, गोरगरिबांची सेवा करण्याचा दत्ताभाउंचा वारसा पुढे नेण्याचे कार्य या माध्यमातून होईल व स्मारकाच्या निमित्ताने पुढच्या पिढ्यांना त्यांचे स्मरण होईल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही आपल्या भाषणात या स्मारकांचे सूतोवाच केले.

**राजकारणात असतानाही पूर्णवेळ समाजकारण** - नितीन गडकरी

लोकनेते दत्ता मेघे यांनी राजकारणात असतानाही पूर्णवेळ समाजकारण केले. अशी माणसे दुर्मिळ असतात आणि दत्ताभाउ राजकारणातील दुर्मिळ व्यक्तिमत्व होते, या शब्दांत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांनी स्व. दत्ता मेघे यांना श्रद्धांजली अर्पण केली. केंद्रीय मंत्री श्री. गडकरी पुढे म्हणाले की, आपल्या आयुष्याच्या सुरु वातीला दत्ताभाउंनी जे दुःख सोसले, त्याचा त्यांना कधीही विसर पडला नाही. अखेरच्या श्वासापर्यंत समाजातील गोरगरिबांबद्दल त्यांच्यातील संवेदनशीलता जागृत होती. अडचणीत असलेली व्यक्ती त्यांच्याकडे आली तर ती कधीही रिकाम्या हाताने परत जात नसे. प्रत्येकाच्या पाठीशी ते खंबीरपणे उभे राहिले, असे केंद्रीय मंत्री श्री. गडकरी यावेळी म्हणाले.

### ईस्टर निमित्त राज्यपालांच्या शुभेच्छा

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी ईस्टरनिमित्त राज्यातील लोकांना शुभेच्छा दिल्या आहेत. ईस्टर हा सण प्रभू येशू ख्रिस्तांच्या पुनरुत्थानाचा दिवस आहे. आज शेकडो वर्षांनी देखील येशू ख्रिस्तांची मानवता, प्रेम, दया व त्यागाची शिकवण सर्वाधिक प्रासंगिक आहे. ईस्टरनिमित्त सर्वांना, विशेषत? ख्रिस्ती बंधू भगिनींना हार्दिक शुभेच्छा देतो, असे राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

# सीमा हैदरच्या मुलाचे झाले बारसे!

**नवी दिल्ली :** पाकिस्तानातून भारतात पळून आलेली सीमा हैदर पुन्हा एकदा आई झाली. तिने मुलाचे नाव भारत असे ठेवले. नोएडातील रबपूरा येथील घरी बारशाचा कार्यक्रम झाला. नामकरण सोहळ्यापूर्वी सीमाने घरी गोंधळ-जागरण कार्यक्रम आयोजित केला. हिंदू धर्मात जेव्हा मुलाचा जन्म होतो, तेव्हा त्याचे नामकरण करण्यात येते. घरात जागरण घालण्यात येते. माझ्या घरात परंपरेनुसार या सर्व गोष्टी घडल्याने चांगले वाटत असल्याचे सीमा हैदर यावेळी म्हणाली.नामकरणाचा सोहळा धुमधडाक्यात पार पडला. भटजीकडून तिने बाळाचे नाव



काढले. तेव्हा अद्याक्षर भ आले. या नावावरू न भारत असे नाव ठेवल्याचे सीमा हैदरने सांगितले. गुरु वारी सीमा हैदरने तिच्या सहाव्या मुलाचे नाव ठेवले. तिने १८ फेब्रु वारी २०२६ रोजी नोएडातील एका रु ग्णालयात मुलाला जन्म दिला. यापूर्वी तिने एका मुलीला जन्म दिला. सीमा हिला तिच्या पाकिस्तानातील पतीकडून चार मुलं आहेत. तर सचिन मीणा याच्याकडून दोन मुलं आहेत. चार वर्षांपूर्वी सीमा हैदर ही पाकिस्तानातून पळाली. नेपाळमार्गे ती भारतात आली. तिने इथे आल्यावर सचिनसोबत लग्न केले. पण तिचे हे बिंग फुटले. त्यानंतर तिची अनेक दिवस मीडिया ट्रायल झाली. पाकिस्तानातूनही तिच्यावर चौफेर टीका झाली.

# शशी थरूर यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न

**मलप्पूरम :** काँग्रेस नेते शशी थरूर यांच्या वाहनांना घेरू न त्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. केरळ विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यूडीएफ उमेदवार ए. पी. अनिल कुमार यांच्या प्रचारासाठी शशी थरूर जात होते. त्यावेळी सात ते आठ जणांनी ताफा अडवत हल्ला करत थरूर यांच्या सुरक्षा रक्षकाला मारहाण केल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, केरळमधील मलप्पूरम जिल्ह्यातील वंडूर भागात यूडीएफ उमेदवारांच्या प्रचारासाठी दोन गाड्यांच्या ताफ्यासह शशी थरूर जात होते. पुढील



गाडीत ते बसले होते. तर, मागील गाडीत त्यांचे सुरक्षा कर्मचारी होते. तेव्हा दोन कारमधून आलेल्या आठ जणांनी थरू र यांचा ताफा रोखला.हल्लेखोरांनी थरू र यांच्या गाडीच्या काचांवर मारले. तेव्हा मागील गाडीत असलेला थरू र यांचा सुरक्षा रक्षक बाहेर आला.

जनमाध्यम



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## कायद्याचा बडगा

गेल्या वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांतच महाराष्ट्रात ६० ज्येष्ठ नागरिकांची विविध कारणांस्तव हत्या झाल्याची माहिती विधान परिषदेत देण्यात आली होती. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे मत आणि सन्मान असतो. नात्यातील अधिकारात बरेचदा याचाच विसर पडतो. अनेकदा ज्येष्ठांना शारीरिक इजा पोहोचवली जाते, त्याचप्रमाणे त्यांचे मानसिक व वैचारिक शोषणही केले जाते, असा निष्कर्ष टाटा समाजविज्ञान संस्थेनेदेखील काढला होता. या सर्व पार्श्वभूमीवर, तेलंगणातील काँग्रेस सरकारने 'तेलंगणा एम्प्लॉईज अकाऊंटेबिलिटी अँड मॉनिटरिंग ऑफ पेरेंटल सपोर्ट बिल २०२६' हे मंजूर करून घेतले आहे. खासगी अथवा सार्वजनिक संस्थेतील कर्मचाऱ्याने आपल्या पालकांची उपेक्षा केली अथवा त्यांना वाऱ्यावर सोडून दिले, तर अशांच्या पगारातून १५ टक्के अथवा जास्तीत जास्त दहा हजार रुपये कापण्याची तरतूद त्यात केली आहे. या विधेयकाचे मनापासून स्वागत केले पाहिजे. तेलंगणातील आमदार, खासदार त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नगरसेवकांना व पंचायत वा जिल्हा परिषद सदस्यांनाही हा कायदा लागू असणार आहे. भारतीय संस्कृतीचा टेंभा मिरवणारेदेखील अनेकदा पालकांवर अन्याय करत असतात. त्यामुळे अपरिहार्य बाब म्हणूनच हा कायदा आणावा लागला आहे. भारतात कुटुंबव्यवस्था आहे. त्यामुळे आई-वडील हे मुलांवर अवलंबून असतात आणि या व्यवस्थेचा ते अविभाज्य भाग आहेत. वस्तुतः आपापल्या वडीलधाऱ्यांचे हक्क स्वेच्छेनेच जपले गेले पाहिजेत; परंतु जेव्हा ते जपले जात नाहीत, तेव्हा कायदा हा ज्येष्ठांच्याच बाजूने झुकलेला असेल, असे उद्गार तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी काढले आहेत. आपल्याकडे कायद्याचा बडगा दाखवल्याशिवाय कुठलीही गोष्ट अमलात आणली जात नाही; परंतु प्रशासकीय यंत्रणेने कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होईल, याची दक्षता घेतली पाहिजे. या कायद्यानुसार, मुले उपेक्षा करत असल्यास अशा व्यक्तींना जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. त्यानंतर त्यांनी आपल्या उत्पन्नाचा तपशीलही देणे आवश्यक आहे. अशा ज्येष्ठांचे उत्पन्न आणि त्यांच्या गरजा विचारात घेऊन, जिल्हाधिकारी दोन महिन्यांत हा अर्ज निकालात काढतील. अर्थात, ही सुनावणी घेताना मुलांची बाजूदेखील ऐकून घेतली जाणार आहे. अन्याय होत असल्याचे दिसून आल्यास मुलांच्या खात्यातून त्यांच्या पगारातील १५ टक्के रक्कम कापून ती पालकांच्या खात्यात वर्ग केली जाईल. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयावर कोणाला अपील करायचे असल्यास ते सिनिअर सिटिझन्स कमिशनकडे करता येईल. अर्थात, या कायद्याची अंमलबजावणी करताना अडचणी येऊ शकतात. मुख्य म्हणजे, मुलाबरोबरच राहणारे आई-वडील हे बहुसंख्यवेळा हतबल असतात. त्यामुळे तक्रार केल्यास त्याचे काय परिणाम होतील, याची भीती वाटून, ते असे धाडस न करण्याची शक्यता आहे. म्हणूनच जे पालक जिल्हाधिकाऱ्यापर्यंत पोहोचू शकणार नाहीत, त्यांच्यासाठी हेल्पलाईन सुरू करण्याची आवश्यकता आहे. अनेक राज्यांत पोलीस अथवा सरकारी अधिकारी नियमितपणे निराधार ज्येष्ठ नागरिकांची विचारपूस करतात; परंतु जे आपल्या मुलांकडेच राहत आहेत, त्यांचीदेखील वास्तपुस्त करण्यासाठी अशा भेटी देण्याची गरज आहे. दीड वर्षापूर्वी महाराष्ट्रात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सामाजिक न्याय विभागाने ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी महामंडळाची स्थापना केली. ज्येष्ठांना वृद्धापकाळ चांगल्या तऱ्हेने घालवता यावा, त्यांचे शारीरिक, मानसिक आरोग्य सुस्थितीत राहावे, छळ-पिळवणुकीपासून संरक्षण व्हावे, जीवित व मालमत्तेचे संरक्षण, निवारा, अपघात विमा इ. सोयीसुविधा पुरवण्याची या महामंडळाची उद्दिष्टे जाहीर झाली होती. प्रत्यक्षात या दिशेने कितपत काम झाले आहे, याचा आढावा घ्यायला हवा. जी मुले वृद्ध पालकांची काळजी न घेण्याची भूमिका घेतात आणि त्यांची साथ सोडतात, अशांना मालमत्तेतून बाहेर काढण्याचे आदेश ज्येष्ठ नागरिक प्राधिकरण अवश्य देऊ शकते, असे सर्वोच्च न्यायालयाने गेल्यावर्षी एका प्रकरणात स्पष्ट केले होते. आर्थिकदृष्ट्या सक्षम मुलांनी पालकांना त्यांच्या घरात राहू न देणे आणि त्यांची देखभाल न करणे हे कायद्याच्या उद्दिष्टांना हरताळ फासणार आहे, असे ताशेरेही न्यायालयाने मारले होते. माता-पित्यांच्या वात्सल्याची परतफेड अवमानाने करणाऱ्या कृतघ्न मुलांना कायद्यानेच सरळ करणे आवश्यक आहे.त्रिकोणी कुटुंबांचा जमाना आला आणि घरातल्या वडीलधाऱ्यांची उपेक्षा होऊ लागली. कधीकधी फक्त आपल्या लहान मुलांच्या संगोपनासाठी आजी-आजोबांचा उपयोग करून घ्यायचा आणि मुले मोठी झाली की, त्यांना दूर लोटायचे, अशा घटनाही घडू लागल्या. पती-पत्नी दोघेही नोकरी करायला लागल्यानंतर घरातल्या लहानग्यांचा प्रतिपाळ करण्यासाठी हक्काचे माणूस म्हणून ज्येष्ठांची गरज असते. तेवढ्यापुरताच त्यांचा उपयोग करून नंतर ज्येष्ठांना वृद्धाश्रमात पाठवून द्यायचे, हेही प्रकार पाहायला मिळतात. म्हातारपणाची काठी म्हणून ज्यांना वाढवले, त्यांनीच अपमान करणे, जेवणाखाण्याची आबाळ करणे किंवा चक्क मारझोडही करणे, अशा घटना वर्तमानपत्रात वाचायला मिळाल्या की, सुन्न व्हायला होते. आर्थिक लाभ, मालमत्ता हडप करणे, कौटुंबिक वाद, मानसिक ताण, गैरसमज आणि सामाजिक असुरक्षितता यासारख्या कारणांमुळे महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांच्या हत्येचे प्रमाण दरवर्षी वाढत आहे.

# आगामी हंगाम कापसास पोषक?

**मध्य आखातात सुरु असलेले युद्ध आणि आगामी मॉन्सूनवरील एल-निनोचे सावट याचा येत्या हंगामात देशातील कापसाच्या लागवडीवर काय परिणाम होऊ शकतो तसेच त्यासाठी काय उपाय योजावे लागतील.**

अमेरिका - इस्त्राईल विरुद्ध इराण युद्ध सुरू होऊन एक महिना उलटला आहे. पुढे या युद्धाचे स्वरूप कसे राहील, जागतिक युद्ध छेडल्या जाईल का, अशा अनेक चिंताजनक बाबी समोर येत आहेत. आखाती युद्धात अल्पकाळ विराम होऊ शकतो. परंतु नजीकच्या काळात निर्णायक शेवट होईल असे चित्र आज तरी स्पष्ट नाही. जरी युद्ध थांबले तरी पूर्ववत स्थिती येण्यास बराच काळ लागणार आहे.

ही सर्व आंतरराष्ट्रीय परिस्थिती लक्षात घेता, आज भारतातील त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकरी, शेतमजूर, तसेच उद्योजक यांचे येत्या हंगामात काय भविष्य राहील ह्याचा अंदाज घेणे आवश्यक आहे. उत्तरेकडील राज्यात देशाच्या कापसाच्या क्षेत्रापैकी १६ टक्के क्षेत्रावर कापूस पेरला जातो, व त्याची पेरणी ह्या महिन्यात सुरू होणार आहे. मध्य भारतात, महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, तेलंगना, कर्नाटक या राज्यात देशातील ७५ टक्के कापसाचे क्षेत्र आहे आणि ह्या राज्यात जून महिन्यात म्हणजेच मॉन्सूनच्या पावसावर कापूस लागवडीखाली येतो. महाराष्ट्रात देशाच्या एकूण कापूस क्षेत्रापैकी ३३ टक्के क्षेत्र, म्हणजे सर्वात जास्त क्षेत्र असल्यामुळे कापसावर अनेक शेतकऱ्यांचे जीवन अवलंबून आहे.

कापसाच्या लागवडीबाबत यावेळी तीन गोष्टी प्रामुख्याने विचारात घ्याव्या लागतील. १. मॉन्सूनचे आगमन व सर्वसामान्य खरीपातील पावसाची स्थिती. २. युद्धजन्य परिस्थितीमुळे उद्भवणारी खतांची कमतरता. ३. कच्च्या तेलाच्या आयातीवरील होणारा आघात व त्याचे आयात-निर्यातीवर होणारे दुरगामी परिणाम. सध्या जरी 'एल निनो कंडिशन्स' ह्या पॅसिफिक महासागरावर सुरु असून समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान थंड आहे. पुढे हळूहळू एप्रिल - मे मध्ये सागराचे उष्णतामान वाढून 'एल निनो कंडिशन्स' जून-ऑगस्ट पर्यंत निर्माण होईल. ह्याचाच अर्थ या खरिपात मॉन्सून हा मध्यम ते हलक्या स्वरूपाचा राहण्याची शक्यता वर्तविल्या गेली आहे.

युद्धामुळे सर्वात जास्त कोंडी झाली आहे, ती आयात-निर्यातीची! भारतातील ८५ टक्के खतांचा पुरवठा, २० टक्के कच्चे तेलाचा पुरवठा हा होर्मुझ खाडीतून येणाऱ्या जहाजावर अवलंबून आहे. भारताला लागणाऱ्या अंदाजे ७५ टक्के



डीएपीची आयात ही होर्मुझ खाडीतून होते. युद्धाचा खरा परिणाम हा खाडीतून येणाऱ्या मालावर झाल्यामुळे कच्चे तेल, घरगुती गॅस,युरिया, स्फुरद खते यांच्या उपलब्धतेवर कमतरता येणार आहे. होर्मुझ खाडीतून येणाऱ्या मालावर व्यत्यय निर्माण झाल्यामुळे खताची आवक आणि उपलब्धता यावर मोठा परिणाम होणार आहे.

कच्च्या तेलाच्या आयात निर्यातीवर निर्बंध लागल्यामुळे साहजिकच पॉलिस्टर, नायलॉन किंवा तत्सम अनैसर्गिक कपडा आहे. भारत सोडून इतर देशांमध्ये अनैसर्गिक कपड्याचा वापर ७० टक्के आहे. भारतात नैसर्गिकरीत्या निर्माण केलेल्या कपड्याचा वापर हा ६० टक्के आहे. युद्धामुळे देशातील कापसाची बाजारपेठ सुधारताना दिसत आहे. रुपयाचे अवमूल्यन, महाग झालेली आयात आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील सुधारणा कापसाला उपयोगी आहेत.

### क्षेत्र वाढ संभव

या सर्व बाबींचा विचार करता भारतात कापूस क्षेत्रात २० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता अनेकांनी वर्तवली आहे. येत्या खरीप हंगामात संभाव्य कमी पावसाची शक्यता वर्तवल्यामुळे पाण्याच्या ताणाची क्षमता असणाऱ्या कापसाकडे शेतकरी वळू शकतात. महाराष्ट्रात कापूस उत्पादन गेल्या वर्षी ७३ लाख गाठी (१७० किलो प्रति गाठ) झाले. महाराष्ट्रात कापसाचे क्षेत्र ४२ लाख हेक्टर वरून कमी होऊन गेल्यावर्षी ते ३८.५ लाख हेक्टरवर आले होते.

यावर्षी अनेक अंदाजाप्रमाणे क्षेत्र पूर्ववत ४२ लाख हेक्टरवर वाढवून उत्पादन १०० लाख गाठीपेक्षा जास्त जाऊ शकते. अनैसर्गिक कपड्याचे उत्पादन कमी होणार असल्यामुळे कापसाला पुढील वर्षी बाजार भाव प्रतिक्विंटल सुमारे ८५०० रुपयांपर्यंत वाढेल, असा कापूस व्यापाऱ्यांचा अंदाज आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, ब्राझील सारख्या मुख्य उत्पादक देशांमध्ये उत्पादन खर्च अपेक्षितरीत्या वाढण्याची चिन्हे आहेत. साहजिकच त्यांना अनुकूल नसलेल्या परिस्थितीमुळे त्या देशांतील क्षेत्र कमी होणार आहे. त्यामुळे भारतात कापसाचे क्षेत्र १६ ते २० टक्के वाढण्यास परिस्थिती अनुकूल राहणार आहे.

### पूरक धोरण आवश्यक

एकंदरीत येणारा हंगाम कापसाला पोषक राहील असे वाटत असले तरी सरकारने ताबडतोब धोरणातील अडथळे दूर करावे अशी अपेक्षा आहे. भारतामध्ये २००६ ला बीजी - २ ह्या जनुकीय कापूस बियाणाला मान्यता दिल्यापासून एकही नवीन जनुकीय तंत्रज्ञान येऊ दिले नाही. परिणामतः आज उत्पादकता ५५० किलो रुई प्रतिहेक्टरवरून ३३० किलो रुईवर आले आहे. बीजी - २ सोबतच २५ टक्के शेतकरी तणनाशक जनुकीय बियाणे (आरआरएफ - राऊंडअप रेडी फ्लेक्स) वापरत आहेत. त्याला ताबडतोब परवानगी देणे आवश्यक आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे चाचणी केलेले बियाणे उपलब्ध होईल.

तसेच गुलाबी बोंडअळी प्रतिरोधक बियाण्यांच्या चाचण्या सुरू आहेत. त्याला लवकरात लवकर मान्यता देणे गरजेचे आहे. कापूस मिशन अंतर्गत उच्च घनता लागवड पद्धत कोरडवाहू शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात प्रसारित करण्याची गरज आहे. तसेच खताचा अभाव झाल्यास बायोचार, जीवामृत याचा वापर वाढवावा लागेल. प्रत्येक कापूस उत्पादकाने मृदा आरोग्य कार्ड नुसारच खत द्यावे आणि शक्यतो खत फेकण्याऐवजी ते पिकाच्या मुळाशी पोहोचेल असे द्यावे.

काही भागात स्फुरद व पालाश भरपूर प्रमाणात असल्यामुळे एक हंगाम त्याचा वापर टाळल्यास फरक पडणार नाही. कापसासोबतच काही ओळीनंतर तूर, उडीद, मूग यासारखी पिके घेतल्यास नत्राची मात्रा कमी करता येईल. अशा काही बदलांमधून कापूस उत्पादकांना येणारा हंगाम निश्चितच चांगला जाईल, यात शंका नाही.

**डॉ. चारुदत्त मायी**

# विदर्भाला अवकाळीचा फटका

आठवड्याभरापासून महाराष्ट्रात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. आधी पुणे, मुंबई, मग खान्देश, मराठवाडा असे करत बुधवारी हा अवकाळी पाऊस विदर्भात दाखल झाला. बुधवारी रात्रीपासून सुरू झालेल्या या पावसाने जनसामान्यांची तर तारांबळ उडवलीच, पण शेतकऱ्यांच्या शेतीचे देखील अतोनात नुकसान केले आहे. या अवकाळी पावसाचा खरा फटका नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, भंडारा, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशीम या बहुतेक सर्वच जिल्ह्यांना बसला असल्याचे वृत्त आले आहे. भंडाऱ्यासह काही ठिकाणी गारपीटही झाल्याचे सांगण्यात आले.

बुधवारी संध्याकाळपासूनच आकाश पूर्ण अनाच्छादित झाले होते. रात्री ९ नंतर आकाशात विजादेखील कडाडू लागल्या होत्या. रात्री ११ च्या सुमारास मुसळधार पाऊस कोसळला. त्याचा खरा फटका बसला तो नागपूर शहराला लागून असलेल्या कळमना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डमध्ये. तिथे शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेले धान्य तसेच भाजीपाला आणि फळे आणून ठेवली होती. अचानक सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकरी, व्यापारी तसेच बाजार व्यवस्थापनाची चांगलीच तारांबळ उडाली. तिथे या कृषी उत्पादनावर झाकण्यासाठी पुरेशा ताडपत्री देखील उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे मोठ्या प्रमाणात कृषी उत्पादनाचे नुकसान झाले. मिळालेल्या



**महाराष्ट्रात सुरू असलेल्या अवकाळी पावसाने विदर्भात मोठे नुकसान केले आहे. नागपूरसह अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस, वादळी वारा आणि गारपिटीमुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले. अचानक आलेल्या या संकटामुळे शेतकरी हतबल झाले असून प्रशासनाकडून तातडीच्या मदतीची मागणी केली जात आहे.**

माहितीनुसार, सुमारे ११००० पोती धान्य पूर्णपणे ओले झाले आहे. या प्रकाराला जबाबदार कोण असा प्रश्न विचारत संबंधित अधिकाऱ्यांवर सरकार काय कारवाई करणार असा प्रश्न शेतकरी आणि व्यापारी विचारत आहेत. कृषी उत्पन्न बाजार समितीने आता तातडीने पावले उचलावीत आणि ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

बुधवारी दिवसभर विदर्भात सर्व जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा ४० अंशांच्या वर दाखवत होता. मात्र बुधवारी रात्री सुरू झालेला पाऊस हा गुरुवारी पहाटेपर्यंत सुरूच होता. त्यामुळे गुरुवारी शहराचा पारा जवळजवळ आठ अंशांनी घसरल्याचे हवामान खात्याकडून सांगण्यात आले. नागपुरात २० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे, तर वर्धा जिल्ह्यात सर्वाधिक २६.४ मिलिमीटर पाऊस पडला. बुलढाणा, चंद्रपूर, वाशिम, अमरावती आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये ठिकठिकाणी झाडाच्या फांद्या तुटून रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली असल्याचे सांगण्यात आले. ठिकठिकाणी शेतात कापणी करून आणि मळणी करून ठेवलेला गहू, तूर, भाजीपाला, सोयाबीन इत्यादी धान्ये देखील मातीमोल झाल्याचे सांगण्यात आले. मार्च महिन्याच्या सुरुवातीला अशाच अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना चांगलाच फटका बसला होता. त्यातून शेतकरी सावरण्यापूर्वीच हा दुसरा फटका बसल्याचे बोलले जात आहे. परिणामी शेतकरीवर्ग चांगलाच हादरला आहे. बुधवारी अमरावतीत आणि परिसरात दिवसभर उन्हाचे चटके जाणवत होते. मात्र संध्याकाळी ८ वाजल्यानंतर सोसाट्याचा वारा सुटल्याने शहरात प्रचंड धुळीचे लोट उडाले. परिणामी जिल्ह्यातील अनेक घरांवरील पत्रे देखील उडून गेले. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे अनेक घरे उघड्यावर पडली होती. झाडाच्या फांद्या रस्त्यावर तुटून पडल्या होत्या, तर अनेक फांद्या विजेच्या तारांवर पडल्यामुळे ठिकठिकाणी वीज पुरवठा देखील खंडित झाला होता. रात्रभर अमरावती जिल्ह्यातील अनेक गावे परिणामी अंधारातच राहिली. या परिसरात संत्रा, आंबे तसेच भाजीपाला मोठ्या प्रमाणात विक्रीला तयार झाला होता. मात्र अचानक झालेला सोसाट्याचा वारा आणि पावसामुळे ते सर्व गळून पडले आणि पावसात खराब देखील झाले.

भंडारा जिल्ह्यात पावसासोबत गारपिटीने देखील कहर केला होता. अनेक ठिकाणी सकाळपर्यंत गारांचे ढीग पडलेले दिसत होते. या पावसामुळे भंडारा जिल्ह्यातील ३०२ हेक्टरमधील ८११ शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झाले असून ७५ गावे बाधित झाली असल्याचा अहवाल कृषी विभागाने सादर केला आहे. यात मका, आंबा आणि भाजीपाला पिकाचे सर्वात नुकसान झाल्याची नोंद आहे. वर्धा जिल्ह्यातही असाच मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वारा झाला. अनेक भागात डेरेदार वृक्ष कोसळून पडले, तर पिकांचे देखील नुकसान झाले. या भागात एका जनावराचाही मृत्यू झाला. जिल्ह्यातील आर्वी तालुक्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे.

विदर्भात ठिकठिकाणी झालेल्या या पावसामुळे जनजीवन तर विस्कळीत झालेच, पण बळीराजा पुरता कोलमडला आहे. प्रशासनाने तातडीने पंचनामे करावेत आणि सरकारने तत्काळ मदत जाहीर करावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी परिस्थितीचा आढावा घेत लवकरात लवकर पंचनामे करावेत आणि सरकारला अहवाल द्यावा असे आदेश प्रशासनाला दिले आहेत. त्यामुळे सर्वच शेतकरी आता सरकारी मदतीकडे आस लावून बसलेले आहेत. या अवकाळी पावसामुळे विदर्भाचे शेतकी क्षेत्र पूर्णतः अडचणीत येईल की काय असे चित्र दिसत आहे.

**अविनाश पाठक**

# दोन ठिकाणाहून निवडणूक लढण्याची तरतूद नको

राजकीय नेत्यांनी,राजकारण्यांनी आपल्या सोयीनुसार घटनेत दुरुस्ती करून आपल्याला अनुकूल असे कायदे बनवून घेतले आहेत.त्यापैकी दोन ठिकाणांहून निवडून येण्याची तरतूद. एका ठिकाणाहून जर पराजित झाले तर दुसऱ्या ठिकाणाहून तरी विजय मिळाला तर आपला राजकारणातील प्रभाव कायम ठेवता येतो, सत्ता प्राप्त करता येते, ही त्यामागची भूमिका. प्रत्येक राजकीय पक्षांना असेच वाटते,म्हणून हा कायदापारित करण्यास राजकीय पक्ष तयार नसतात.मात्र दोन ठिकाणावरून होणारी निवडणूक व त्यावर होणारा निवडणुक खर्च हा परवडणारा नसतो.जर उमेदवार दोन्ही जागांवरून निवडून आला, तर त्याला एक जागा सोडावी लागते. यामुळे त्या जागेवर पुन्हा पोटनिवडणूक घ्यावी लागते, ज्याचा खर्च सरकारी तिजोरीवर पडतो.प्रशासकीय वेळ आणि श्रम खर्च होतो. पोटनिवडणूक घेण्यासाठी संपूर्ण निवडणूक यंत्रणेला पुन्हा काम करावे लागते, ज्यामुळे वेळ आणि मनुष्यबळाचा अपव्यय होतो.

२०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना ही तरतूद रद्द करण्यास नकार दिला होता. हा विषय संसदेच्या अधिकारक्षेत्रातील असून, कायदयात बदल करण्याचा अधिकार केवळ संसदेला आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. निवडणूक आयोगाने केंद्र सरकारला अनेकदा अशी शिफारस केली आहे की, एका उमेदवाराला फक्त एकाच जागेवरून निवडणूक लढवण्याची परवानगी असावी. आयोगाने असेही सुचवले आहे की, जर दोन जागांवर लढण्याची मुभा कायम ठेवायची असेल, तर पोटनिवडणुकीचा खर्च (विधानसभेसाठी ५ लाख आणि लोकसभेसाठी १० लाख रुपये किंवा त्याहून अधिक) संबंधित उमेदवाराकडून वसूल केला जावा.या संदर्भात २००४ साली निवडणूक आयोगाने लोकप्रतिनिधि कायद्यात बदल करण्याची शिफारस केली होती. आयोगाच्या मते दोन जागांवरून निवडणूक लढवणाऱ्या व्यक्तीचा दोन्ही ठिकाणी विजय झाला तर एका जागेचा राजीनामा दिल्यानंतर संबंधित ठिकाणी होणाऱ्या पोटनिवडणुकीचा खर्च संबंधित विजयी उमेदवाराकडून घेतला जावा.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधींनी रायबरेली (उत्तर प्रदेश) आणि वायनाड (केरळ) या दोन मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि दोन्ही जागांवर मोठा विजय मिळवला. यापूर्वी २०१९ मध्ये त्यांनी अमेठी आणि वायनाड येथून निवडणूक लढवली होती, जिथे ते वायनाडमधून जिंकले पण अमेठीतून हरले होते . नियमानुसार, त्यांनी नंतर वायनाडची जागा सोडली.ही तरतूद बंद करण्यासाठी निवडणूक आयोग आग्रही असला, तरी त्यासाठी लोकप्रतिनिधी कायद्यात संसदेमार्फत सुधारणा होणे आवश्यक आहे.संसदेने दोन ठिकाणांहून निवडणूक लढण्यास प्रतिबंध घालणारा कायदा करून ही पद्धत बंद करायला पाहिजे.एका ठिकाणचा राजीनामा ही मतदारांशी केलेली प्रतारणा ठरू शकते, कारण मतदारांनी विश्वासाने दिलेले मत केवळ तांत्रिक कारणास्तव 'वाया' गेल्यासारखे होते.

**प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल,** वर्धा
मो.९५६१५९४३०६

# कर्ज गरजेपुरतेच घ्या

आजकाल कर्ज घेऊन लोक अनेक वस्तू,घरे,वाहने घेतात. पण ती घेताना आपली कर्जे किती आहेत.त्यामुळे आपणास काही अडचण येते का? तेही पाहणे जरूर आहे. आज घरे किंवा वाहने आपण कर्जाशिवाय घेऊ शकत नाही पण दैनंदिन व्यवहारासाठी कर्ज कशाला हवे? सार्वजनिक कर्जात वाढ झाल्यामुळे २०२४-२५ या आर्थिक वर्षात केंद्र सरकारची एकूण देणी वाढली आहेत.सरकारी तिजोरीतून होणाऱ्या एकूण खर्चापैकी तब्बल ६२.६७ टक्के वाटा केवळ कर्जाची परत फेड करण्यात होत आहे.ही आकडेवारी कॅग ने आपल्या रिपोर्टद्वारे समोर आणली आहे. देशांतर्गत कर्ज १५९२५९४९ कोटी रुपये आहे याला कारण आपली आमदनी पाहून खर्च करता येत नाही. आज अनेक राज्यात अनुत्पादक कामावर लाखो रुपये खर्च होत आहेत.

**शांताराम वाघ**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# वादळी पावसाचा कहर, वीज कोसळून महिलेचा मृत्यू!

■ जनमाध्यम प्रतिनिधी

## झाड पडून महिलेचा दुर्दैवी मृत्यू, परिसरात शोककळा





**यवतमाळ :** जिल्ह्यात अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात झालेल्या पावसाने दोन कुटुंबांवर काळाचा घाला घातला आहे. पुसद तालुक्यातील कुंभारी येथे वीज कोसळून एका महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर मारेगाव तालुक्यातील कानडा येथे झाड अंगावर पडल्याने दुसऱ्या महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दोन्ही घटनांमुळे जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.पुसद तालुक्यातील कुंभारी शेत शिवारात दि.३ मार्च रोजी दुपारच्या सुमारास सुमन रोहिदास पवार (वय ५०) या आपल्या पतीसोबत शेतात काम करत होत्या. अचानक वातावरणात बदल होऊन जोरदार वादळी वारा सुटला आणि विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. याच वेळी सुमन पवार यांच्या अंगावर थेट वीज कोसळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेत त्यांचे पती रोहिदास हरी पवार (वय ५५) हे देखील गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर पुसद येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णालयात दाखल केले. या घटनेमुळे कुंभारी गावासह परिसरात शोककळा पसरली असून पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

दरम्यान, दुसरी घटना मारेगाव तालुक्यातील कानडा येथे घडली. येथे सोसाट्याच्या वाऱ्यामुळे रस्त्याकडेला असलेले शिरसाचे झाड अचानक कोसळून मंजुळाबाई शामराव चिडे यांच्यावर पडले. या भीषण अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. मंजुळाबाई चिडे या गेल्या आठ वर्षांपासून त्यांचे जावई महादेव येवले यांच्याकडे वास्तव्यास होत्या. दोन्ही घटनांचा पंचनामा करण्यात आला असून संबंधित पोलीस ठाण्यांकडून पुढील तपास सुरू आहे. अचानक बदलणाऱ्या हवामानामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. अवकाळी पावसासह वादळी वाऱ्यांच्या या तडाख्याने दोन कुटुंबांचे संसार उद्धवस्त झाले असून, निसर्गाच्या या लहरीपणामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## सह्याद्रीनगरात घरफोडी



**यवतमाळ :** अज्ञात चोरट्याने घरात शिरुन कपाटातील सोन्या-चांदीच्या दागिण्यांसह ५८ हजार ६५५ रुपयाचा मुद्देमाल चोरुन नेला. घरफोडीची ही घटना १० मार्च रोजी सकाळी १० ते २ एप्रिल रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास वाघापूरातील सह्याद्रीनगरात घडली. उज्वला सचिन काळे (३०) रा. सह्याद्रीनगर वाघापूर यवतमाळ असे फिर्यादीचे नाव आहे. फिर्यादीने तिच्या कपाटात ५ ग्रॅम १० मिली वजनाची ४० हजार ६९५ रुपये किमतीची १ सोन्याची अंगठी, ७५ मिली सोन्याच्या मनगट्या किंमत ३ हजार तर १ ग्रॅम ३३० मिली वजनाची १० हजाराची सोन्याची लहान पोत, ५ हजार किमतीचे २ ग्रॅम वजनाचे कानातले टॉप्स असा मुद्देमाल ठेवला होता. फिर्यादीने कपाटाला लॉक न केल्याने कुणीतरी अज्ञात आरोपीने घरात शिरुन फिर्यादीचे कपाट उघडले. वरीर वर्णनाचा ५८ हजार ६९५ रुपयाचा सोन्याचा मुद्देमाल चोरुन नेला. याप्रकरणी उज्वला काळे यांच्या तक्रारीवरुन लोहारा पोलीसांनी गुन्हे नोंदविले आहे.

## कारण अद्याप अस्पष्ट

# रोहडा येथे शेतात तरुणाची आत्महत्या

■ जनमाध्यम प्रतिनिधी



**पुसद :** तालुक्यातील:माळ पठारावरील तालुक्यातील रोहडा येथे शेतातील आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन एका ३४ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ही घटना ३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी घडल्याचा अंदाज असून ४ एप्रिल रोजी सकाळी ती समोर आली.

मृतकाचे नाव गणेश विष्णू गोरे (वय ३४, मूळ रा. पार्डी) असे आहे. तो पत्नी, एक मुलगा, आई-वडील व एक भाऊ असा परिवार असून शेती व्यवसाय करीत होता. मिळालेल्या माहितीनुसार, गणेश गोरे हा ३ एप्रिल रोजी सायंकाळी शेतात जागरणासाठी गेला होता. मात्र तो घरी परतला नाही. ४ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ८ वाजताच्या दरम्यान त्याची आई शेतात पाहण्यासाठी गेली असता, आंब्याच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत त ो आढळून आला. हे दृश्य पाहताच तिने आक्रोश केला व गावकऱ्यांना माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील व सरपंच यांनी खंडाळा पोलीस ठाण्याला कळिवले. त्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल होऊन मृतदेह खाली उतरवून पंचनामा केला व शवविच्छेदनासाठी पुसद येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आहे. आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकले नसून खंडाळा पोलीस ठाण्यात मर्ग दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान, गणेश गोरे हा आईकडे भाऊ नसल्याने रोहडा येथील आजी-आजोबांची शेती पाहत असल्याची माहिती समोर आली आहे.

# इसमास बेदम मारहाण



■ जनमाध्यम प्रतिनिधी

**यवतमाळ :** फिर्यादी इसम हा गटाचे पैसे वाटप करीत होता. तेवढ्यात आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस तू माझ्या घरासमोरुन का आला असे म्हणून वाद घातला. फायबरच्या काठीने फिर्यादीच्या डोक्यावर मारुन त्याला जखमी केले. ही घटना ३ एप्रिलला दुपारी २ वाजता पांढरकवडा तालुक्यातील कारेगाव रामपूर येथील संजय हातगांवकर यांच्याघरी घडली. सुधाकर हरीभाऊ राजूरकर (६०) रा. कारेगाव रामपूर ता. केळापूर असे फिर्यादीचे नाव आहे. गुलाब शंकर अवताडे (६५), रवी गुलाब अवताडे (५०), प्रफूल गुलाब अवताडे (४८), प्रथम अवताडे (२४) सर्व रा. कारेगाव रामपूर अशी गुन्हे दाखल झालेल्यांची नावे आहे. याप्रकरणी पांढरकवडा पोलीसांनी गुन्हे नोंदवून तपास चालू आहे.

## रोखरकमेसह मोबाईल उडविला



**यवतमाळ :** फिर्यादी दुकानदार हा त्याचे दुकान बंद करुन शारदा चौकात उतरला. मात्र त्याच्यामागे उभ्या असलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्याच्या पँन्टमागील खिशातील ७ हजार रुपये किमतीचा मोबाईल व १९५० रुपये रोख असा ८ हजार ९५० रुपयाचा मुद्देमाल काढून चोरुन नेला. ही घटना २ एप्रिलला रात्री १०.३० वाजता येथील शारदा चौकातील रोडवर घडली. संजय गोविंदा खोब्रागडे (५२) रा. सुरजनगर यवतमाळ असे फिर्यादीचे नाव आहे. याप्रकरणी यवतमाळ शहर पोलीसांनी अज्ञात दोघांविरुध्द गुन्हे दाखल केले आहे.

# कार्यकर्त्यांच्या मतांवरच ठरणार नेतृत्व

■ जनमाध्यम प्रतिनिधी

## काँग्रेसची 'तळागाळातून उभारणी' मोहीम सुरू




**यवतमाळ :** आता नेते वरून लादले जाणार नाहीत, तर कार्यकर्त्यांच्या मतांवरच ठरणार! अशा स्पष्ट आणि ठाम भूमिकेसह काँग्रेस पक्षाने जिल्ह्यात 'संघटना निर्मिती अभियान' सुरू केले आहे. अखिल भारतीय काँग्रेस समितीचे निरीक्षक संजय कपूर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती देताना, पक्षात नवसंजीवनी आणण्याचा हा निर्णायक टप्पा असल्याचे स्पष्ट केले. राहुल गांधी आणि मल्लिका मल्लिकार्जुन खरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या अभियानाचा मुख्य उद्देश म्हणजे तळागाळातील कार्यकर्त्यांना केंद्रस्थानी ठेवून संघटनेची नव्याने उभारणी करणे. जिल्हाध्यक्ष व तहसील अध्यक्ष पदांसाठी यावेळी थेट कार्यकर्त्यांच्या मतांना प्राधान्य दिले जाणार असून, ही पद्धत काँग्रेसच्या अंतर्गत लोकशाहीची नवी दिशा मानली जात आहे.

संजय कपूर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, फक्त वरच्या पातळीवरून नेमणुका करून संघटना मजबूत होत नाही. खऱ्या अर्थाने पक्ष उभा राहतो तो कार्यकर्त्यांच्या विश्वासावर. त्यामुळे प्रत्येक स्तरावर कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून, त्यांचे मत जाणून घेत सक्षम नेतृत्वाची निवड केली जाणार आहे. या प्रक्रियेमुळे दीर्घकाळ पक्षासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांना न्याय मिळेल, तसेच गटबाजीला आळा बसून पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही मोहीम काँग्रेससाठी 'गेमचेंजर' ठरू शकते.असेही संकेत दिले गेले. दरम्यान, बूथ स्तरावर संघटना सक्रिय करणे, नवीन सदस्य नोंदणी वाढवणे आणि जनसंपर्क अधिक प्रभावी करणे यावर विशेष भर देण्यात येणार आहे. संपूर्ण जिल्हा पिंजून काढत काँग्रेस उभारणीसाठी पदाधिकाऱ्यांनी कंबर कसली आहे. पत्रकार परिषदेला प्रा. प्रफुल्ल मानकर, वजाहत मिर्झा, राहुल ठाकरे, जावेद अन्सारी, बबलू देशमुख, अनिल गायकवाड, अरविंद वाधोंकर, डॉ. नदीम, मनीष पाटील, शिवाजीराव मोघे, संतोष बोरले आदी उपस्थित होते.एकूणच ङ्गकार्यकर्ताच खरा नेताङ्ग या भूमिकेतून काँग्रेसने उभारलेली ही मोहीम पक्षाला नव्या उर्जेने सज्ज करत असल्याचे चित्र दिसत आहे.

# भव्य बक्षिसांसह 'भीम चषक २०२६'चा जल्लोष!

■ जनमाध्यम प्रतिनिधी

## दुसऱ्या पर्वासाठी यवतमाळ सज्ज



**यवतमाळ :** शहरातील लोकप्रिय रात्रकालीन टेनिस क्रिकेट स्पर्धा 'भीम चषक २०२६'च्या दुसऱ्या पर्वाचा बिगुल वाजला असून संपूर्ण जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नुकतीच या स्पर्धेची लिलाव प्रक्रिया शहरातील मीड टाउन हॉटेल येथे जल्लोषात पार पडली. यामध्ये तब्बल २० संघ आणि सुमारे ३७० खेळाडूंनी नोंदणी करून स्पर्धेची रंगत वाढवली आहे.

या स्पर्धेत ब्लीड धोनिजम, छत्रपती वॉरियर्स, आर्यन वाय.पी.एल., व्ही.एस. कंपनी, स्वराज्य ११, स्पार्टन्स ११, सुभाष ११, आर.आर.आर. पँथर, ओम तिवारी वाय.पी.एल., लीजेंट्स इलेव्हन, कोहिनूर बादशहा, के-टेन स्पोर्ट्स, फ्रेंड्स फॉरेवर, सिटी सुपर किंग, छत्रपती मराठा, मा. भवानी चौधरी इलेव्हन, सी.फोर एस.आर. स्ट्रायकर्स, बी.के. अँड पार्थ हंटर आणि भगवा योद्धा या संघांचा सहभाग निश्चित झाला आहे.स्पर्धा २० एप्रिल ते २७ एप्रिल दरम्यान यवतमाळमधील समता मैदानावर रात्री खेळिवण्यात येणार आहे. या स्पर्धेचे थेट प्रक्षेपण 'डब्ल्यू डी झेड' या यूट्यूब लाईव्ह चॅनेलवरून करण्यात येणार असल्याने क्रिकेटप्रेमींना घरबसल्या सामने पाहण्याची संधी मिळणार आहे. बक्षीस रक्कमही आकर्षक ठेवण्यात आली असून प्रथम पारितोषिक दोन लाख रुपये व विजेत्या संघ मालकाला एक्टिवा वाहन देण्यात येणार आहे. द्वितीय पारितोषिक एक लाख रुपये तर तृतीय पारितोषिक पन्नास हजार रुपये ठेवण्यात आले आहे. याशिवाय उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, मालिकावीर, सामनावीर व क्षेत्ररक्षक अशा वैयक्तिक पुरस्कारांचाही समावेश आहे.यवतमाळ सह कळंब, आर्णी, राळेगाव, दारव्हा, बाभुळगाव आणि अकोला बाजार येथील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला आहे. स्थानिक खेळाडूंना त्यांच्या प्रतिभेला वाव देण्यासाठी आणि दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजन समितीचे अध्यक्ष विपुल खोब्रागडे व सोनू मेश्राम यांनी सांगितले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अर्जुन समितीचे सदस्य प्रयत्नशील असून यामध्ये विपुल खोब्रागडे, सुरज मेश्राम, शत्रुघ्न राऊत, डॉ. स्वप्निल मानकर, पिंटू घोटीकर, अक्षय बानोरे, राकेश पाटील, रोहित चव्हाण, कुंदन मेश्राम, तातू मुराब, प्रसाल बाजपेयी, मयूर खुणकर, शुभम खुणकर, अजय मिश्रा, तुषार नवघरे, नारनवरे, प्रतिक मेंढे, राजू चौधरी व आतिश वनकर यांचा समावेश आहे. एकूणच, 'भीम चषक २०२६'चे दुसरे पर्व अधिक भव्य, रंगतदार आणि थरारक ठरणार असून क्रिकेटप्रेमींसाठी ही एक मोठी पर्वणी ठरणार आहे.

## निर्गुडा नदीपात्रातून रेतीची तस्करी

**यवतमाळ :** वणी तालुक्यातील निर्गुडा नदीच्या पात्रातून बेसुमार रेतीचे उत्खनन करून अहोरात्र तस्करी सुरू आहे. वणी तहसील कार्यालयाच्या पथकाने १४ नोव्हेंबरला दुपारी ३.४५ वाजता रेतीचे ट्रॅक्टर पकडून चार लाख ५० हजार ६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. रविंद्र निळकंठ उपरे (३७) रा. तहसील कार्यालय, वणी, मु. पो. घोन्सा, ता. वणी असे फिर्यादीचे नाव आहे. तर रोहन कन्हैया पारखी (३५) रा. भगतसिंग चौक, वणी असे गुन्हे दाखल झालेल्याचे नाव आहे. आरोपी हा त्याच्या ताब्यातील एमएच २९, व्ही ५१३६ या क्रमांकाच्या ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये अवैधरीत्या उत्खनन केलेली रेती विनापरवाना चोरून नेत होता. फिर्यादी उपरे यांच्या पथकाने सदर ट्रॅक्टर अडविले. कुठलेही वैध कागदपत्रे सापडले नाहीत. त्यामुळे ट्रॅक्टरसह चार टोपले असा एकूण चार लाख ५० हजार ६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी वणी पोलिसांनी गुन्हे नोंदविले आहेत.

# ११ विद्यार्थी जिल्हास्तरावर निवड

■ जनमाध्यम प्रतिनिधी

**यवतमाळ :** जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित 'नन्हे सितारे' स्पर्धेत पंचायत समिती अंतर्गत किन्ही शाळेच्या तब्बल ११ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरासाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत शाळेची गुणवत्ता अधोरेखित केली आहे. समग्र शिक्षा अभियान व ओपन लिंक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ येत्या ७ तारखेला जिल्हा परिषद हायस्कूल, यवतमाळ येथे पार पडणार आहे.

या स्पर्धेत किन्ही शाळेतील सातवीचे रोहित मनोहर धानोरकर, प्रेम विजय कुमरे, यज्ञश्री गणेश चट्टे, नीता गोपाळ राठोड, नंदिनी विष्णू मिरासे; पाचवीचे सौरव बाळू तुरी, परी अनिल तलमले; चौथीचे कुमुद विजय कुलरकर, मंथन राजेश मोहरकर; तसेच तिसरीची वैदेही मोहन तिरमारे व मुकुंदा गजानन कुलरकर या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या यशामागे शाळेच्या शिक्षिका वनिता झुरळे यांचे मार्गदर्शन लाभले असून, मुख्याध्यापिका आशा महल्ले यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले आहे. तसेच प्रकल्प संचालक राम हटकर यांच्या मार्गदर्शनाखाली मागील तीन महिन्यांपासून विद्यार्थ्यांची या स्पर्धेसाठी विशेष तयारी करण्यात आली होती. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे व्हिडिओ तयार करून 'विनोबा ॲप'च्या माध्यमातून सहभागाची संधी देण्यात आली. शाळास्तरावरून निवड झाल्यानंतर इयत्ता व विषयानुसार निकष लावून जिल्हास्तरासाठी अंतिम निवड करण्यात आली आहे.कथाकथन, स्पेलिंग बी, कविता सादरीकरण, स्पोकन इंग्लिश, महावाचन अशा विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळाली असून त्यांच्या आत्मविश्वासातही लक्षणीय वाढ झाली आहे. या यशामुळे किन्ही शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## तरुणास बेदम मारहाण

**यवतमाळ :** रामनवमीच्या मिरवणुकीत मला तू का ढकलून दिले, असा जाब विचारून एका तरुणास पाच जणांनी बेदम मारहाण केली. लोखंडी फायटरने डोक्यात मारून जखमी केले. ही घटना १ एप्रिलला सायंकाळी ७.५० वाजता दिग्रस येथील समुद्रा वाईनबारजवळ घडली. सुमीत विनोद राठोड (२६) रा. सावंगा बु., ता. दिग्रस, जि. यवतमाळ असे फिर्यादीचे नाव आहे. तर केतन विजय जाधव (३१) रा. महेशनगर, दिग्रस, प्रतीक भगत (३०) अधिक दोन रा. समुद्रा वाईनबारच्या मागे, दिग्रस अशी गुन्हे दाखल झालेल्यांची नावे आहेत. फिर्यादी सुमीतने आरोपी केतन जाधवला १५ हजार रुपये उसने दिले होते. ते पैसे परत मागितले असता आरोपीने संगनमत केले. आरोपी क्र. २ प्रतीक भगतने फिर्यादी सुमीतच्या दोन्ही डोळ्यात बोट टाकले. तू रामनवमीच्या रॅलीमध्ये मला का ढकलून दिले असे म्हणून लोखंडी फायटरने सुमीतच्या डोक्यावर मारून त्याला जखमी केले. शिवीगाळ करून आरोपी क्र. २ व ३ या दोघांनी फिर्यादीच्या छातीसह पोटावर लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून दिग्रस पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हे नोंदविले आहेत.

# ७ एप्रिल ला पुसद येथे डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकरांचे आगमन

■ जनमाध्यम प्रतिनिधी



**पुसद :** धम्मक्रांती प्रज्ञापर्व समिती २०२६च्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५व्या जयंती निमित्याने ७ एप्रिल ते१३एप्रिल पर्यंत सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत. धम्मक्रांती प्रज्ञापर्वाचे उद्घाटन भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या हस्ते होणार आहे.त्यांच्या आगमनानिमित्य नियोजन मिटिंगचे आयोजन पारमिता बुध्दविहार महावीर नगर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारत कांबळे हे होते. तर उपस्थिती धम्मक्रांती प्रज्ञापर्वाचे अध्यक्ष प्रा.डॉ. सुनिल खाडे अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी नरेंद्र पाटील यांच्या सामाजिक कार्याची दखल घेता त्यांची भारतीय बौद्ध महासभेच्या संस्कार विभाग सचिव पदी नियुक्ती करण्यात आली. या मिटिंगमध्ये भोलानाथ कांबळे, तुकाराम चौरे, सुखदेव भगत, यांनी आपले विचार व्यक्त केले.

डॉ.भीमराव यशवंतराव आंबेडकर आगमनानिमित्त भव्य दिव्य स्वागत करण्यासाठी स्थानिक विश्रामगृह येथून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत धम्म रॅलीचे आयोजन करण्यात आले असुन समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात येईल. या कार्यक्रमासाठी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भारतीय बौध्द महासभेचे तालुकाध्यक्ष भारत कांबळे तसेच धमक्रांती प्रज्ञापर्वाचे अध्यक्ष प्रा.डॉ.सुनील खाडे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ल. पु. कांबळे यांनी तर आभार विजय बहादुरे यांनी केले.

# गॅस तुटवड्यावर वंचितचा हल्लाबोल!

■ जनमाध्यम प्रतिनिधी

## ६ एप्रिलला राज्यव्यापी आंदोलन




**यवतमाळ :** देशात निर्माण झालेल्या गॅस सिलेंडर तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीने केंद्र सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका करत ६ एप्रिल रोजी राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. यवतमाळ येथे संविधान चौकात प्रमुख आंदोलन होणार असून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये तहसील कार्यालयांसमोर निदर्शने केली जाणार आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिका-इराण-इस्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारची विदेशनीती अपयशी ठरल्याचा आरोप वंचितने केला आहे. अमेरिकेच्या दबावाखाली इराणविरोधी भूमिका घेतल्यामुळे देशात इंधन व गॅस पुरवठा विस्कळीत झाला असून त्याचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत असल्याचे पक्षाचे म्हणणे आहे. गॅस सिलेंडरसाठी नागरिकांची होणारी परवड, वाढती दरवाढ आणि उपलब्धतेतील अनिश्चितता यामुळे गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबे संकटात सापडली आहेत. याशिवाय हॉटेल, कॅटरिंग व्यवसाय, फूड स्टॉल धारक, तसेच ऑटोरिक्षा चालकांनाही या तुटवड्याचा मोठा फटका बसत आहे.

दरम्यान, देशभरात गंभीर परिस्थिती असताना पंतप्रधान निवडणूक प्रचारात व्यस्त असल्याचा आरोप करत वंचितने सरकारवर निष्क्रियतेचा ठपका ठेवला आहे. ङ्गनरेंद्र... कब मिलेगा सिलेंडर?ङ्ग या घोषणेसह आंदोलन छेडण्यात येणार असून शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा जनतेचा रोष वाढेल, असा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनात सर्व घटकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे यांनी केले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त




### पीडीएमसी येथे अस्थमा प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात

**अमरावती :** डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,अमरावती येथील बालरोग विभाग आणि भारतीय बालरोग संघटना (IAP) नॅशनल रेस्पिरेटरी चॅप्टर, IAP अमरावती शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अस्थमा प्रशिक्षण मॉड्यूल' ही एकदिवसीय कार्यशाळा मा.अधिष्ठाता डॉ.अनिल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कार्यक्रमाच्या प्रारंभी पीडीएमसी येथील बालरोग विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. प्रतिभा काळे यांनी प्रास्ताविक करत अस्थमा या वाढत्या आजाराचे महत्त्व आणि त्याच्या योग्य व्यवस्थापनाची गरज अधोरेखित केली.डॉ. शिशिर मोडक यांनी अस्थमाचे निदान व लहान मुलांमधील अस्थमावर भाष्य केले, तर डॉ. जयंत जोशी यांनी दीर्घकालीन उपचार पद्धतीवर मार्गदर्शन केले. डॉ.शिल्पा हजारे यांनी विविध वयोगटातील मुलांमध्ये अस्थमा व्यवस्थापन तसेच acute asthma वर सविस्तर माहिती दिली. डॉ. विनोद गांधी यांनी मोठ्या मुलांमधील अस्थमा आणि कार्यशाळेतील प्रात्यक्षिक सत्रांचे मार्गदर्शन केले.दुपारच्या सत्रात 'वर्क स्टेशन' अंतर्गत पीक फ्लोमेट्री, स्पायरोमेट्री, MDI + स्पेसर, DPI व नेब्युलायझर वापराबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले.या कार्यक्रमाला वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवन टेकाडे, प्राध्यापक डॉ.सतीश तिवारी, डॉ. क्रिष्णा विल्हेकर, डॉ.बारब्दे, डॉ.संकेत पांडे, डॉ.निनाद चौधरी व इतर बालरोग तज्ज्ञ डॉक्टर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिवानी आणि डॉ. गौरी यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. शिवानी यांनी आभार प्रदर्शन केले.कार्यशाळा बालरोग तज्ज्ञांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली असून, मुलांमधील अस्थमा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यास मदत होणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.



### भाविकांना फराळाचे वाटप

**कुऱ्हा-**दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हनुमान जयंती पर्वावर कुऱ्हा येथील भाजीपाला व्यापारी तथा हनुमान भक्तांच्या वतीने श्रीक्षेत्र जहागीरपूर येथील श्री महारूद्र मारुती दर्शना करिता जाणाऱ्या सर्व भाविकांना कुऱ्हा ते आर्वी रोडवर असलेल्या हनुमान मंदीरावर सकाळी ७ ते १ वाजेपर्यत फराळ मठ्ठा वाटप करण्यात येवून जाणाऱ्या सर्व भाविकांनी लाभ घेतला.या करिता भाजीपाला व्यापारी सर्व नितीन दारोकार, सतीश वसुले, रुपेश टिंगणे, आश्विन जयस्वाल, प्रदीप धुमणखेडे, स्वाप्नील बेहरे, सुधीर शेलोकार प्रभाकर शेंडे, शैलेश बोबडे, गजानन मेश्राम, रामेश्वर दुधे, आदित्य सोनटक्के सुनिल भक्ते, प्रकाश बिरोले, शोभा हरिदास पाटील (मारडा), सुयश भक्ते, संजय भक्ते आदींनी सहकार्य करुन श्रीक्षेत्र जहागीरपूर येथे जाणाऱ्या हजारो भाविकांनी फराळाचा लाभ घेतला.



### राजर्षी शाहू महाराज वाचनालयात छत्रपती शिवरायांना अभिवादन

**तिवसा-**श्री स्वामी विवेकानंद बहू. सामाजिक संस्था अंतर्गत श्री राजर्षी शाहु महाराज सार्वजनिक वाचनालय तिवसा येथे अखंड भारताचे श्रद्धास्थान छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. महाराजांनी वयाच्या ५० व्या वर्षी रायगड किल्ल्यावर अखेरचा श्वास घेतला हा दिवस महाराष्ट्रात अत्यंत श्रद्धेने आणि अभिमानाने स्मरला जातो.३ एप्रिल १६८० रोजी हिंदवी स्वराज्याचा सुर्य अस्ताला गेला आणि एका युगपुरुषाने कायमचा निरोप घेतला.या कार्यक्रमाला प्रकाश विजयकर, प्रफुल बनसोड, दिपक धानोरकर, विशाल गडलिंग,हृषीकेश गंधे,प्रिया अनिलराव डहाके, रुपालीताई राऊत, प्रिया ध. डहाके व इतर वाचक वर्ग उपस्थित होते.

### श्री समर्थ मार्कीनाथ महाराज यात्रा महोत्सव उत्साहात

**आसेगाव पूर्णा-**भातकुली तालुक्यातील श्री तीर्थक्षेत्र मार्की येथे



दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री समर्थ मार्कीनाथ महाराज यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात.या महोत्सव काळात दररोज प्रार्थना, आरती तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.महाराजांची गावातून पालखी सोहळा काढण्यात आली. या सोहळ्यात परिसरातील विविध दिंडींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. गावातील नागरिकांसह पंचक्रोशीतील भाविकांची मोठी उपस्थिती दिसून आली.महोत्सवाचा समारोप होणार असून, त्यानिमित्त मार्कीपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या प्राचीन गोपाळपुरी देवस्थान (भुयार घर) येथे ४ एप्रिलला सायंकाळी ६ वाजता ज्वारीच्या पिठापासून तयार केलेल्या फया व डाळ-भाजीचा महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे. या महाप्रसादाचा लाभ पंचक्रोशीतील ग्रामस्थ व भाविकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

### आज शिवसेनेचा विभागीय मेळावा

**अमरावती-**आज रविवार. ४ एप्रिल रोजी दुपारी १२.०० वा प्राईम पार्क बडनेरा रोड अमरावती येथे अमरावती विभागातील शिवसेना शिंदे यांच्या पदाधिकाऱ्यांचा विभागीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.अकोला,बुलढाणा,यवतमाळ,वाशिम, अमरावती या जिल्ह्यातील मंत्री, आजी माजी खासदार, आमदार, उपनेते,लोकसभा संपर्कप्रमुख , जिल्हाप्रमुख , समन्वयक,संघटक, उप-जिल्हाप्रमुख, विधानसभा प्रमुख,तालुकाप्रमुख, शहरप्रमुख - (पुरुष, महिला व युवा), नगराध्यक्ष, महापौर ,उप- महापौर, गटनेते, जिल्हा परिषद सदस्य,नगरसेवर,शिवसेना पदाधिकारी उपस्थित राहणार आहे.

# गुरुजी फिल्डवर अन् विद्यार्थी वाऱ्यावर

**अमरावती/का.प्र.**

एकीकडे शैक्षणिक गुणवत्तेचा उदो उदो करायचा आणि दुसरीकडे शिक्षकांना अशैक्षणिक कामांच्या खाईत लोटायचे, असे दुटप्पी धोरण सध्या शासन, प्रशासनाने अवलंबले आहे. एप्रिलमध्ये 'एसआयआर' आणि 'जनगणना' ही दोन महत्त्वाची राष्ट्रीय अभियाने केंद्र शासनाद्वारे हाती घेतली आहे. या दोन्ही मोहिमांची मदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) असलेल्या शिक्षकांवर राहण्याची शक्यता आहे. आधीच शिक्षकांवर अनेक अशैक्षणिक कामे लादण्यात आली आहे. आता ऐन परिक्षा आणि निकालाच्या तोंडावर 'एसआयआर' आणि 'जनगणना' ची कामे देण्यात आलीअसल्याने शिक्षकांमध्ये नाराजी पसरली आहे.

मोहिमांचे प्रशिक्षण, वार्षिक परीक्षा, निकाल आणि इतर शैक्षणिक कामकाज असताना, प्रशासनाद्वारा नोटीस आणि कारवाईचा धाक दाखवून शिक्षकांना कामाला जुंपल्याचे चित्र जिल्हात पाहायला मिळत आहे. शिक्षण क्षेत्रातील कामाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी शासन-प्रशासनाने शिक्षकांना कायमच 'सॉफ्ट टार्गेट' केल्याचा आरोप जिल्ह्यात होत आहे. सध्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा आणि निकालाचा महत्त्वाचा काळ आहे. अशातच 'एसआयआर' पूर्वतयारीची कामे लादल्याने शिक्षकांची मोठी गोची झाली आहे.



## शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा ताण

'काम करा अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जा,' अशा शब्दांत महसुल प्रशासनाकडून तंबी दिली जात आहे. यामुळे शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे द्यायचे की, अशैक्षणिक कामेच करायची, असा संतप्त सवालही उपस्थित केला जात आहे. शिवाय 'बीएलओ'च्या कामात थोडा जरी उशीर झाला किंवा त्रुटी राहिली, तर थेट कारणे दाखवा नोटीस प्रशासनाद्वारा बजावल्य जात आहेत. सध्या शिक्षक शाळेत कमी आणि बीएलओच्या कामात जास्त व्यस्त झाले असल्याचे दिसून येते.

**परीक्षा की एसआयआर**

एप्रिल महिन्यात प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या वार्षिक परीक्षांचे नियोजन असते. विद्यार्थ्यांकडून सराव करून घेणे, परीक्षेचे पेपर काढणे, तपासणे आणि निकाल तयार करणे ही मुख्य शैक्षणिक कामे सोडून शिक्षकांना आता गृहभेटीद्वारे माहिती गोळा करावी लागणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानाला जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित होत आहे. वर्गात शिकवायचे सोडून मतदार याद्यांचे प्रमाणीकरण, मॅपिंगच्या कामातच त्यांचा दिवस जात असल्याचे चित्र आहे.तसेच या महीण्यात वर्ग १ते९वर्गाची वार्षिक परीक्षा सुरु होत आहे.तसेच नविन शैक्षणिक सत्रा करीता पटनोंदणी करणे त्या करीता विद्यार्थी शोधावे लागतात ही महत्वाची शैक्षणिक कामे आहे.एस आयआरचे काम परीक्षा संपल्या नंतर करण्यात यावे.अशी मागणी संबंधित शिक्षक करीत आहे.आता शिक्षण विभाग ११ ते २२ मार्च परीक्षा काळात पटपडताळणी करणार आहे. त्यामुळे शाळेत १००टक्के विद्यार्थी हजर राहणे महत्वाचे आहे पण या करीता शाळेत शिक्षक उपस्थित असणे महत्वाचे आहे.पण संध्दाच्या अशैक्षणिक कामा मुळे शिक्षक वर्गात कमी तर गावात घरोघरी जातांना दिसत आहे.

## शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात अंधश्रध्देला थारा नाही- डॉ.श्रीकांत पाटील

**अमरावती/का.प्र.**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात पारदर्शकता, न्यायप्रियता आणि सुयोग्य प्रशासन यावर विशेष प्रकाश टाकतांना आजच्या काळात प्रभावी नेतृत्व आणि सुशासन यासाठी शिवाजी महाराजांचे तत्त्वज्ञान अत्यंत मार्गदर्शक ठरते. विद्यार्थी तसेच तरुण पिढीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा सखोल अभ्यास करून प्रत्यक्ष जीवनात उतरवणे ही काळाची गरज आहे. सोबतच सध्या महाराष्ट्रात सुरू असलेल्या भोंदूगिरी सारखा प्रकाराला छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात थारा नव्हता असे, प्रतिपादन डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त एक अत्यंत भावपूर्ण, प्रेरणादायी आणि शैक्षणिक दृष्टया महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ परिसरात आयोजित या कार्यक्रमात इतिहास, व्यवस्थापन आणि राष्ट्रनिष्ठा यांचा संगम अनुभवायला मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा आणि व्यवस्थापन अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. भैय्यासाहेब चिखले, प्रमुख वक्ते डॉ. वैभव म्हस्के, पंचवटे सर, सुरेश रहाटे उपस्थित होते.

प्रमुख वक्ते डॉ. वैभव म्हस्के यांनी आपल्या सखोल आणि अभ्यासपूर्ण भाषणातून शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा विविध अंगांनी परामर्श घेतला. त्यांनी महाराजांची युध्दनीती, प्रशासन, गनिमी कावा, सागरी सामर्थ्य, लोककल्याणकारी राज्यकारभार याचा उल्लेख करत त्यांच्या कार्याचे आधुनिक काळातील व्यवस्थापनशास्त्राशी असलेले संबंध स्पष्ट केले.शिवाजी महाराज हे केवळ एक पराक्रमी योध्दे नव्हते, तर ते एक उत्कृष्ट



व्यवस्थापक, दूरदर्शी नेतृत्व आणि लोकाभिमुख राजा होते, असे ते म्हणाले.

यावेळी विद्यार्थ्यांनी सुध्दा शिवाजी महाराजांवर विचार मांडले, तर काहींनी घोषवाक्यांद्वारे वातावरण अधिक प्रेरणादायी केले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. डॉ. भैय्यासाहेब चिखले यांनी प्रास्ताविकेतून शिवाजी महाराजांच्या विचारधारेचा शैक्षणिक अभ्यासक्रमाशी असलेला निकट संबंध अधोरेखित केला. सूत्रसंचालन प्रा. भूषण घोंगडे, आभार अमित शिंदे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाला विभागातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# प्रा.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचा दीक्षांत समारंभ

**अमरावती/का.प्र.**

विदर्भ यूथ वेलफेयर संस्थेच्या अंतर्गत प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बडनेरा येथे बॅच २०२५ चा दीक्षांत समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण व दिमाखदार वातावरणात पार पडला. या सोहळ्यात एकूण ३७१ पदवीधर, १० पदव्युत्तर विद्यार्थी तसेच ०६ पीएच.डी. धारकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. याप्रसंगी उत्कृष्ट शैक्षणिक यश संपादन करणाऱ्या १२ गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करून त्यांना गौरविण्यात आले. या सोहळ्याला विदर्भ यूथ वेलफेयर संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, प्र-कुलगुरू संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे डॉ. महेंद्र ढोरे, कार्यकारी सदस्य पंकज देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे तसेच दीक्षांत समारंभाचे समन्वयक डॉ. स्वप्नील मोहोड उपस्थित होते.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिनंदन केले व येणाऱ्या काळात तंत्रज्ञानाची कास धरावी, असे आवाहन केले.संस्थेचे कार्यकारी सदस्य पंकज देशमुख यांनी शुभेच्छा देत स्वयंरोजगाराची कास धारावी असे आव्हान केले व महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ यूथ वेलफेयर संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख हे होते. आपल्या अध्यक्षीय





भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी सातत्य, प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रम यांचे महत्त्व पटवून दिले. तसेच, विद्यार्थ्यांनी बदलत्या तंत्रज्ञानाशी सुसंगत राहून समाजाभिमुख दृष्टीकोन ठेवावा, असेही त्यांनी आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी आवश्यक कौशल्ये, नवनवीन तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि सकारात्मक दृष्टीकोन यांचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीक्षांत शपथ घेण्यात आली व त्यानंतर विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. संपूर्ण सभागृहात आनंद, अभिमान आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांसह पालक आणि शिक्षकांनीही या ऐतिहासिक क्षणाचा आनंद लुटला.विदर्भ यूथ वेलफेयर सोसाइटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष एड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड, प्रा. गजानन काळे, प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले व महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण प्रगतीचा आलेख भविष्यात उंचावत नेण्याविषयी आशावाद व्यक्त केला.कार्यक्रमाचे प्रभावी संचालन प्रा. मानसी नानवाणी यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. स्वप्नील मोहोड यांनी आभार प्रदर्शन करून उपस्थित सर्व मान्यवर, पालक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# तालुक्यात जनगणनेसाठी ३१६ कर्मचाऱ्यांची नियुक्ती

## कर्मचाऱ्यांना दिले जाणार प्रशिक्षण;तहसीलदार ढवळे यांची माहिती

**मोर्शी/वार्ताहर**

मोर्शी तालुक्यात जनगणनेचा पहिला टप्पा एप्रिल पासून सुरू होणार आहे. यासाठी प्रशासनाच्या वतीने तयारी सुरू आहे. मोर्शी तहसीलमध्ये स्वतंत्र असा जनगणना विभाग तयार करण्यात आला आहे. यामध्ये तालुक्याची सर्व माहिती एकत्रित करण्यात येणार आहे. मोर्शी तालुक्यांत जनगणनेचे काम करण्यासाठी ३१६ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती तहसीलदार सागर ढवळे यांनी दिली.

भारतात दोन टप्प्यांत डिजिटल जनगणना होणार असून, पहिला टप्पा दि १६ मे ते दि.१४ जून २०२६ दरम्यान चालेल, ज्यामध्ये घरांची यादी आणि माहिती संकलित केली जाईल.

डिजिटल मोबाईल अँप द्वारे होणाऱ्या या सर्वेक्षणात ३३ प्रश्न विचारले जाणार आहेत. ही प्रक्रिया विकसित भारत-२०४७ साठी महत्त्वाची आहे.'विकसित भारत-२०४७' चा पाया रचण्यासाठी आणि अचूक डेटा मिळविण्यासाठी ही जनगणना महत्त्वाची असणार आहे. या जनगणना प्रक्रियेमध्ये अंदाजे ३५ लाखांहून अधिक कर्मचारी आणि प्रगणक या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. मोर्शी तालुक्यात घरयादी तसेच गटाची संख्या एकत्रित करण्यासाठी-३१६अशी आहे. ८०० नागरिकांसाठी एक गट असणार आहे. जनगणनेचो काम करण्यासाठी २६० प्रगणक, या सोबतच ४८ पर्यवेक्षक, तसेच या सर्वांना प्रशिक्षण देण्यासाठी ८ प्रशिक्षक इत्यादी कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच शिवाजी हायस्कूल येथे लवकरच जनगणने करिता नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

मोर्शी चे तहसीलदार सागर ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना विभागात नायब तहसीलदार विनोद वानखडे,लिपिक प्रकाश पुनसे, संगणक चालक अमर खोब्रागडे हे काम करीत आहे.

## हनुमान जन्मोत्सवानिमित्त तीन क्विंटल रोडग्याचा महाप्रसाद



**आसेगाव पूर्णा-**चांदूरबाजार तालुक्यातील टाकरखेडा पूर्णा येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्त हनुमान मंदिरात ४ एप्रिल रोजी रोडग्याच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सुमारे तीन क्विंटल रोडग्याचा महाप्रसाद तयार करण्यात आला.

या महाप्रसादाचा पंचकोशीतील शेकडो भाविकांनी लाभ घेतला. सकाळी १० वाजतापासून महाप्रसाद वितरणास सुरुवात झाली असून महिलांची उपस्थिती विशेष लक्षणीय होती.


दरम्यान, अजय पाटील तायडे मित्र मंडळाच्या वतीने सकाळी मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

# प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज बुक म्युझियम प्रस्तावाला शासनाचा सकारात्मक प्रतिसाद

## पालकमंत्र्यांचे मान्यतेसाठी जिल्हाधिकाऱ्यांना प्रेझेंटेशन सादर करण्याचे निर्देश

**अमरावती/का.प्र.**

प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज यांच्या समृद्ध, अद्वितीय आणि अमूल्य साहित्यसंपदेच्या जतन, संवर्धन व प्रभावी प्रसारासाठी प्रस्तावित 'बुक म्युझियम' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला राज्य शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने या संकल्पनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी आशादायी वातावरण निर्माण झाले आहे. वारकरी शिक्षण संस्था, तीर्थक्षेत्र बेलोरा (ता. चांदुरबाजार, जि. अमरावती) तसेच प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज साहित्य प्रचार मोहीम यांच्या शिष्टमंडळाने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची अमरावती दौऱ्यादरम्यान प्रत्यक्ष भेट घेतली. या भेटीदरम्यान शिष्टमंडळाने म्युझियमच्या संकल्पनेचा सविस्तर आढावा देत त्याची सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपयुक्तता स्पष्ट केली. यावर पालकमंत्र्यांनी अत्यंत सकारात्मक भूमिका घेत संस्थेच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले आणि संबंधित प्रस्तावाला गती देण्यासाठी तात्काळ जिल्हाधिकाऱ्यांसमोर सुस्पष्ट, सखोल व प्रभावी प्रेझेंटेशन सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले, ज्यामुळे या प्रकल्पाला प्रशासकीय स्तरावर पुढे नेण्याचा मार्ग अधिक सुलभ झाला



आहे.

विदर्भातील महान संत, तत्त्वज्ञ, विचारवंत आणि साहित्यिक म्हणून ओळख असलेल्या प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज यांच्या अद्वितीय वाङ्मयाचा व्यापक स्तरावर परिचय व्हावा आणि त्यांच्या विचारसंपदेचा लाभ समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचावा, या उदात्त उद्देशाने अमरावती येथे अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असे 'बुक म्युझियम' उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. या उपक्रमासाठी प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज साहित्य प्रचार मोहीम, महाराष्ट्र राज्यचे प्रमुख माधुर्य विस्मय ठाकरे यांनी पुढाकार घेतला असून, या माध्यमातून संतांच्या जीवनकार्याचा सखोल अभ्यास, त्यांच्या आध्यात्मिक व तत्त्वज्ञानात्मक विचारांचे प्रभावी सादरीकरण आणि त्यांच्या समृद्ध साहित्यसंपदेचे शास्त्रीय व तांत्रिक पद्धतीने जतन करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे. सुमारे सहा हजार पृष्ठांमध्ये विस्तारलेल्या १३४ ग्रंथांच्या अमूल्य साहित्याचा डिजिटल माध्यमातून सुबोध, आकर्षक आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात परिचय करून देण्याची योजना या प्रस्तावात मांडण्यात आली आहे, ज्यामुळे विद्यार्थी, संशोधक आणि सर्वसामान्य वाचक यांना या ज्ञानसंपदेचा लाभ अधिक सुलभतेने मिळू शकेल.प्रस्तावित म्युझियममध्ये आधुनिक दृकश्राव्य साधने, डिजिटल आर्काइव्हिंग प्रणाली, इंटरॅक्टिव्ह डिस्प्ले तंत्रज्ञान तसेच वाचन, अभ्यास आणि संशोधनासाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. यात आली आहे.

# किशोरवयीन मुले आणि मानसिक आरोग्य

**जगभरात १०-१९ वयोगटातील सातपैकी एका मुलाला मानसिक आरोग्य समस्या आहे. तरीही या समस्या मोठ्या प्रमाणात ओळखल्या जात नाहीत आणि त्यांच्यावर उपचार केले जात नाहीत. अभ्यासात असे आढळून आले की, शाळकरी मुलांपैकी २३.३३ टक्के मुलांना मानसिक आरोग्य समस्या आहेत. अभ्यासाचा ताण, सोशल मीडियाचा अतिवापर आणि कुटुंबातील बिघाड यामुळे ताणतणाव वाढतो. यातील ४३ टक्के विद्यार्थ्यांनी मूड स्विंगची तक्रार केली तर ११ टक्के विद्यार्थ्यांनी चिंतेसंदर्भात समस्या व्यक्त केली. १० टक्क्यांपेक्षा कमी तरुण भारतीयांना औपचारिक मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध आहेत. बहुतेक किशोरवयीन मुले मानसिक आरोग्य विकारांसाठी मदत घेण्यास कचरतात.**



आजच्या आधुनिक युगात सर्व वयोगटातील लोकांना कधी ना कधी मानसिक आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागते किंवा तोंड द्यावे लागले असेल. आयुष्यात आनंद, सुख-समाधान आणि शांती फक्त नावापुरतीच असल्याचे दिसते. असे वाटते की, प्रत्येक जण स्पर्धेत भाग घेण्यासाठी जगत आहे. अगदी किशोरवयीन मुलांमध्येही आजकाल मानसिक आरोग्य समस्यांचा प्रश्न गंभीर पातळीवर पोहोचला आहे. किशोरवयीन मुलांमध्ये सातत्याने वाढणारे गुन्हेगारीचे प्रमाण हीदेखील एक गंभीर समस्या आहे. या वयातील मुलांमध्ये राग, चिडचिडेपणा, ताणतणाव, द्वेष, सहनशीलतेचा अभाव, सोशल मीडियाचे व्यसन आणि अमली पदार्थांचे सेवन यासारख्या समस्या झपाट्याने वाढत आहेत. शाळकरी मुलांद्वारे त्यांच्या शिक्षकांवरही हल्ला करण्याच्या घटना अनेकदा नोंदवल्या जातात. लहान वयात गर्लफ्रेंड आणि बॉयफ्रेंड असण्याचा ट्रेंड, सोशल मीडिया, ऑनलाईन गेमिंग, ड्रग्जचे व्यसन, खोटा देखावा, खोटे बोलणे, संस्कारांचा अभाव, नैतिकतेचा अभाव, चारित्र्याचा अभाव आणि अश्लीलता यांनी समाजाला विषारी बनवले आहे.

दुसरीकडे पालकांचा मुलांवर नियंत्रणाचा अभाव, मुलांवर आंधळा विश्वास, वाईट संगत, मुले आयुष्यातील वाईट गोष्टी किंवा घडत असलेल्या घटनांना विरोध करण्यास घाबरतात, काही भीतीच्या सावलीत जगतात, पालकांनी मुलांना वेळ न देणे, संगोपनाचे सकारात्मक वातावरण निर्माण न करून देणे, मुलांकडून पालकांनी जास्त अपेक्षा ठेवणे, स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे, मुलांवर दबाव आणणे किंवा आपल्या इच्छा त्यांच्यावर लादणे आणि पालकांची त्यांच्या मुलांच्या भावना समजून घेण्यास असमर्थता हीदेखील किशोरवयीन मुलांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण करणारी कारणे आहेत.

किशोरवयीन मुलांमध्ये वाढत्या मानसिक आरोग्य समस्येबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी 'जागतिक किशोर मानसिक आरोग्य दिन' साजरा केला जातो. हा दिवस जागरूकता वाढवणे, कलंक कमी करणे, चिंता, ताण आणि नैराश्यासारख्या किशोरवयीन आरोग्य आव्हानांबद्दल खुल्या संभाषणांना प्रोत्साहन देणे तसेच स्वतःची काळजी घेण्याच्या धोरणांवर लक्ष केंद्रित करणे यावर भर दिला जातो. २०२६ची थीम 'किशोरवयीन विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळांमध्ये निरोगी आणि कल्याणकारी उपक्रमांचे नेतृत्व करण्यास सक्षम करणे' अशी आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते किशोरवयीन मुले शारीरिक, भावनिक आणि सामाजिक बदलांमुळे मानसिक आरोग्य समस्यांना बळी पडतात, ज्यात गरिबी, गैरवापर किंवा हिंसाचार यांचा समावेश आहे. त्यांना या समस्यांपासून वाचवणे आणि चांगल्या जीवनासाठी आवश्यक असलेले आल्हाददायक संगोपनाचे वातावरण निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. असा अंदाज आहे की, जगभरात १०-१९ वयोगटातील सातपैकी एका मुलाला मानसिक आरोग्य समस्या आहे. हे सर्व जागतिक आजारांपैकी १५ टक्के आहे, तरीही या समस्या मोठ्या प्रमाणात ओळखल्या जात नाहीत आणि त्यांच्यावर उपचार केले जात नाहीत. आयुष्यभर होणाऱ्या मानसिक आजारांपैकी अर्धे आजार वयाच्या १४व्या वर्षी सुरू होतात. मानसिक आरोग्य समस्या असलेल्या मुलांना सामाजिक बहिष्कार, भेदभाव, कलंक, शैक्षणिक अडचणी, जोखीम पत्करण्याचे वर्तन, शारीरिक आजार आणि मानवी हक्कांचे उल्लंघन यांचा सामना करावा लागतो. वर्तणुकीशी संबंधित मानसिक विकार हे मोठ्या वयाच्या किशोरवयीन मुलांपेक्षा तरुण किशोरवयीन मुलांमध्ये अधिक सामान्य आहेत. नैराश्य, चिंता आणि वर्तणुकीशी संबंधित विकार हे किशोरवयीन मुलांमध्ये आजार आणि अपंगत्वाची प्रमुख कारणे आहेत.

१५-२९ वयोगटातील मुलांमध्ये आत्महत्या हे मृत्यूचे तिसरे प्रमुख कारण आहे. आवश्यक आरोग्य सेवेची उपलब्धता नसल्याने, मुले मोठी होताना समाजात आणि कुटुंबात योग्य स्थान मिळवू शकत नाहीत, ज्यामुळे जीवनात अनेक संघर्षांना तोंड द्यावे लागते. अटेंशन डेफिसिट हायपरॲक्टिव्हिटी डिसऑर्डर, अतिक्रियाशीलता विकार आणि वर्तणुकीशी संबंधित विकार किशोरवयीन मुलांच्या शिक्षणावर परिणाम करू शकतात आणि गुन्हेगारी वर्तनाचा धोका वाढवू शकतात, जो संपूर्ण मानवी समाजासाठी चिंतेचा विषय आहे.

मुलांना योग्य वेळी आधार देणे महत्त्वाचे आहे, त्यांच्यासोबत मित्र म्हणून वेळ घालवणेदेखील महत्त्वाचे आहे. फक्त आपली मुले आहेत म्हणून त्यांच्या चुका झाकणे किंवा ते हट्टी आहेत म्हणून त्यांच्या बेकायदेशीर मागण्या पूर्ण करणे हे पूर्णपणे चुकीचे आहे. आज आपण जगभरात आणि समाजात जे गुन्हेगार पाहतो, कदाचित जर त्यांच्या पालकांनी त्यांना योग्य वेळी चांगले संगोपन, मूल्ये आणि पोषक वातावरण दिले असते, तर ते आज समाजासाठी एक भयंकर 'शाप' बनले नसते. समस्या सोडविण्यासाठी परस्पर कौशल्ये विकसित करणे आणि भावनांचे व्यवस्थापन कसे करावे हे शिकणे आवश्यक आहे. घर, कुटुंब, शाळा आणि व्यापक समुदायामध्ये संरक्षणात्मक आणि आल्हाददायक सहाय्यक वातावरण अत्यंत महत्त्वाचे आहे.

अभ्यासात असे आढळून आले की, शाळकरी मुलांपैकी २३.३३ टक्के मुलांना मानसिक आरोग्य समस्या आहेत. अभ्यासाचा ताण, सोशल मीडियाचा अतिवापर आणि कुटुंबातील बिघाड यामुळे ताणतणाव वाढतो. यातील ४३ टक्के विद्यार्थ्यांनी मूड स्विंगची तक्रार केली तर ११ टक्के विद्यार्थ्यांनी चिंतेसंदर्भात समस्या व्यक्त केली. १० टक्क्यांपेक्षा कमी तरुण भारतीयांना औपचारिक मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध आहेत. बहुतेक किशोरवयीन मुले मानसिक आरोग्य विकारांसाठी मदत घेण्यास कचरतात. सायबरबुलिंग, सामाजिक तुलना आणि इंटरनेट व्यसन वाढत आहे आणि १५-१९ वयोगटातील मुलांमध्ये अल्कोहोलचा वापर जास्त आहे. १३-१७ वयोगटातील अंदाजे ७ टक्के किशोरवयीन मुलांमध्ये मानसिक आरोग्य विकार आहेत आणि तरुणांमध्ये आत्महत्या हे मृत्यूचे प्रमुख कारण आहे.

पालकांनी त्यांच्या मुलांसोबत वेळ घालवणे महत्त्वाचे आहे जेणेकरून त्यांना भावनिकदृष्ट्या बळकटी मिळेल आणि मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण होईल. मुलांमध्ये चांगली मूल्ये रुजवणे, भेदभाव दुर्लक्षित करून मानवतेचा संदेश पसरवणे आणि राष्ट्रसेवेला प्राधान्य देणे या गोष्टी मुलांमध्ये रुजविण्याची प्राथमिक कर्तव्ये पालक आणि शिक्षकांची आहेत. अशा प्रकारे मुलांमध्ये मानसिक आरोग्य समस्या निर्माण होण्याची शक्यता टाळता येईल.

**डॉ. प्रीतम भी. गेडाम**

# मराठी शाळा: शोध आणि बोध



मराठी शाळांचा घटता आलेख हा केवळ शैक्षणिक प्रश्न नसून तो सामाजिक आणि सांस्कृतिक चिंतेचा विषय आहे. मराठी भाषेला 'अभिजात' दर्जा मिळाला असला तरी, प्रत्यक्ष शिक्षणात मराठी शाळांसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. मराठी शाळा नेमक्या कुठे कमी पडतात, याचा वेध घेणे आणि त्यातून बोध घेऊन सुधारणा करणे काळाची गरज आहे.

**मराठी शाळा कुठे कमी पडतात?**

**पायाभूत सुविधांचा अभाव:** खाजगी इंग्रजी शाळांच्या तुलनेत अनेक मराठी शाळांमध्ये अद्ययावत प्रयोगशाळा, संगणक कक्ष, भव्य मैदाने आणि आधुनिक इमारतींची कमतरता भासते. काही ठिकाणी तर मोडकळीस आलेल्या वर्गखोल्या आणि अस्वच्छ प्रसाधनगृहे ही मोठी समस्या आहे.

**इंग्रजी भाषेची भीती आणि न्यूनगंड:** पालकांमध्ये असा समज आहे की इंग्रजी माध्यमाशिवाय करिअरमध्ये प्रगती शक्य नाही. मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात (विशेषतः विज्ञान आणि तंत्रज्ञान) इंग्रजी भाषेचा अचानक सामना करावा लागतो, ज्यामुळे त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होऊ शकतो.

**प्रशासकीय उदासीनता:** सरकारी स्तरावर नवीन मराठी शाळांना मान्यता मिळण्यास विलंब होणे, शिक्षकांची अपुरी संख्या आणि अनुदानाचे प्रश्न यामुळे शाळांचा दर्जा राखणे कठीण जाते.

**पालकांचा कल:** सामाजिक प्रतिष्ठेसाठी आपल्या पाल्याला इंग्रजी शाळेत घालण्याकडे पालकांचा वाढता ओढा मराठी शाळांच्या विद्यार्थी संख्येवर परिणाम करत आहे.

**स्थलांतर:** विशेषतः ग्रामीण भागातून रोजगारासाठी होणाऱ्या स्थलांतरामुळे खेडेगावातील शाळांमधील विद्यार्थी संख्या घटून त्या बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

**उपायांचा मार्ग**

**सेमी-इंग्रजीचा प्रभावी वापर:** मराठी माध्यमात गणित आणि विज्ञान हे विषय सुरुवातीपासून इंग्रजीतून शिकवल्यास विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात अडचण येणार नाही.

**तंत्रज्ञानाची जोड:** मराठी शाळांनी 'डिजिटल क्लासरूम', ई-लर्निंग आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांची कास धरल्यास त्या खाजगी शाळांच्या स्पर्धेत टिकू शकतील.

**गुणवत्ता सुधार:** केवळ भाषा टिकवण्यासाठी नव्हे, तर 'उत्तम दर्जाचे शिक्षण' देण्यासाठी मराठी शाळांनी स्वतःला सिद्ध करणे आवश्यक आहे. शिक्षकांसाठी अद्ययावत प्रशिक्षण कार्यक्रम राबवले पाहिजेत.

**सरकारी पाठबळ:** शासनाने पायाभूत सुविधांसाठी भरीव निधी उपलब्ध करून देणे आणि रिक्त शिक्षक पदे त्वरित भरणे गरजेचे आहे.

**सामाजिक चळवळ:** मराठी शाळा टिकवणे ही केवळ सरकारची जबाबदारी नसून, समाजातील सुशिक्षित वर्ग आणि पालकांनीही मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व ओळखून पुढाकार घेतला पाहिजे.

**निष्कर्ष**

मातृभाषेतून शिक्षण हे मुलांच्या नैसर्गिक विकासासाठी सर्वोत्तम असते हे अनेक संशोधनातून सिद्ध झाले आहे. जर मराठी शाळांनी आधुनिकता, तंत्रज्ञान आणि इंग्रजी भाषेचे व्यावहारिक ज्ञान यांची सांगड घातली, तर त्या पुन्हा एकदा गरुडझेप घेऊ शकतील.

**सुधीर केणे**
मो.९४२००६१६४१

# मदरशांचे वास्तव



महाराष्ट्र सरकारने राज्यातील ३०८ मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी आणि धार्मिक शिक्षण न देता विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी आणि इंग्रजी हे विषय शिकवले जाण्यासाठी, तसेच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेच्या अंतर्गत २१ जिल्ह्यातील मदरशांना ५० लाख रुपयांचे अनुदान संमत केले आहे. अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण विकासाचे नाव देऊन हा निधी वाटप केला जात आहे जो हिंदूंच्या करातून प्राप्त झालेला आहे.आजवर अनेकदा मदरशांच्या संदर्भातील निधीचा अपहाराच्या प्रकरणात आतंकवाद हाच मूलभूत घटक समोर आला आहे तसेच धर्मांतराचे केंद्र असल्याचे सिद्ध झाले आहे. मध्य प्रदेशातील २७ मदरशांमध्ये अनेक हिंदू मुलांना इस्लाम धर्म स्वीकारण्याचे लक्ष केले गेले आहे. अनेक मदरशांवर बेकायदेशीर परदेशी निधी मिळवण्याचे आणि त्याचा उपयोग राष्ट्र, धर्म विरोधी कृत्यांसाठी केला जात असल्याचे अनेक प्रकरणे समोर आली आहेत.

उत्तर प्रदेश मधील ५५८ मदरशां मध्ये विद्यार्थ्यांच्या माध्यान्ह आहार योजनेत मोठ्या प्रमाणात अपहार झाला आहे. मदरशांनी योजनेतील निधी हडपल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी माध्यान्ह आहार प्राधिकरणाच्या संचालिका मोनिका राणी यांनी चौकशीचे आदेश दिले आहे.मदरशातील मौलवींकडून मुलांवर लैंगिक अत्याचारही केले जातात.मशिदी आणि मदरसे यांना आतंकवादाचे आणि हिंदूच्या धर्मांतराचे केंद्र म्हटले जाते. आधुनिक पद्धतीचे शस्त्रास्त्रे इथे सापडतात तसेच अनेक आतंकवाद्यांना सुरक्षित आश्रय दिला जातो. अपहार, घोटाळा, घातपती कृत्य किंवा आतंकवादी आक्रमणे यात मदरशांचा सहभाग असल्याचे अनेकदा उघड झाले आहे.शेकडोंच्या संख्येतील मदरशांवर इतक्या मोठ्या प्रमाणात आरोप होऊन ही हा विषय ना कुठे मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध होतो ना कुठल्या वृत्तवाहिनीवर याविषयी चर्चासत्रे आयोजित केली जातात. मदरशातील कुकृत्ये दाबली जातात.

उत्तर प्रदेश, आसाम, जम्मू काश्मीरमध्ये मशिदी आणि मदरसे यांची सखोल माहिती गोळ्या करण्याची मोहीम हाती घेतली आहे यावर लगेचच मौलवींकडून आक्षेप घेतला गेला आहे. भारतात मदरसा शिक्षण पद्धतीची आवश्यकता नाही कारण मुसलमान सोडून अन्य धर्मीयांच्या धार्मिक स्थळांमधून शिक्षण पद्धत राबवली जात नाही. मदरसे हे शिक्षण केंद्र नसून केवळ धार्मिक परंपरा शिकवण्याचे ठिकाणे आहेत. यांना मिळणारा पैसा, त्याचा विनियोग याची चौकशी करणे गरजेचे आहे. राज्यात संस्कृत पाठशाळा आणि हिंदू धर्माच्या संवर्धनासाठी काम करणाऱ्या संस्था यांना निधी देताना हात आखडता घेतला जातो . निधर्मी देशातील सर्व धर्मीयांच्या धार्मिक स्थळासाठी नव्हे तर केवळ मदरशांनाच दिले जाणारे अनुदान म्हणजे लांगूनचालनाचा भाग आहे. शैक्षणिक आणि धार्मिक संस्थांचा वापर देशाची एकात्मता, सुरक्षितता आणि विकास रोखण्यासाठी केला जात असेल तर ते राष्ट्रहित विरोधीच आहे.राष्ट्रनिष्ठा, कायद्याचे पालन आणि पारदर्शकता यांच्या चौकटीतच देशहितावह कार्य केले पाहिजे यातूनच सशक्त, सुरक्षित आणि आत्मनिर्भर भारताची निर्मिती होईल.

**लीना गाडगीळ**

## विचारांचा आरसा...

शुध्द असु दे विचार तुझे
विकृती त्यामध्ये असु
नये
साधा विचार सदा असु
दे
क्लिष्टतेला थाराही नसु
दे...


विचारांची आवर्त ऊभीशी
कृतीतुनी सा-या सावरती
फळे रसाळ शुध्द
बीजाशी
तैसीच कृती
विचारांतुनी...

स्वच्छ विचार असो
इतका
सुंदर दिसावा चेहरा हसरा
अहंकाराचा दर्प फसवा
किर्ती, यशानी, देहा
सजवा...

अपुला चेहरा, सदा बघावा
ईष्ट विचारा देवून थारा
लख्ख दिसता, तुम्ही
तुम्हाला,
प्रतीमा उत्कट दावी
आरसा..

**ॲड.सुलभा गोगरकर,**
अमरावती
मो.९४२३६००४६८

# गणनेमधून कळेल सारे...



संपूर्ण जगाला वेढून टाकणारी करोनाची महासाथ आली नसती तर सन २०२१मध्ये भारतामध्ये जनगणनेची प्रक्रिया राबवली गेली असती. करोनामुळे ती सुमारे पाच वर्षे रखडली. ही प्रतीक्षा संपून या प्रक्रियेला आज, १ एप्रिलपासून सुरुवात झाली आहे. पश्चिम बंगाल वगळता देशभरातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये आज जनगणनेस प्रारंभ होईल. याआधी सन २०११मध्ये झालेल्या जनगणनेने देशाची लोकसंख्या साधारण १.२१ अब्ज असल्याचे नोंदवले होते. हा आकडा आता १.४६ अब्जच्या घरात जाईल, असा अदमास आहे.

जनगणनेची प्रक्रिया म्हणजे मोजणी हे खरेच, मात्र त्यापलीकडे त्याचे विविधांगी आयाम आहेत. आपल्या देशातील सामान्य माणसाचे जगणे हे सरकारी योजना, सरकारी अनुदाने, निधीवाटप अशा गोष्टींशी खूप घट्टपणे जोडलेले आहे. त्यात आपल्याकडील एकूण सामाजिक रचना उभ्याआडव्या धाग्यांनी बांधलेली आणि अतिशय गुंतागुंतीची अशी. त्यामुळे या अशा असंख्य घटकांच्या अनुषंगाने योजना आखायच्या तर त्यासाठी हाती शास्त्रशुद्ध रीतीची आकडेवारी हवी. त्यासाठी हवी ती जनगणना .

आजपासून सुरू होणाऱ्या या जनगणनेतील सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा ठरणार आहे तो जातगणनेचा. राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आरक्षणांचा मुद्दा सध्या कळीचा ठरतो आहे आणि तेवढाच संवेदनशीलही. त्यातून अनेकदा तंटेबखेडे उभे राहिलेले आहेत, न्यायालयांत त्यावरून लढाया सुरू आहेत. या अतिशय जटिल अशा प्रश्नांवर तोडगा काढायचा असेल तर त्यास जातगणनेवाचून दुसरा पर्याय दिसत नाही. या जनगणनेतून व जातगणनेतून हाती येणारे निष्कर्ष कदाचित देशाच्या महत्त्वाच्या अशा धोरणात्मक वाटांवर मोठे बदल घडवून आणतील. ते बदल स्वीकारण्याची मानसिकता प्रत्येकालाच ठेवावी लागेल.

मोबाइल, इंटरनेट यांचा वापर उथळ रंजनाच्या पलीकडेही करता येऊ शकतो, हे दाखवण्याची ही संधीच जणू! याच डिजिटल युगाला अनुसरून उद्भवलेला मोठा धोका म्हणजे खासगीपणावरील अतिक्रमण. जनगणनेत, जातगणनेत प्रत्येकाचीच खासगी माहिती सरकारदरबारी नोंद होणार. मात्र त्यात खासगीपणाला धोका पोहोचणार नाही, अशी ग्वाही जनगणना आयुक्त मृत्युंजयकुमार नारायण यांनी दिलेली आहे. त्यावर विश्वास ठेवून, जनगणनेस घरी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना संपूर्ण सहकार्य करणे हे सगळ्यांचेच कर्तव्य ठरते. ते तमाम देशवासी पार पाडतील, ही आशा.

# अंधश्रद्धेच्या अंधारातून विवेकाच्या प्रकाशाकडे



मानवाच्या इतिहासाचा मागोवा घेतला तर अंधश्रद्धेची मुळे भीती, अज्ञान आणि असुरक्षिततेच्या भावनेत दडलेली दिसतात. आदिमानव जेव्हा गुहेत राहत होता, तेव्हा निसर्गातील वीज, वादळ, रोगराई किंवा मृत्यू यांसारख्या अनाकलनीय घटनांनी त्याला भयभीत केले. त्या अज्ञात शक्तींना शांत करण्यासाठी त्याने प्रार्थना, विधी आणि विविध श्रद्धांचा आधार घेतला. त्या काळी ते स्वाभाविकही होते, कारण विज्ञान आणि तर्कशास्त्राची साधने त्याच्याकडे नव्हती.

कधी एखादा योगायोग घडला आणि संकटातून सुटका झाली, की त्या योगायोगामागे एखाद्या अदृश्य शक्तीचा हात आहे असा समज निर्माण झाला. काही घटना जुळून आल्या की त्यांना कारण-परिणामाचा संबंध जोडला गेला.हळूहळू त्या समजुती प्रथा बनल्या आणि प्रथा परंपरेत रुपांतरित झाल्या.अशा प्रकारे अंधश्रद्धेचे चक्र समाजात फिरू लागले.

काळ बदलला, समाज प्रगत झाला, विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मानवी जीवनात क्रांती घडवली; पण अंधश्रद्धेची सावली पूर्णपणे नाहीशी झाली नाही. उलट ती अनेकदा नव्या रूपात समाजात पसरताना दिसते. आजही अनेकांना भविष्य जाणून घेण्याची तीव्र उत्सुकता असते. अनिश्चिततेच्या भीतीमुळे माणूस अशा गोष्टींच्या मागे लागतो ज्या त्याला खोटा दिलासा देतात.याच मानासिकतेचा फायदा घेऊन बुवाबाजी, तंत्र-मंत्र आणि फलज्योतिष यांसारख्या गोष्टी समाजात बळावतात. ग्रह-तारे, राशी, जन्मतारीख यांवरून माणसाचे संपूर्ण आयुष्य ठरते असा दावा केला जातो. तरीही अनेक लोक भविष्य जाणून घेण्याच्या मोहात या गोष्टींवर विश्वास ठेवतात आणि नकळतपणे परावलंबी बनतात.

लोकांच्या भीतीचा फायदा घेऊन त्यांची आर्थिक, मानसिक आणि भावनिक लुबाडणूक केली जाते. काही वेळा तर अंधविश्वासाच्या नावाखाली अमानवी आणि गुन्हेगारी प्रकारही घडतात. परंतु भारतीय समाजात विवेकाचा आवाज नेहमीच उठत राहिला आहे. आपल्या संतपरंपरेने शतकांपूर्वीच अंधविश्वासाला आव्हान दिले. संत तुकाराम, संत जनाबाई यांसारख्या संतांनी कर्मकांडापेक्षा विवेक, माणुसकी आणि सदाचाराचा मार्ग दाखवला. त्यांनी भक्ती म्हणजे आंधळा विश्वास नसून सत्य, प्रामाणिकपणा आणि माणसांवरील प्रेम आहे, हे समाजाला शिकवले.हा विचार पुढे संत गाडगेबाबांनी कृतीतून समाजात रुजवला. त्यांनी गावोगावी फिरून स्वच्छता, विवेक आणि सामाजिक जागृतीचा संदेश दिला.भोंदूगिरी आणि आंधळ्या धार्मिकतेवर त्यांनी कठोर प्रहार केला. देव शोधायचा असेल तर तो माणसाच्या सेवेत आहे, भीती दाखवून लोकांना फसवणाऱ्या शोषण करणाऱ्या भोंदूंच्या जाळ्यात नव्हे, हा त्यांचा स्पष्ट संदेश होता.

विज्ञान आणि तंत्रज्ञान शिकवले जाते; पण 'विचार कसा करावा' हे शिकवणारा चिकित्सक दृष्टिकोन अजूनही शिक्षणात पुरेशा प्रमाणात दिसत नाही. केवळ पदवी मिळाल्याने विवेक तयार होत नाही. प्रश्न विचारण्याची सवय, पुराव्यांवर विश्वास ठेवण्याची वृत्ती आणि तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता विकसित होणे अत्यंत आवश्यक आहे.

आज अंधश्रद्धेमुळे होणारे शोषण केवळ एखाद्या गावापुरते मर्यादित राहिलेले नाही. देशात आणि जगभरातही आर्थिक, मानसिक आणि सामाजिक पातळीवर त्याचे गंभीर परिणाम दिसून येतात. त्यामुळे समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकाची गरज पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची झाली आहे.माणसाने जर साधा तर्क वापरला, पुराव्यावर विश्वास ठेवला आणि विवेकाला मार्गदर्शक मानले, तर अंधश्रद्धेची साखळी आपोआप तुटू शकते. जीवनात दिसणारे अनेक 'चमत्कार' हे प्रत्यक्षात अज्ञानामुळे निर्माण झालेले भास असतात. विवेकाचा प्रकाश पडला की ते भास नाहीसे होतात.म्हणूनच आज काळाची गरज आहे ती भीतीच्या अंधारातून बाहेर पडून विज्ञान, विवेक आणि माणुसकीच्या प्रकाशाकडे वाटचाल करण्याची. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण झाला तरच अंधश्रद्धेचे जाळे कमकुवत होईल आणि माणूस खऱ्या अर्थाने स्वतंत्र, स्वाभिमानी आणि जागरूक नागरिक म्हणून उभा राहील.

**प्रफुल्ल मंदा श्रीधर**
मो.९६६५१८५४२८

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

# पुरस्कार प्राप्त सरपंचाच्या गावाची दुरावस्था!

## खेट्रीत घाणीचे साम्राज्य; नागरिकांचे आरोग्य धोक्यात, प्रशासन बेफिकीर

■ नासीर शेख ■

***खेट्री :*** *स्वच्छता आणि विकासाच्या कामांसाठी पुरस्कार मिळवलेल्या सरपंचाच्या गावातच घाणीचे साम्राज्य पसरल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. पातूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या खेट्री गावात सांडपाणी रस्त्यावर वाहत असून अस्वच्छतेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पुरस्कार आणि वास्तव यातील तफावत पाहून ग्रामस्थांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.*



गावातील बसस्थानकापासून मुख्य रस्त्यावर जाताना सर्वत्र घाण, चिखल आणि साचलेले सांडपाणी दिसून येते. झोपडपट्टी परिसरासह अनेक भागांत नाल्यांची कोणतीही ठोस व्यवस्था नसल्याने सांडपाणी थेट रस्त्यावर वाहते. परिणामी, दुर्गंधी पसरून परिसर अस्वच्छ झाला असून नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, गावाचे सरपंच जहूर खान यांना स्वच्छता आणि विकासाच्या कामांसाठी पुरस्कार मिळाला असला, तरी प्रत्यक्षात गावातील परिस्थिती पूर्णपणे उलट आहे. स्वच्छतेबाबत कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात स्थानिक प्रशासन अपयशी ठरत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे.

ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करूनही पंचायत समिती आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून अद्याप कोणतीही दखल घेतली गेलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. 'पुरस्कारासाठी दाखवलेले काम आणि प्रत्यक्षात असलेली परिस्थिती यात जमीन-आस्मानाचा फरक आहे,' अशी प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

अस्वच्छतेमुळे डासांची वाढ मोठ्या प्रमाणात होत असून मलेरिया, डेंग्यू, त्वचारोग यांसारख्या आजारांचा धोका वाढला आहे. लहान मुले आणि वृद्धांना याचा सर्वाधिक फटका बसत असल्याचेही ग्रामस्थांनी सांगितले.

### स्वच्छतेवर लाखोंचा खर्च; तरीही 'जैसे थे' परिस्थिती

गाव स्वच्छ आणि सुंदर व्हावे या उद्देशाने शासनाकडून ग्रामपंचायतीला लाखो रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. मात्र, या निधीचा योग्य वापर झाला नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. कागदोपत्री विकास दाखवला जात असताना प्रत्यक्षात गावात घाणीचे साम्राज्य कायम असल्याने निधीच्या वापराबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### प्रशासनाकडून दुर्लक्षाचा आरोप

'गावात जागोजागी घाणीचे साम्राज्य पसरले आहे. नाल्यांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याने सांडपाणी रस्त्यावर साचत आहे. त्यामुळे विविध आजारांचा फैलाव वाढत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही पंचायत समितीकडून कोणतीही दखल घेतली जात नाही,'

**संतोष पाटील,**
कार्यकर्ते, उबाठा शिवसेना, खेट्री

### तातडीने कारवाईची मागणी

खेट्रीतील बिकट परिस्थिती लक्षात घेता, संबंधित प्रशासनाने तात्काळ पाहणी करून स्वच्छतेची कामे हाती घ्यावीत, सांडपाणी व्यवस्थेसाठी योग्य नाले बांधावेत आणि आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरत आहे. अन्यथा, येत्या काळात आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# उन्हाळ्यातील टंचाई टाळा, रक्तदान करा

○ सामाजिक संघटनांचे आवाहन
○ आज रक्तदान शिबिराचे आयोजन

■ प्रतिनिधी | अकोला ■



उन्हाळ्यात गरजू रुग्णांना रक्ताची टंचाई जाणवू नये यासाठी आदर्श संस्कार मंडळ, भारत विकास परिषद, राष्ट्रीय विचार मंच, बेरार एज्युकेशन सोसायटी, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, संस्कृती संवर्धन समिती, स्व. प्रा. लिलाधरजी राठी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, विद्या भारती या संस्थांसह विविध सामाजिक सहयोगी संस्थांद्वारा रविवार, ५ एप्रिल रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत येथील राලतो विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात दात्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान करावे, असे आवाहन या संघटनांद्वारा करण्यात आले.

रक्त केंद्रांमध्ये विविध शिबिराच्या माध्यमातून दात्यांनी केलेल्या रक्तदानाद्वारे रक्तसाठा उपलब्ध असतो. दरवर्षी उन्हाळ्यात रक्ताची टंचाई जाणवते. उन्हाळ्यात एकीकडे रक्ताची मागणी वाढत असताना दुसरीकडे रक्तदान शिबिराची संख्या कमी झाल्यामुळे याकाळात केंद्रात रक्ताचा तुटवडा निर्माण होतो. प्रखर उन आणि शाळा, महाविद्यालयांना असणारी सुटी यामुळे रक्तदान शिबिराची संख्या अधिकच रोडावते.

पण गरजू रुग्णांना आवश्यक असणाऱ्या रक्ताची गरज असतेच. हा विरोधाभास काही अंशी कमी व्हावा, रुग्णांना दिलासा मिळावा, त्यांची रक्तासाठीची वणवण दूर व्हावी या हेतूने दरवर्षी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. यावर्षी हे आयोजन रविवार, ५ एप्रिल रोजी करण्यात आले आहे.

यासाठी आदर्श संस्कार मंडळ, भारत विकास परिषद, राष्ट्रीय विचार मंच, बेरार एज्युकेशन सोसायटी, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, संस्कृती संवर्धन समिती, स्व. प्रा. लिलाधरजी राठी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, विद्या भारती, डॉ. हेडगेवार रक्त केंद्र या सामाजिक संघटनांसह विविध संघटनांनी पुढाकार घेतला आहे.

रविवारी आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान करावे, असे आवाहन शिबिर संयोजकांनी केले आहे.

# अकोला पोलीस दलातर्फे 'कर्तव्याबरोबरच आरोग्य' उपक्रम

## आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न



■ प्रतिनिधी | अकोला ■

पोलीस दलाचे काम तणावपूर्ण व धावपळीचे असल्याने त्यांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याच्या उद्देशाने अकोला पोलीस दलातर्फे 'कर्तव्याबरोबरच आरोग्य' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेले आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात पार पडले.

मा. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या आरोग्याची नियमित तपासणी होणे अत्यावश्यक असल्याचे लक्षात घेऊन या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शनिवारी (दि. ४ एप्रिल) रोजी पोस्टे कोतवाली, अकोला येथे हे शिबिर पार पडले. सकाळी ११.०० ते दुपारी १.३० या वेळेत मासमो केयर आयुर्वेदिक रिसर्च सेंटर, नागपूर येथील डॉ. मोनिका शहा व त्यांच्या पथकाने विविध आरोग्य तपासण्या केल्या.

शिबिरात सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांची सामान्य आरोग्य तपासणी, रक्तदाब, शुगर तपासणी तसेच शारीरिक तंदुरुस्तीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच जीवनशैली सुधारण्यासाठी आवश्यक सल्लाही देण्यात आला. सुमारे ४० ते ५० अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून तपासणी करून घेतली.

या शिबिरामागील प्रमुख उद्देश म्हणजे पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी करणे, तणावामुळे होणाऱ्या आजारांचे लवकर निदान करणे, तसेच आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता.

तज्ञांनी दिलेल्या मार्गदर्शनात नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेशी झोप, तणाव नियंत्रण तंत्रांचा वापर, तसेच योग, प्राणायाम व ध्यान यांचा दैनंदिन जीवनात समावेश करण्यावर भर देण्यात आला. धूम्रपान व मद्यपान यांसारख्या व्यसनांपासून दूर राहण्याचेही आवाहन करण्यात आले. दरम्यान, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी कर्तव्य बजावताना स्वतःचे आरोग्य सुदृढ ठेवणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित करत, अशा प्रकारचे आरोग्य शिबिरे भविष्यातही सातत्याने आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी आरोपीस पाच वर्षांची शिक्षा

■ प्रतिनिधी | अकोला ■

अल्पवयीन मुलीवरील विनयभंग व लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीस POCSO कायदा अंतर्गत ५ वर्षे सक्तमजुरी व दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. हा निकाल आज, दि. ४ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा व सत्र न्यायाधीश-१, अकोला यांनी दिला.

प्राप्त माहितीनुसार, पोलीस ठाणे पिंजर हद्दीतील कासमार (ता. बार्शी टाकळी) येथे दि. ९ जुलै २०१७ रोजी ही घटना घडली होती. फिर्यादीने आपल्या अल्पवयीन मुलीवर आरोपी प्रल्हाद उत्तम हजारे (रा. कासमार) याने विनयभंग करून लैंगिक अत्याचार केल्याची तक्रार दिली होती. याप्रकरणी पिंजर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भादंवि कलम ३५४, ३७६(२), ३२३, ५०६ तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ४, ८, १० व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज वासाडे यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते. सुनावणीदरम्यान एकूण ६ साक्षीदारांची तपासणी करण्यात आली. फिर्यादी, पीडिता व इतर साक्षीदारांच्या साक्षी ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीस दोषी ठरविले. न्यायालयाने आरोपीस भादंवि कलम ३५४ अंतर्गत १ वर्ष सक्तमजुरी व ५०० रुपये दंड, तसेच दंड न भरल्यास १५ दिवसांची साधी कैद सुनावली. याशिवाय पोक्सो कायद्याच्या कलम ८ व १० अंतर्गत ५ वर्षे सक्तमजुरी व १००० रुपये दंड, तसेच दंड न भरल्यास १ महिन्याची साधी कैद अशी शिक्षा ठोठावली.

या प्रकरणात सरकारी पक्षाची बाजू सरकारी अभियोक्ता अकोटकर यांनी मांडली. तसेच पिंजर येथील पैरवी अंमलदार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रकाश खडे व सी.एम.एस. येथील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक फजलुर रहमान काझी यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले. दरम्यान, या प्रकरणाच्या तपासासाठी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे व ठाणेप्रभारी दराडे यांनी मार्गदर्शन केले होते.

# उद्यापासून महानगरात मोफत रोग तपासणी व उपचार सप्ताह

■ प्रतिनिधी | अकोला ■

तापडिया नगराच्या मोहन भाजी भंडार परिसरातील राधा स्मृती मल्टीस्पेशालिटी रुग्णालयात उद्या सोमवार दि ६ एप्रिल ते १२ एप्रिल पर्यंत नित्य सकाळी ११ ते दु ४ वाजेपर्यंत महानगरात आठ विविध विषयातील वैद्यकीय तज्ज्ञांच्या वतीने सर्व महिला पुरुष नागरिकांसाठी मोफत रोगनिदान तपासणी व उपचार सप्ताहचे आयोजन करण्यात आले असून यात डॉ कमल किशोर लड्ढा, स्त्रीरोग तज्ञ, डॉ सुनीता लड्ढा, डॉ



उदित लड्ढा, हृदयरोग, मधुमेह व क्रिटिकल केअर तज्ञ, डॉ निशा लड्ढा, नेत्ररोग तथा फेको सर्जन, डॉ सुशांत लड्ढा, अस्थिरोग व जॉईंट रिप्लेसमेंट तज्ञ, डॉ अपर्णा लड्ढा, रेडिओलॉजिस्ट व फिटल मेडिसिन तज्ञ, डॉ प्रतिक लड्ढा, मूत्ररोग शल्य चिकित्सक, डॉ सोनम लड्ढा, रेडोलॉजिस्ट व फिटल मेडिसिन तज्ञ हे रुग्ण तपासणी करून मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिरात तपासणी सोबत शुगर, ईसीजी, एचबीए १सी, तीन महिन्याची एव्हरेज शुगर, सिरम पीएसए, प्रोस्टेट ग्रंथीची रक्त तपासणी, यूरोफलोमेटरी, लघवीची धार तपासणी, डोळ्यांची नंबर तपासणी मोफत पणे करण्यात येणार आहेत.

## जाहीर सुचना

सर्व जनतेस व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, श्री ज्ञानेश्वर दिनकर चव्हाण रा. मेहकर ता. मेहकर जि. बुलढाणा, यांनी खालील वर्णनाची मालमत्ता आय. सि. आय. सि. आय. होम फायनान्स कंपनी लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे मेहकर - १ न. प. ता. मेहकर जि. बुलढाणा च्या हद्दीतील शेत सर्व्हे क्र. ३५/२ व ३५/३ वि. उपविभागीय अधिकारी मेहकर यांच्या फैलावरील मह. प्र. क्र. एन ए पी-३४/मेहकर/५/१९९०-९१ आदेश दि. १६/०५/१९९१ प्रमाणे पारित ले-आउट नकाशातील प्लॉट क्र. २२८ ज्याचे क्षेत्रफळ १६५ चौ. मी. असून, ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : प्लॉट क्र. २१५, पश्चिमेस : रस्ता प्लॉट, ऊत्तरेस : प्लॉट क्र. २२७ व दक्षिणेस : प्लॉट क्र. २२९. येणे प्रमाणे वरील मालमत्तेचे दस्त क्र. ३८७२ दि २०/१२/२०१४ रोजीचे मुळ खरेदीखत जे मालमत्तेचे साखळी दस्त आहे ते हरविले / गहाळ झाले आहे.

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार अथवा ताबा असल्यास त्यांनी सदर सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानीशी आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही कसल्याही स्वरुपाचा आक्षेप नाही असे समजुन आय. सि. आय. सि. आय. होम फायनान्स कंपनी लि. हे वरील मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाची रक्कम वितरीत करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत वा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०४/०४/२०२६

**अधिवक्ता : संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४८४/२०२६ — प्रोसेस नं.४३३५/२०२६
चौ.ता. ११/०५/२०२६ — दिनांक : ०१/०४/२०२६

**अर्जदार :** १. बाबुराव सुदाम भगत २. भास्कर बाबुराव भगत ३. संजय बाबुराव भगत ४. राहुल बाबुराव भगत सर्व रा. पिल कॉलनी, बौद्ध विहार जवळ, शारदा निकेतन शाळेच्या गल्ली मलकापूर, अकोला.ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कांताबाई बाबुराव भगत
**पत्ता :-** रा. पिल कॉलनी, बौद्ध विहार जवळ, शारदा निकेतन शाळेच्या गल्ली मलकापूर, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कांताबाई बाबुराव भगत यांचे दि. २०/०४/२०२४ रोजी पिल कॉलनी, बौद्ध विहार जवळ, शारदा निकेतन शाळेच्या गल्ली मलकापूर, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## Change In Name

**CIVIL JUDGE SENIOR DIVISION**
**IN THE COURT OF Asgar Hyder Baig**
5th Jt Civil Judge Sr Division Amravati, Amravati, Amravati.
Spl.C.S./454/2024
Sanjay Vitthalrao Jachak Vs Subhash Motiramji Shinde
NEXT DATE : 06-05-2026

SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES (0.5, R. 1, 5.)

**To,**
**Kishor Narendra Kapile**
**Telipura Santaji Nagar Akola**
**Dist Akola, MAHARASHTRA**

Whereas Sanjay Vitthalrao Jachak has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the 06-05-2026 at 11:00 o'clock in the forenoon, to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence. Given under my hand and the seal of the Court, this 01-04-2026

**5th Jt Civil Judge Sr Division Amravati**

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४९८/२०२६ — प्रोसेस नं.४४६०/२०२६
चौ.ता. ३०/०४/२०२६ — दिनांक : ०२/०४/२०२६

**अर्जदार :** सुनंदा दिपक तेलगोटे रा. पंचशिल नगर, वाशिम रोड, बायपास, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शिवकुमार दिपक तेलगोटे
**पत्ता :-** रा. पंचशिल नगर, वाशिम रोड, बायपास, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शिवकुमार दिपक तेलगोटे यांचे दि. २५/०८/२०२५ रोजी पंचशिल नगर, वाशिम रोड, बायपास, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४५६/२०२६ — प्रोसेस नं.४३४६/२०२६
चौ.ता. १२/०६/२०२६ — दिनांक : ०१/०४/२०२६

**अर्जदार :** १. प्रल्हाद नामदेव रावरकर रा. शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, जुने खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. २. राजश्री पुंडलिक तायडे रा. निलकमल, मराठा नगर, अकोला. ता. जि. अकोला. ३. विजयश्री उर्फ स्वाती दिलीप कपडे रा. वडाळी कॅम्प, एस.आर.पी.एफ. कॅम्प, अमरावती. ता. जि. अमरावती. ४. जयश्री प्रल्हाद रावरकर रा. शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, जुने खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. ५. मयुरी प्रल्हाद रावरकर रा. शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, जुने खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : चंद्रप्रभा प्रल्हाद रावरकर
**पत्ता :-** रा. शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, जुने खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत चंद्रप्रभा प्रल्हाद रावरकर यांचे दि. १२/०२/२०२६ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटिस

सर्व आम जनतेस सूचित करण्यात येते कि आमचे पक्षकार सागर राजू शिरसाट, रा. श्रीवास्तव चौक, शिवचरण पेठ, डाबकी रोड, अकोला, ता. व जि. अकोला यांच्या मालकीचे व ताब्यातील मालमत्ता जिचे वर्णन श्रीवास्तव चौक, डाबकी रोड, अकोला, ता. व जि. अकोला येथील नझुल शिट क्र. १७ डी, नझुल प्लॉट क्र. ९/२, क्षेत्रफळ ८३.६४ चौ.मी. म्हणजेच ९०० चौ. फुट व त्यावरील बांधकाम असे असून सदर मालमत्तेच्या चतु:सिमा पूर्वेस – सर्विस लाईन; पश्चिमेस – सरकारी रोड; उत्तरेस – याच प्लॉट मधील उर्वरित जागा; दक्षिणेस – खुली जागा याप्रकारे आहेत.

वर नमूद मालमत्ता सागर राजू शिरसाट यांनी मोहम्मद अनवर अब्दुल बशीर यांचेकडून नोंदणीकृत खरेदीखत क्र. १४६६/२०२० दि. १०/०७/२०२० नुसार विकत घेतली आहे. सदर मालमत्ता विकत घेतांना श्री. सागर राजू शिरसाट यांनी सदर मालमत्तेचे यापूर्वीचे मालक रमेश कृष्णराव धारस्कर यांनी बिना ललितकुमार सांगाणी व द्वारकादास मोतीचंद सांगाणी यांना करून दिलेले नोंदणीकृत खरेदीखत क्र. ८०९/२००३ दि. ०३/०३/२००३ व बिना ललितकुमार सांगाणी तर्फे रजि. कुलमुखत्यार शेख जाफर हाजी मुजफ्फर हुसेन यांनी शेख मोसीन शेख महेबुब यांना करून दिलेले नोंदणीकृत खरेदीखत क्र. २४१७/२०११ दि. २९/०४/२०११ ताब्यात घेतले होते. सदर मुळ नोंदणीकृत खरेदीखत क्र. ८०९/२००३ दि. ०३/०३/२००३ व नोंदणीकृत खरेदीखत क्र. २४१७/२०११ दि. २९/०४/२०११ हे सागर राजू शिरसाट यांचे ताब्यातुन आजरोजी गहाळ झालेले आहे. अनेक ठिकाणी शोध घेऊनही सदर दस्तऐवज सापडले नाहीत.

वर नमुद मालमत्ता तसेच गहाळ झालेले वर नमुद मुळ दस्तऐवज कोणत्याही बँकेकडे, वित्तीय कंपनी अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोजा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास किंवा इतर कोणतीही भानगड असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसाचे आत खालील नमुद पत्त्यावर लेखी हरकत संबंधित कागदपत्रांसह द्यावी. वरील मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदर मालमत्ता हि बिनबोजा, बिनभानगडीचे असल्याचे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील व मग कुणाची काहीही हरकत आमचे पक्षकारावर लागु व बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर गहाळ झालेले मुळ दस्तऐवज कुणासही सापडले असता त्यांनी खालील नमुद पत्त्यावर संपर्क साधावा. करीता ही जाहीर नोटीस.

अकोला, दि. ०४/०४/२०२६.

**ॲड. एस. डी. तायडे**
जगदंबा नगर, खामगांव रोड, शेगांव.
मो. ९७३०८२९९२८

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४५४/२०२६ — प्रोसेस नं.४०५८/२०२६
चौ.ता. ३०/०४/२०२६ — दिनांक : २३/०३/२०२६

**अर्जदार :** १. रूख्मीनाबाई फकिरा खंडारे २. एकनाथ फकिरा खंडारे ३. सप्तफुला सुनिल पोहरे रा. अंध विद्यालयाच्या मागे, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला. ४. सखुबाई विजय अवचार रा. मु. आसोला पोस्ट चरणगाव, ता. पातूर जि. अकोला. ५. संगिता दिलीप मोरे रा. टेंभुर्णा, ता. खामगाव जि. बुलढाणा. ६. गिताबाई सुभाष गवई रा. मु. पो. व्याळा, ता. बाळापूर जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : फकिरा सखाराम खंडारे
**पत्ता :-** रा. अंध विद्यालयाच्या मागे, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत फकिरा सखाराम खंडारे यांचे दि. ०६/११/२०१३ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४७१/२०२६ — प्रोसेस नं.४१३०/२०२६
चौ.ता. ०८/०५/२०२६ — दिनांक : २४/०३/२०२६

**अर्जदार :** १. कमलाबाई सखाराम नेवारे २. रत्नाकर सखाराम नेवारे दोघेही रा. डोंगरगाव, ता. जि. अकोला. ३. प्रभाकर सखाराम नेवारे ४. मोहन सखाराम नेवारे दोघेही रा. डोंगरगाव, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सखाराम तुकाराम नेवारे
**पत्ता :-** रा. डोंगरगाव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सखाराम तुकाराम नेवारे यांचे दि. ०६/०५/२०२१ रोजी राहते घरी, डोंगरगाव, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०८/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १२१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# ३०७ वर्षांची परंपरा, श्रद्धेचा थरार
# पवनूरची गळाची रथयात्रा आजही तितकीच जिवंत

**वर्धा/ जनमाध्यम**

काळाच्या ओघात अनेक परंपरा हरवून जातात, पण काही परंपरा अशी असतात की त्या काळालाही हरवून टाकतात पवनूर येथील 'गळाची रथयात्रा' ही त्यापैकीच एक! तब्बल ३०७ वर्षांची परंपरा लाभलेली ही विदर्भातील एकमेव आणि अनोखी यात्रा ७ एप्रिल रोजी सायंकाळी भक्तिभाव, थरार आणि उत्साहाच्या संगमात पार पडणार आहे.



या यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे सुमारे ५० फूट उंच भव्य लाकडी रथ. या रथावर उभारलेल्या झुल्यावर दोन भाविक स्वतःला लटकवून संपूर्ण गावाला प्रदक्षिणा घालतात - हा क्षण अंगावर शहारे आणणारा ठरतो. गावावरचे संकट दूर व्हावे, सुख-समृद्धी नांदावी, या श्रद्धेतून ही परंपरा पिढ्यानपिढ्या जपली जात आहे.गावाच्या टोकावर वसलेली ग्रामदैवत पाताळ माता ही या यात्रेचे केंद्रबिंदू. तिच्या चरणी नतमस्तक होतच या उत्सवाची सुरुवात होते. चैत्र महिन्यातील या यात्रेमुळे गावात एक वेगळेच भावविश्व फुलते-सासरी गेलेल्या मुली माहेरी येतात, नाती पुन्हा जुळतात, आणि प्रत्येक घरात पानग्याचा नैवेद्य सुगंध पसरवतो.गेल्या महिनाभरापासून 'गळ समिती' व ग्रामस्थांनी यात्रेसाठी जोरदार तयारी केली आहे. कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन, तर वीजपुरवठ्यासाठी महावितरणचे कर्मचारी सज्ज आहेत.श्रद्धा, परंपरा आणि गावाच्या एकतेचा जिवंत उत्सव ठरणारी ही रथयात्रा मंगळवारी भक्तांच्या जयघोषात संपन्न होणार असून, पवनूर पुन्हा एकदा इतिहास जगताना दिसणार आहे.

# विरुळ परिसरात वादळी वाऱ्यासह तुफान गारपीट; रस्ता अर्धा तास जाम

**विरुळ (आकाजी)/ जनमाध्यम**

विरुळ परिसरात अचानक वादळी वारा आणि मेघगर्जनेसह दहा मिनिटे बोराच्या आकाराची गारपीट पडली. या घडामोडीमुळे आर्वी-पुलगाव रोडवरील दोन मोठमोठ्या बाभळीच्या झाडांनी रस्ता रोखला आणि वाहतूक अर्धा तास विस्कळीत झाली.





या झाडांमुळे दोन्ही बाजूने चारचाकी आणि दुचाकी वाहनांची रांग लागली होती. काही वेळा रस्ता पूर्ण जाम झाला होता, त्यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला. यावेळी शेजारील शेतात जैन ईरिगेशनचे पाईपलाइन काम सुरू होते, त्यामुळे दोन्ही बाजूच्या जेसीबी त्वरित बोलावून रस्ता मोकळा करण्यात आला आणि वाहनांची गर्दी हळूहळू कमी होऊ लागली.वादळी वाऱ्यामुळे परिसरातील अनेक घरांचे पानठेले उडाले, घरावरील टीना आणि मुशाफिरीचे झोपडे उडाले. काही ठिकाणी विद्युत पुरवठा तात्पुरता खंडित झाला.

नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.शहरातील नागरिकांनी आणि प्रवाशांनी या अचानक परिस्थितीवर सतर्क राहण्याचे आवाहन केले असून हवामान खात्यानेही पुढील काही तासात अशाच प्रकारच्या जोरदार वाऱ्याची आणि गारपीटाची शक्यता असल्याचे इशारा दिला आहे.सदर घटनेत अद्याप कोणतीही मानवी हानी झालेली नाही, मात्र हवामान आणि वृक्ष व्यवस्थापनाच्या दृष्टीने प्रशासनाने जागरूक राहण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

# बोर नदीत मिरगीचा दौरा; ३५ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

**सेलू/ हिंगणी/ जनमाध्यम**

हिंगणी येथील बोर नदीत शुक्रवारी सकाळी ३५ वर्षीय दिनेशसिंग गायकी याचा दुर्दैवी मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, दिनेशसिंग प्रातःविधीसाठी नदीकाठावर गेले असता अचानक मिरगीचा दौरा आला. यामुळे त्याचा स्वतःवरील ताबा सुटला आणि तो पाण्यात पडला. पाणी खोल असल्याने आणि शरीर साथ देत नसल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती स्थानिक नागरिकांनी सेलू पोलीस स्टेशनला दिली. पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. ही संपूर्ण कारवाई ठाणेदार देवेन्द्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या दुर्दैवी घटनेने हिंगणी परिसरात हळहळ पसरली असून, तरुणाच्या अकाली निधनाने कुटुंबावर शोककळा पसरली आहे.



## संक्षिप्त

### विषारी औषध प्राशन; व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू

**वर्धा-** विषारी औषध प्राशन केल्याने एका व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना गवंडी पोलीस स्टेशन हद्दीत उघडकीस आली आहे.माहितीनुसार, बाबुलाल तुळशीराम चौधरी यांनी विषारी औषध सेवन केल्याची बाब समोर आली आहे. प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांकडून उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद कारंजा (घाडगे) पोलिसांनी घेत मर्ग दाखल केला आहे. घटनेमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस पुढील तपास करीत आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

### पाच वर्षीय बालिकेवर अत्याचार

**आर्वी-** शहरातील पाच वर्षीय बालिकेवर अमानवीय कृत्य केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली असून संपूर्ण शहरात संतापाची लाट उसळली आहे.माहितीनुसार, बालिका शौचास गेली असता परिसरातीलच ४५ वर्षीय व्यक्तीने तिच्यावर अत्याचार केल्याचे समोर आले. या घटनेची तक्रार बालिकेच्या वडिलांनी आर्वी पोलीस ठाण्यात दाखल केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपीविरोधात कारवाई सुरू केली. जखमी बालिकेला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी कठोर कारवाईची मागणी होत असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### पानटपरीजवळून दुचाकी लंपास

**वर्धा-** पानटपरीजवळ उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना भुगाव टी-पॉईंट येथे घडली. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.माहितीनुसार, प्रफुल घोडे यांनी एमएच ३२ झेड ०३४८ क्रमांकाची दुचाकी पानठेल्याजवळ उभी करून ठेवली होती. काही वेळानंतर त्यांच्या भावाने जाऊन पाहणी केली असता दुचाकी जागेवर आढळून आली नाही. त्यानंतर अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेल्याची तक्रार सावंगी (मेघे) पोलिसांत दाखल करण्यात आली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून चोरट्यांचा शोध घेतला जात आहे.

# पुलगांव रेल्वे उपेक्षित जनता पुन्हा प्रश्नांच्या वळणावर

## हावड़ा-अहमदाबाद एक्सप्रेसचा स्टॉप बंद; लोकप्रतिनिधी कधी जागे होणार?

**पुलगाव/ जनमाध्यम**

कोरोना काळानंतरही हावड़ा-अहमदाबाद एक्सप्रेसचा पुलगांव जंक्शनवरील स्टॉप अद्यापही थांबा मंजूर झाला नाही. शहरवासीयांच्या हक्काला रेल्वे प्रशासन आणि नेते दोघांनीही पाय ठेवल्याचे निष्पन्न एशियातील सर्वात मोठा गोळाबारूद भंडार असलेला पुलगांव आज उपेक्षित ठिकाण बनले आहे




पूर्वीचे आमदार रणजीत कांबले, खासदार रामदास तड़स यांनी या विषयाकडे डोळसपणे दुर्लक्ष केले, आणि आता वर्तमान आमदार राजेश बकाने व खासदार अमर काळे यांच्याकडूनही काही दिसत नाही. शहरवासी विचारतात जर वर्धा ठिकाणी दुरंतो एक्सप्रेस थांबवता येते, तर पुलगांवमध्ये हावड़ा-अहमदाबाद एक्सप्रेस का थांबवू शकत नाही?लोकांच्या हितासाठी काही करायचे का, की निवडणुकीच्या फायद्यासाठी मुद्दा भुनवला जाईल रेल्वे प्रशासन आणि राजकीय नेत्यांच्या निष्क्रियतेमुळे पुलगांवची जनता फक्त प्रश्न विचारत आहे, उत्तर कुठे? या उपेक्षेमुळे फक्त ट्रेनचा मुद्दा नाही, शहराच्या विकासाचा प्रश्न आणि नागरिकांच्या हक्कांचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# पुलगावचा कुख्यात गुंड अकोलाच्या कारागृहात स्थानबद्ध

**वर्धा/ जनमाध्यम**

पुलगाव शहरालगत गुंजखेडा परिसरात दहशत निर्माण करणारा व अवैध दारू विक्रीस प्रवृत्त असलेला पवन दिलीप कातरे (वय २९, रा. गुंजखेडा, ता. देवळी) याला प्रशासनाने अकोला कारागृहात स्थानबद्ध केले आहे.



तपासात निष्पन्न झाले की कातरे २०१८ पासून परिसरात जबरदस्तीने पैसे उकळणे, शिवीगाळ, मारहाण आणि अवैध दारू विक्रीस सातत्याने सहभागी होता. त्याच्यावर १८ गंभीर गुन्ह्यांची नोंद असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.पोलीस निरीक्षकांच्या अहवालावरून पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांचेकडे सादर करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या आदेशानुसार एम.पी.डी.आर. कायद्यांतर्गत कातरे अकोला येथील कारागृहात स्थानबद्ध करण्यात आला.ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा व पुलगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने संयुक्तरीत्या केली. पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले की येत्या सण, उत्सव आणि निवडणुका शांततेत पार पडाव्यात यासाठी गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींवर आणि अवैध दारू विक्रेत्यांवर कठोर कारवाई सुरू राहणार आहे.या कारवाईमुळे परिसरातील गुंडगिरी कमी होण्यास आणि अवैध दारू व्यवसायावर प्रभाव पडण्याची अपेक्षा आहे.

# अचानक प्रकृती खालावली; तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

**वर्धा-** अचानक प्रकृती बिघडल्याने एका तरुणाचा सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

माहितीनुसार, सुरज शंकर राऊत यांची प्रकृती अचानक खालावल्याने त्यांना तातडीने सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी उपचार सुरू केले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच सेलू पोलिसांनी नोंद घेत मर्ग दाखल केला आहे. अचानक झालेल्या मृत्यूमुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## हनुमान जयंतीला दयाभावाचा जिवंत अविष्कार
# जखमी वानराला मिळाले नवजीवन

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

संत तुकडोजी वार्ड परिसरात हनुमान जयंतीच्या पावन दिवशी एक हृदयस्पर्शी घटना घडली. जखमी अवस्थेत तडफडणारे वानर नागरिकांच्या नजरेस पडताच त्यांनी तत्काळ जीवरक्षक फाउंडेशनला कळविले. क्षणाचाही विलंब न करता रेस्क्यू पथक घटनास्थळी दाखल झाले आणि अत्यंत संयमाने व कौशल्यपूर्ण पद्धतीने त्या मुक्या जीवाचे रक्षण केले.

भारतीय संस्कृतीत वानर हे केवळ प्राणी नसून श्रद्धेचे प्रतीक मानले जाते. हनुमान जयंतीच्या दिवशीच अशा जखमी वानराला जीवदान मिळणे, हे अनेकांसाठी भावनिक आणि दैवी योगायोग ठरले.

वानरातही हनुमानजींचे रूप पाहणाऱ्या भाविकांसाठी ही सेवा म्हणजे भक्तीचाच एक भाग असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.जीवरक्षक फाउंडेशनच्या टीमने पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मदतीने तात्काळ उपचार केले. उपचारानंतर वानराची प्रकृती स्थिर झाल्यावर त्याला पुढील काळजीसाठी वन विभागाच्या स्वाधीन करण्यात आले.या संपूर्ण कार्यात राकेश झाडे, ओम चाफले, विराज कुंभारे, नयन वैद्य, भाविक कोपरकर तसेच वन कर्मचारी योगेश पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले.

नागरिकांची सजगता आणि सेवाभावी वृत्तीमुळे एका जीवाला नवसंजीवनी मिठरली, हीच खरी हनुमान जयंतीची शिकवण ठरली.

# मीटरवर नाही, घरातच लपला आहे खर्चाचा खरा चोर...!
## वीज बिल वाढीमागचं अदृश्य सत्य उघड

**वर्धा/ जनमाध्यम**

स्मार्ट मीटर आल्यानंतर वाढलेल्या वीज बिलामुळे नागरिकांमध्ये नाराजी उसळली आहे. मात्र या वाढीचं खापर केवळ स्मार्ट मीटरवर फोडणं म्हणजे अंधारात बाण सोडण्यासारखं आहे. कारण खरी गळती तुमच्या घरातच अर्थिंग आणि 'न्यूट्रल'च्या दोषांमध्ये दडलेली असू शकते.

घरातील वीजप्रवाह हा फेजमधून उपकरणात जाऊन न्यूट्रलमार्गे परत येतो. पण अर्थिंग कमकुवत असेल किंवा वायरिंगमध्ये दोष असेल, तर ही वीज जमिनीकडे वळते. हीच 'लीकेज' तुमच्या नकळत मीटरमध्ये युनिट्स वाढवते. स्मार्ट मीटर अत्यंत अचूक असल्याने ही गळती लपून राहत नाही, आणि बिल मात्र फुगतं!जुन्या वायरिंगचं खराब इन्सुलेशन, कोरडं पडलेलं अर्थिंग, गंजलेली तांब्याची पट्टी किंवा गिझर-फ्रीजसारख्या उपकरणांतून होणारी गळती ही यामागची प्रमुख कारणं ठरतात. अनेकदा शेजाऱ्याच्या न्यूट्रलशी कनेक्शन जुळल्यासही मीटर वेगाने धावतो.

यावर उपायही तितकेच सोपे आहेत. परवानाधारक इलेक्ट्रिशियनकडून 'इन्सुलेशन टेस्ट' करून घेणं, घरात ELCB किंवा RCCB बसवणं, आणि अर्थिंग कायम ओलसर ठेवणं हे उपाय तुमचं बिल आणि जीव दोन्ही वाचवू शकतात.थोडक्यात, दोष मीटरमध्ये नसून आपल्या दुर्लक्षात आहे. तंत्रज्ञानाला दोष देण्याऐवजी घराची तपासणी आहे, कारण योग्य अर्थिंग म्हणजे केवळ सुरक्षितता नव्हे, तर खिशालाही दिलासा आहे!

## विनायक देशमुख यांचे निधन



**वर्धा–** बुरांडे ले-आऊट येथील विनायक भगवंतराव देशमुख (वय ७२) यांचे अल्प आजाराने २ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्री १.०८ वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सुन, जावई व नातवंडे असा परिवार आहे. स्थानिक मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले, ते छायाचित्रकार अमित देशमुख यांचे वडील होतं.

# अवैध व्हिडिओ गेम पार्लरवर पोलिसांची कारवाई, ४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा/ जनमाध्यम**

शहरातील शास्त्री चौक परिसरात सुरू असलेल्या अवैध व्हिडिओ गेम पार्लरवर पोलिसांनी २ एप्रिल २०२६ रोजी छापा टाकून मोठी कारवाई केली. या छाप्यात तब्बल ४ लाख १ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, रोहित किशोर अरक (वय ३२, रा. हिंगणघाट फैल, पुलगाव) या आरोपीला ताब्यात घेण्यात आले.



गोपनीय माहितीवरून पोलिसांनी मेघळ कॉम्प्लेक्स येथे छापा टाकला. चौकशीत आरोपीने सांगितले की, हिंगणघाट येथील प्रवीण वाघमारे यांनी हा पार्लर भाडेतत्त्वावर चालवला आहे.छाप्यात सुपर गोल्डन, मिनी स्पेशल बोनस, मनी पॉकर, मनी गन शॉट, मास्टर, गोल्डन ड्रॅगन या १० व्हिडिओ गेम मशीन, ६५० टोकन, रोख रक्कम, वनप्लस मोबाईल फोन आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. तपासात असेही निष्पन्न झाले की पार्लरमध्ये कोणताही वैध परवाना नव्हता आणि पैशांच्या मोबदल्यात गेम खेळवून जुगार चालवले जात होते. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष टाले यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक शरद गायकवाड, गजेंद्र धर्मे, नरेंद्र कांबळे, प्रशांत वंजारी आणि श्रवण पवार यांच्या पथकाने केली.या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळाला असून, पोलिसांनी अशा अवैध उपक्रमांवर नियमित लक्ष ठेवण्याचे आश्वासन दिले आहे.

# महाप्रसाद दरम्यान प्राणघातक हल्ला

**वर्धा/ जनमाध्यम**

हनुमान जयंतीच्या निमित्ताने मालगुजारी पुरा, येथे आयोजित महाप्रसाद कार्यक्रमात गंभीर प्रकार घडला. आरोपी अश्विन चिचपणे मद्य अवस्थेत कार्यक्रमस्थळी आला आणि महाप्रसाद बनवणाऱ्या महिलांशी अश्लील आणि अपमानास्पद वर्तन केले.महिलांच्या समर्थनार्थ राजेश महाकाळकर पुढे आले. स्थानिक नागरिकांनी अश्विनला तातडीने घरी पाठवले, परंतु त्याचे वडील मिलिंद चिचपणे यांनी त्याला चाकू उपलब्ध करून दिला. नंतर दोघांनी मिळून राजेश महाकाळकर, गौरव आटे आणि सर्वेश महाकाळकर यांच्यावर प्राणघातक हल्ल्याचा प्रयत्न केला.घटनेची तातडीची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. आरोपीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई सुरू असून तपास शहर पोलीस करत आहेत.

# 'हॅपी होम' वृद्धाश्रम लवकरच सुरू; गरजू ज्येष्ठांना मोफत निवारा

**सेलू/ जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यातील निराधार आणि गरजू ज्येष्ठ नागरिकांसाठी दिलासादायक पाऊल म्हणून त्रिवेणी चैतन्यम् ट्रस्ट, टाकळी (झडशी), ता. सेलू यांच्या वतीने 'हॅपी होम' वृद्धाश्रम लवकरच सुरू होणार आहे. 'विश्व शांती अभियान' अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे आधारविना जगणाऱ्या वृद्धांना सुरक्षित आणि सन्मानजनक जीवनाची संधी मिळणार आहे.

या वृद्धाश्रमात प्रवेश पूर्णपणे निःशुल्क असणार असून, सध्या नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्रवेशासाठी खरोखरच गरजू व निराधार ज्येष्ठांना प्राधान्य दिले जाणार असल्याची माहिती ट्रस्टतर्फे देण्यात आली.आंतर भारती आश्रम, दाभा (नागपूर) चे संस्थापक स्व. डॉ. भाऊसाहेब झिटे यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. ज्याचा कोणी नाही, त्याचे आम्ही आहोत, या तत्त्वावर आधारित हा उपक्रम ज्येष्ठांना कुटुंबवत्सल वातावरण देण्यावर भर देणार आहे.डॉ. सतीश ग. सावरकर (अध्यक्ष, त्रिवेणी चैतन्यम् ट्रस्ट) यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्य सुरू असून, एकाकीपणाचा सामना करणाऱ्या वृद्धांना मायेचा आधार देणे हा मुख्य उद्देश आहे.ज्यांना प्रवेश हवा आहे किंवा अशा गरजू ज्येष्ठांची माहिती द्यायची आहे, त्यांनी भूषण पारटरकर (९८६०६४७३८४), राजेंद्र तडस (९९२३३८३४६०), प्रकाश डवरे (९३२२९९८०७२), बंडू म्हैसकर (९७३०१६९१७२), संजय खैरकार (९८५०३६६२७२), गजानन दोडके (८८८८९३८७९६), वासुदेव सावरकर (७७९८५५२८८१) व शेखर गोहने (८३०८७८६१०६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सेवाग्राममध्ये सर्वोदय शिक्षण शिबीर; देशभरातील १०० कार्यकर्ता सहभागी

**वर्धा/ जनमाध्यम**

अखिल भारत सर्वोदय मंडलाच्या सर्व सेवा संघ अंतर्गत ५ ते ८ एप्रिल २०२६ दरम्यान सेवाग्राम परिसरात 'सर्वोदय शिक्षण शिबीर' आयोजित केले जाणार आहे. या शिबिरात देशभरातील १४ राज्यांतील सुमारे १००–११० कार्यकर्ते सहभागी होतील, जे राष्ट्रपिता महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे व लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या विचारसरणीला सखोल समजून घेण्यास उत्सुक आहेत.

शिविराच्या प्रमुख विषयांमध्ये आयडिया ऑफ इंडिया व ह्युमॅनिटी ऑफ वर्ल्ड, भारतीय संविधान व संविधानिकता, सर्वोदय विचार व कार्यक्रम, समाजातील सांस्कृतिक हस्तक्षेप आणि आगामी एक वर्षासाठी कार्ययोजना यांचा समावेश आहे. सहभागी कार्यकर्त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात नव्या ऊर्जा व मार्गदर्शनासह काम सुरू करण्यासाठी प्रशिक्षण दिले जाईल.

शिबिरात विचार-विमर्श, मार्गदर्शन सत्र, गट चर्चा, प्रार्थना, योगासन, दैनिक श्रमदान, सामूहिक खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातील.

पूर्णकालिक सहभाग आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.शिबिराचे संचालन चंदन पाल (अध्यक्ष), गौरंग महापात्रा (महामंत्री), मोहम्मद शेख हुसैन (मैनेजिंग ट्रस्टी), संतोष कुमार द्विवेदी (सर्वोदय समाज संयोजक) यांच्या मार्गदर्शनाखाली होईल. शिबिरात बजरंग सोनवणे (मुंबई), नंदलाल मास्टर (वाराणसी), डॉ. प्रशांत (बेंगळुरु) आणि इतर वरिष्ठ कार्यकर्ते मार्गदर्शन करतील.या शिबिराद्वारे कार्यकर्त्यांना नवे मार्गदर्शन मिळण्यासोबतच त्यांच्या क्षेत्रातील कार्यांना गती मिळण्याची संधी मिळणार आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १२८**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# आय.एम.ए. अमरावती शाखेची २०२६-२७ ची नवीन कार्यकारिणी घोषित

## अध्यक्ष डॉ.दिनेश वाघाडे, तर डॉ.विक्रम वानखडे सचिव

### डॉ. रोहन बोबडे यांची कोषाध्यक्ष म्हणून निवड

**अमरावती/प्रतिनिधीः-** इंडियन मेडिकल असोसिएशन अमरावती शाखेची (आयएमए अमरावती) नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे. यामध्ये अध्यक्ष म्हणून डॉ. दिनेश वाघाडे , सचिव पदावर डॉ. विक्रम वानखडे आणि कोषाध्यक्ष म्हणून डॉ. रोहन बोबडे यांची अविरोध निवड करण्यात आली आहे.

नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ छत्रपती शिवाजी महाराज ऑडिटोरियम लॉन , डॉ. पीडीएमएमसी अमरावती येथे, रविवार, दिनांक ५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे.

आयएमएच्या वर्ष २०२५-२६ चो अध्यक्ष डॉ. अल्का कुथे या नवनियुक्त अध्यक्ष डॉ.दिनेश वाघडे (वर्ष २०२६-२७) यांना अध्यक्षपदाचा कार्यभार सोपवतील. नवनियुक्त सचिव डॉ.विक्रम वानखडे हे माजी सचिव डॉ.राधा सावदेकर यांच्याकडून पदभार स्वीकारतील.




हा दिमाखदार समारंभ मा. डॉ. अनिल बोंडे , खासदार (राज्यसभेचे माननीय सदस्य), डॉ. अनिल देशमुख , (डीन डॉ. पीडिएमएमसी, अमरावती) सन्माननीय अतिथी व प्रमुख वक्ता डॉ राजन बारोकर , सीनियर क्रिटीकल केअर फिजीशियन आणि ईसीएमओ स्पेशलिस्ट किम्स - किंग्सवे हॉस्पिटल , नागपुर, अतिथी डॉ वसंत लुंगे(सहसचिव, आय एम ए मुख्यालय, नवी दिल्ली व आय एम ए. महाराष्ट्राचे पूर्व उपाध्यक्ष्य) , डॉ उध्दव देशमुख , आयएमए महाराष्ट्र माजी अध्यक्ष आणि डॉ दिनेश ठाकरे , आयएमए महाराष्ट्र माजी अध्यक्ष , या मान्यवर मंडळी च्या उपस्थितीत होणार आहे.

कार्यक्रमात सभासदांना विविध उपलब्धतेसाठी पुरस्कार वितरित केले जातील. मावळते सचिव डॉ. राधा सावदेकर वर्ष २०२५-२६ च्या कालावधीत झालेल्या विविध कामांची माहिती उपस्थितांना देतील. वर्ष २०२६-२७ च्या अमरावती आयएमए शाखेच्या नवीन कार्यकारिणीत खालील पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे:

अध्यक्ष: डॉ.दिनेश वाघाडे माजी अध्यक्ष(आय.पी.पी.): डॉ अल्का कूथे आगामी अध्यक्ष (President Elect): डॉ.संदीप दानखडे सचिव: डॉ.विक्रम वानखडे कोषाध्यक्ष: डॉ.रोहन बोबडे उपाध्यक्ष:डॉ. विक्रम देशमुख, डॉ.तृप्ति दानखडे,आणि डॉ.भूपेश भोंड सहसचिव:डॉ. आशिष डगवार, डॉ. ऋतिका लोखंडे , डॉ. सौरभ लांडे , डॉ. मृन्मयी बोबडे , कार्यकारिणी मंडळ:डॉ.विजय कूथे , डॉ. जयंत पांढरीकर , डॉ. राधा सावदेकर, डॉ. संगीता साळुंके , डॉ. सोहेल बारी , डॉ. सोनाली शिरभाते , डॉ. तृप्ती जवादे , डॉ.निलेश पाचकवडे, डॉ गौरव गोहाड, डॉ सीमा अडवाणी, डॉ नितीन जैसवाल, डॉ अंशू चांडक. तसेच अमरावती आयएमए शाखेद्वारे विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे.

सायंटिफिक कमिटी: डॉ. अपुर्वा मुंधडा आणि डॉ.अमित डफळे सांस्कृतिक कमिटी: डॉ.सौरभ अंबाडेकर आणि डॉ. तनया देशमुख स्पोर्ट्स कमिटी: डॉ.प्रणित काकडे आणि डॉ.हीमानी राठोड जनसंपर्क अधिकारी (PRO): डॉ.अक्षय चांदुरकर यांचा समावेश आहे.

# हनुमान जयंतीच्या शोभायात्रेने वेधले नागरिकांचे लक्ष



**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** हनुमान जन्मोत्सवानिमित्त यावर्षी प्रथमच नांदगाव शहरातून शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेने शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले. हनुमान जयंती उत्सव समितीच्या वतीने शहराच्या इतिहासात प्रथमच शोभायात्रा काढण्यात आली. स्थानिक गजानन महाराज मंदिरा पासून शोभायात्रा प्रारंभ झाली. यावेळी शोभा यात्रेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज, भगवान हनुमंताची मूर्ती, प्रभू रामचंद्र व विठ्ठलाची मूर्ती ,शिव पार्वती व नंदी इत्यादी विविध भव्य दिव्य मुर्त्यांनी शहवासीयांचे लक्ष वेधून घेतले होते. त्याचप्रमाणे गुरुदेव सेवा मंडळ चिखली येथील वारकरी दिंडीने नागरिकांच्या डोळ्याचे पारणे फेडले. महिला भजन मंडळ ढोल ताशे रोशनाई आतिषबाजी डीजे यांचा शोभा यात्रेमध्ये सहभाग होता. बस स्थानक परिसरात सामूहिक हनुमान चालीसाचे पठण करून शोभायात्रेची सांगता करण्यात आली. शोभा यात्रा शहरातून मार्ग क्रमण करीत असताना मुस्लिम युवकांनी सुद्धा हनुमान जन्मोत्सव शोभायात्रेचे स्वागत करून शरबत वाटप केले. त्यामुळे हिंदू मुस्लिम ऐक्याचा संदेश दिल्या गेला. नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर, उपनगराध्यक्ष अब्दुल जमीर, नगरपंचायत सभापती वासुदेव लोखंडे, कांता लोमटे, मोहम्मद रियाज नगरसेवक ,प्रांजली गुल्हाने ,मो. साजिद निलेश इखार, अमोल धवसे ,गटनेता प्रकाश मारोटकर, राहुल गुल्हाने, आकाश लोमटे ,जय राऊत, ऋषिकेश डकरे ,आदित्य गुल्हाने ,अक्षय मारोटकर इत्यादी युवकांनी परिश्रम घेतले.

# आ. प्रवीण तायडे यांनी अचलपूर स्त्री व बाल रुग्णालय आणि कुटीर रुग्णालयाला दिली भेट

## -रुग्णांशी साधला संवाद, प्रलंबित समस्यांचा घेतला आढावा

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर मतदार संघाचे आ. प्रवीण तायडे यांनी आज अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय , कुटीर रुग्णालय येथे भेट देऊन उपलब्ध असलेल्या विविध सुविधा तसेच प्रलंबित समस्यांचा आढावा घेतला .यावेळी अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय मध्ये उपचारासाठी नेहमी रुग्णाची मोठी संख्या असल्याने डॉक्टर - कर्मचाऱ्यांची संख्या , सोनोग्राफी केंद्र ,रुग्णवाहिका आदी बाबीची माहिती घेत रुग्णाना कोणतीही असुविधा होऊ नये यासाठी प्रलंबित समस्या तत्काळ मार्गी लावण्याचे निर्देश आ.प्रवीण तायडे यांनी अमरावती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.विनोद पवार यांना दिले. यानंतर आमदार प्रवीण तायडे यांनी कुटीर रुग्णालय येथे सुरू असलेल्या २०० बेड च्या रुग्णालयाला भेट दिली .येत्या ५ महिन्यात या रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण होणार असून आ.प्रवीण तायडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून संपूर्ण माहिती ,सुविधा बाबत आढावा घेतला. यावेळी अमरावती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.विनोद पवार ,उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेंद्र ढोले,जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयाचे डॉ.गावंडे , डॉ.विजय सिरसमकर, डॉ.जाकीर ,डॉ. अग्रवाल, भाजपा पक्षाचे रुपेश ढेपे,विशाल काकड,प्रफुल बर्वे,शंकर मालखेडे,सतीश शर्मा, अक्षय बुंदेले,अक्षय जनावरे ,महेश कडू ,कौस्तुभ मुंदे आदी उपस्थित होते .

आ. प्रवीण तायडे यांनी अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय येथे विविध वॉर्डात भेट देऊन रुग्णांशी संवाद साधला.या आढावा बैठकीत अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय आणि कुटीर रुग्णालय येथे डॉक्टर , परिचारिका ,सुरक्षा रक्षक, रेडिओलॉजीस्ट टेक्निशियन यांच्या रिक्त पदाची संपूर्ण माहिती अमरावती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.पवार व उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेंद्र ढोले, डॉ.गावंडे यांनी आमदार प्रवीण तायडे यांच्या समक्ष मांडली.

तसेच परतवाडा शहरातील कुटीर रुग्णालय येथे २०० बेड चे नवीन रुग्णालय बांधकाम निर्मितीचा आढावा ,रुग्णालयात रस्ता निर्मिती ,सौंदर्यीकरण आदी ची पाहणी सुद्धा आ.प्रवीण तायडे यांनी केली.

कुटीर रुग्णालय येथे नेत्र रुग्णालय निर्मिती ,रक्तपेढी निर्मिती ,पोलीस चौकी निर्मिती अश्या विविध मुद्द्यांवर ही आमदार प्रवीण तायडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली .

यावेळी आ.प्रवीण तायडे यांच्या समक्ष रुग्णांनी जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात बंद सोनोग्राफी केंद्र बाबत ही समस्या मांडली. याचा तात्काळ दखल घेत



आ.प्रवीण तायडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावले. प्रलंबित समस्यांबाबत तत्काळ निर्णय घेण्याचे निर्देश ही आ.प्रवीण तायडे यांनी यावेळी अमरावती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.विनोद पवार यांना दिले. अचलपूर शहरातील जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय मध्ये मेळघाट नव्हे तर अंजनगाव ,अचलपूर तालुक्यातील शहरी - ग्रामीण भागातून रुग्ण उपचारासाठी येतात .यामुळे या रुग्णांना तत्काळ सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्या या साठी सर्व डॉक्टर मंडळींनी तत्पर राहण्याचे प्रतिपादन आमदार प्रवीण तायडे यांनी केले.

यावेळी आमदार प्रवीण तायडे यांनी रुग्णवाहिका संख्ये ची माहिती घेतली .अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात भेट देऊन रुग्ण, डॉक्टर मंडळी शी संवांद ही साधला.

# श्री क्षेत्र जहागीरपूर नगरी भाविकांच्या पालख्या-दिड्यांनी दुमदुमली

## -श्री महारूद्र मारूती संस्थानमध्ये हनुमान जयंती

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** लाखों भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या प्राचीन पुरातन श्री क्षेत्र जहागीरपूर येथील श्री महारूद्र मारूती संस्थान मध्ये दरवर्षी प्रमाणे याही वर्षी हनुमान जयंती निमीत्य ३ एप्रिल ला काल्याचे किर्तन व परिसरातील पुरूष व महिला भजनी मंडळांचे पालख्या व दिंड्या श्री क्षेत्र जहागीरपूर येथे येऊन अवतरली पंढरी असे स्वरूप दिसून आले. दुपारी १ वा.ह.भ.प.संजय महाराज ठाकरे (कौंडण्यपूर) यांच्या अमृतवाणीतून अतिशय सुंदर सरळ सोप्या भाषेत किर्तनातून भाविक भारावून गेलेत किर्तन झाल्या नंतर दहिहंडी करीता दाखल झालेल्या पालख्या यामध्ये दारव्हा ते कौंडण्यपूर जहागीरपूर येथे ३०० ते ३५० वारकरी यांची उपस्थिती होती. परिसरातील महिना भजनी मंडळ ५५ ते ६० व वारकरी भजनी १० ते १५ अशी भरगच्च उपस्थितीमुळे श्री क्षेत्र जहागीरपूर नगरी अख्खी दुमदुमली. दहिहंडी करिता मंदिरापासून गावाच्या प्रमुख मार्गावरून या सर्व महिला पुरूष भजनी मंडळ पालख्या दिड्यांची रांग मंदिराच्या भक्त निवास पर्यंत







एक सारखी होती. दुपारी ५ वा.पासून प्रदर्शना काढुन ज्या ठिकाणी दहिहांडी म्हणजे भक्त निवास येथे ह .भ.प.संजय महाराज ठाकरे वारकरी तसेच संस्थानचे कार्यकारी विश्वस्त मंडळ यांनी दहीहांडी फोडून हजारो भाविकांनी घेतला लाभ.

त्यानंतर मंदिरामध्ये येऊन कार्यक्रमस्थळी सर्व महिला व पुरुष भजनी मंडळ तसेच किर्तनकार व वारकरी यांचा सन्मान करण्यात आला.यामध्ये किर्तनकार ह.भ.प. संजय महाराज ठाकरे यांना संस्थानचे कार्यकारी विश्वस्त ओमप्रकाश पुरतानी यांनी सन्मानित केले. तर वारकरी भजनी मंडळीचा विश्वस्त वसंतराव आखरे, गोपाल भैय्या, नितीन कोल्हटकर, गणेश भोंगाडे,मनोज चांडक यांनी सन्मान केला.तसेच विणेकरी यांचाही सन्मान करण्यात आला.तसेच स्व. पुष्पलता ओमप्रकाश परतानी यांचे स्मृतीप्रित्यर्थ व मंदीरातर्फे सर्व महिला भजनी मंडळाच्या प्रमुखांचा सन्मान सौ. आखरे,सौ चांडक आदिनी केला.

नंतर सर्वाच्या उपाधितीत महाआरती काला व प्रसाद वाटप करून भक्त निवास येथे महाप्रसादाने यशस्वी सांगता झाली.याप्रसंगी संस्थानचे कार्यकारी विश्वस्त मंडळ, भक्त प्रेमी भाषिक, तसेच संस्थानचे व्यवस्थापक सुनिल भोंगाडे व सर्व कर्मचारी, भाविक भक्त, सहयोगी भाविक यांनी विशेष सहकार्य करून मोठ्या उत्साहात व आनंदात कार्यक्रमाची सांगता झाली.

# मंत्री आदिती तटकरे यांचा दौरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे रविवार, दि. ५ एप्रिल रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. दौऱ्यानुसार, तटकरे ह्या रविवार, दि. ५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता ग्रामीण रुग्णालय चिखलदरा आणि एनआरसी केंद्राला भेट देतील. येथे त्या कुपोषण, बालमृत्यू यांसारख्या प्रश्नांवर पालकांशी संवाद साधतील आणि अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतील. दुपारी १२ वाजता मोथा (चिखलदरा) येथील



अंगणवाडी केंद्र क्र. १ व २ तसेच आरोग्य उपकेंद्राची पाहणी करतील. दुपारी १२:३० वाजता जैतादेही येथील अंगणवाडी केंद्राला भेट देतील. दुपारी २:३० वाजता अमरावती येथील शासकीय विश्रामगृह येथे राखीव राहील. त्यानंतर दुपारी ३:३० वाजता त्या अहिल्यानगर जिल्ह्याकडे रवाना होतील.

# किरीट सोमय्यांसोबत महापालिकेत कोणतीही बैठक झाली नाही

## -आरटीई अंतर्गत धक्कादायक खुलासा -फेसबुक वरील फोटोमुळे वाढला वाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** बोगस जन्म मृत्यू दाखले संदर्भात भाजपा नेता किरिट सोमय्या यांनी मनपा मध्ये गेल्या काही दिवसांपूर्वी बैठका घेतल्या होत्या. या बैठकीचे फोटो फेसबुक वर पण टाकण्यात आले होते. पण माहिती अधिकार अधिनियम अन्वये या संदर्भात मागण्यात आलेल्या माहिती मध्ये मनपा मध्ये अशी कोणतीही बैठक न झाल्याचा धक्कादायक खुलासा देण्यात आलेला आहे. यामुळे प्रशासनच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. माहितीनुसार पुणे येथील माहिती अधिकारी कार्यकर्ता डॉ.विश्वंभर चौधरी यांनी सांगितले आहे की, मनपाच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बैठकीचा फोटो टाकण्यात आला आहे. ज्या मध्ये भाजपा नेता किरीट सोमय्या आणि मनपा आयुक्त यांची उपस्थिती स्पष्ट दिसत आहे. यामुळे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये या बैठकी संदर्भात माहिती मागितली असता माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले कि, या बैठकीचे आयोजन मनपा द्वारा करण्यात आले नव्हते. यामुळे या संदर्भात कोणतीही माहिती मनपा जवळ उपलब्ध नाही. मनपाच्या या खुलासामुळे काही प्रश्न उत्पन्न झाले आहे. जर मनपाने माजी खासदार किरिट सौम्या सोबत कोणतीही बैठक नाही घेतली, तर मग फेसबुक वर तो फोटो कुठून आला. हा फोटो कोणत्या कार्यक्रमाचा आहे, का टाकण्यात आलेला आहे असे काही प्रश्न येथे उत्पन्न झाले आहे. प्रशासन काय लपवायचा प्रयत्न करत आहे हा ही एक प्रश्न इथे समोर आहे. यावर डॉ.चौधरी यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की जर बैठक नाही झाली तर या फोटोंचा काय अर्थ आहे. फेसबुकवर हे फोटो कसे आले. यासंदर्भात स्पष्ट उत्तर त्यांनी अमरावती महापालिकेकडे मागितला आहे.

## दुकाने / गाळे विक्रीची जाहीर सुचना

महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा ता.जि.अमरावती र.नं.एफ-117/अमरावती या संस्थेच्या मालकीची व ताब्यात असलेली खाली वर्णन केलेले कर्मशियल संकुलातील दुकाने मालकी हक्काने विक्री देणे आहे. गरजूनी निविदा खालील दिलेल्या पत्यावर पाठवावी.

**स्थावर मिळकतीचे वर्णन :-**

1) मौजे शिराळा ता.जि.अमरावती येथील नगर भुमापन क 4 शिट नं. 640 प्लॉट नं.640 एकुण क्षेत्रफळ 25896 चौरस मिटर जागेवर मंजूर नकाशा प्रमाणे बांधकाम असलेली व्यापारी संकुलातील 25 दुकाने व पहील्या मजल्यावरील हॉल मालकी हक्काने देणे आहे. (दुकान साईज प 3:05 x 4.88 चौ मि., हॉल साईज 18.88 x 5.87 चौ मि.)

**अटी व शर्ती:**

1) प्रति दुकान अथवा दुकान संख्यानुसार नमूद एकूण खरेदी किंमत.
2) नोंदणीकृत खरेदीचा सर्व खर्च खरेदी घेणा-याला करावा लागेल.
3) प्रत्येक दुकानाच्या निविदेसह रु.10,000/- चा संस्थेच्या नावाचा डी.डी.जोडणे बंधनकारक आहे. डि. डी. शिवाय असलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही.
4) निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार कार्यकारी मंडळाला राहील.
5) मंजूर निविदाधारकार 25 टक्के रकमेचा विसार निविदा मंजूर झाल्यापासून 30 दिवसाचे आत करावा लागेल.

टिप :- मंजूर नकाशाप्रमाणे दुकान नं. व हॉलचे कागदपत्रे व प्रत्यक्ष पाहणीकरीता संस्थेच्या कार्यालयात सकाळी 10 ते 5 या वेळात उपलब्ध राहील.

निविदा दिनांक 03/05/2026 रोजी सकाळी 11 वाजता संस्थेच्या कार्यालयात उघडण्यात येईल मा.धर्मादाय सह आयुक्त अमरावती यांचे परवानगीने व्यवहार करण्यात येईल परवानगी नाकारल्यास अन्य व्यक्तीस जास्त किंमतीत मंजूरी दिल्यास विसार रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल.

दिनांक : 02/04/2026

मनोज निळकंठराव देशमुख
अध्यक्ष
महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा ता.जि.अमरावती
र.नं.एफ-117/अमरावती

## जाहिरनामा / सायटेशन

दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
वि. श्री. आर. आर. खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज :- ४९९/२०२६ पुढील तारीख १०.०४.२०२६
**सुनिता + २ वि निरंक**

अर्जदार- **1-Smt. Sunita Gajanan Lokhande** Age 48 Years, Occu: Household **2-Namrata Shubham Lokhande** Age 24 Years, Occu: Household **3-Aaradhya Shubham Lokhande** Age-03 yrs, Occu- Nil (Applicant No. 2 for herself and natural guardian as a mother for applicant no. 3) All R/o Hira Colony, Gopal Nagar, Amravati, Tq. Distt. Amravati

विरुध्द- **Nil**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Shubham Gajanan Lokhande** हे दिनांक १५.१२.२०२५ रोजी सावंगी मेघे, ता. जि. वर्धा येथे मयत झाले. अर्जदार **Smt. Sunita Gajanan Lokhande+2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा अर्जदार **Smt. Sunita Gajanan Lokhande+2** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ३०.०३.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर अमरावती**

## जाहिरनामा / सायटेशन

दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
वि. श्री. ए.बी. कटटे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक ६५३/२०२६ **मोहिनी व इतर विरूध्द निरंक** पुढील तारीख ०८.०५.२०२६

**अर्जदार - 1. Mohini Ferumal Dhankani** Age-84 yrs Occ-Household
R/o Near New Cotton Market Krishna Nagar Galli no. 3 Shivaji Nagar Amravati
**2. Shyamlal Pherumal Dhankani** Age-55 yrs Occ-Business
R/o Near New Cotton Market Krishna Nagar Galli no. 3 Shivaji Nagar Amravati
**3. Kanchan Suresh Kumar Gyanchandani** Age-57 yrs Occ-Household
R/o 2-10-1531 Chaitanyapuri Near Mee Seva Karimnagar Andhra Pradesh
**4. Laxmi Dipak Hasrani** Age-48 yrs Occ-Household
R/o Shastri Ward Warthi, Tq Mohadi Warthi, Bhandara

**विरुध्द-गैरअर्जदार- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **पेरूमल नेवनग्रम धनकानी** हे दि ०७.१०. २०२५ रोजी अमरावती, येथे मयत झाले अर्जदार मोहिनी व इतर विरूद्ध निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सवहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.
त्यापेक्षा अर्जदार मोहिनी व इतर विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदर्हू मुदतील कोणी योग्य हरकत न दान्तविल्यास सदर्हू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल

आज दि. ०२.०४ २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर अमरावती**

## जाहीर नोटीस

वि. २ रे सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर
जि. अमरावती यांचे न्यायालयात

ने.ता. २९/०४/२०२६ किरकोळ अर्ज क. १६०/२०२६
**अर्जदारः-१. सुरेश रामभाऊ रामागडे,** वय ५६ वर्ष, व्यवसाय- नोकरी
**२. रमेश रामभाऊ रामागडे,** वय ४४ वर्ष, व्यवसाय -शेती
**३.शकुंतला रामभाऊ रामागडे,** वय ७६ वर्ष,व्यवसाय - घरकाम सर्व रा. शिंगणवाडी, ता. दर्यापूर, जि अमरावती

**विरूध्द**
**गैरअर्जदार**
**निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **रामभाऊ गोंडूजी उर्फ गोंडाजी रामागडे** हे दिनांक ०५/१०/२०२४ रोजी मरण पावले आहे.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत** न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. मालमत्तेचे वर्णन : रामभाऊ गोंडूजी उर्फ गोंडाजी रामागडे यांचे यांचे संबंधीत मौजा आखतवाडा, ता. जि. अकोला येथे शेत गट क ५५, क्षेत्रफळ ०८१ हे. आर एवढी शेती आहे. सदर शेताची बाजारभाव किंमत ५०,०००/- इतकी आहे. सदर शेती अ.क. १ ते ३ ह्यांचा १/४ अंश कायदेशीर हिस्सा आहे.
आज दि. ०२/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक (प्रशासन) दिवाणी न्यायालय व स्तर दर्यापूर**

## जाहीर नोटीस

अमरावती येथील ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, (व.स्तर)
श्री.एच.जे.शेंडे यांच्या न्यायालयात

आर.एम.जे.सी. क्रमांक ६८५/२०२५ ने.ता. २३.०४.२०२६

**अर्जदार** - 1. Kirtika Nitin Mudliyar, Age 32 Yrs. Occu.: Business
2. Mihan Nitin Mudliyar, Age 28 Yrs. Occu.: Business
Both R/o Dr.N.V.Mudliyar Compound Camp, Amravati

-- वि --

**गैरअर्जदार - निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Shardabai Wd/o Vyankatesh Mudliyar ह्या दिनांक ०६.०२.१९९७ रोजी अमरावती येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार Smt.Kirtika Nitin Mudliyar and Others यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत Shardabai Wd/o Vyankatesh Mudliyar यांचे वारसा हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 276 OF INDIAN SUCCESSION ACT, 1925 FOR GRANT OF PROBATE OF WILL OF DECEASED Shardabai Wd/o Vyankatesh Mudliyar प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्याचप्रमाणे मयत यांच्या नांवे असलेली सर्व मालमत्ता मृत्यूपत्राप्रमाणे अर्जदार यांचे नांवे करण्याकरीता मयत Shardabai Wd/o Vyankatesh Mudliyar यांनी दिनांक १६.०४.१९९० रोजी मृत्यूपत्र करून ठेवले आहे, मृत्यूपत्रात नमुद केल्याप्रमाणे

Description of Said Property

Property No.1, mentioned in the Will the portion admeasuring 15,213.91 Sq.Ft. from out of Nazul Plot No.9/1, Sheet No.41, which is mutated in the name of etitioners vide mutation entry No.4345 dated 22.04.2020

त्यापेक्षा अर्जाबाबत कोणास आक्षेप नोंदवायचा असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत Shardabai Wd/o Vyankatesh Mudliyar यांचे वारसा हक्काचे (Probate) प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २०७**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# त्या पाचही आरोपींची ओळख परेड, कारागृहात रवानगी

**भानखेडा जंगलातील सामूहिक लैंगिक अत्याचार प्रकरण**

**आरोपींची नावे पोलिसांनी केली जाहिर**





**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीतील भानखेडा फाटा जंगल परिसरात २८ मार्च रोजी घडलेल्या सामूहिक अत्याचार प्रकरणातील आरोपींची ओळख पोलिसांनी अखेर जाहीर केली आहे. यापूर्वी अटक करण्यात आलेल्या पाचही आरोपींची नावे संवेदनशीलतेच्या कारणास्तव उघड करण्यात आली नव्हती. मात्र, पीडित आणि तिच्या मित्राने न्यायालयात आरोपींची ओळख पटवल्यानंतर शनिवारी पोलिसांनी अधिकृतरीत्या त्यांची नावे जाहीर केली. या प्रकरणात ईश्वर पांडुरंग मरसकोल्हे (वय ३४), दीवाकर श्रीकृष्ण मरसकोल्हे (वय २५), प्रमोद नारायण वाघाडे (वय ३१), शुभम उर्फ सोमेश्वर नारायण वाघाडे (वय २८) आणि (पान २ वर)

### गुन्ह्यातील साहित्य जप्त

या प्रकरणी पीडितेच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत पाचही आरोपींना अटक केली आहे. दरम्यान, तपासादरम्यान पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेले वाहन, काठी आणि दोरी असा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींची पोलिस कोठडीत चौकशी करण्यात आली असून, आता न्यायालयीन कोठडीत अधिक चौकशी सुरू आहे. प्रकरणाच्या गंभीरतेमुळे विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# तिवसा जंगलात अनधिकृत रस्त्याचे खोदकाम उघड

**-दोन पोकलॅन्ड जप्त, गुन्हा दाखल, - वनविभागाची कारवाई**

**अमरावती/प्रतिनिधीः-** तिवसा परिसरातील जंगल भागात विना परवानगी मोठ्या प्रमाणात रस्त्याचे खोदकाम सुरू असल्याचा प्रकार समोर आला असून वनविभागाने तत्काळ कारवाई करत दोन पोकलॅन्ड मशीन जप्त केल्या आहेत. या कारवाईनंतर परिसरात खळबळ उडाली आहे.


फाईल चित्र

मिळालेल्या माहितीनुसार, मोर्शी रेंजअंतर्गत येणाऱ्या तिवसा बिट जंगल परिसरात काही व्यक्तींकडून अनधिकृतपणे रस्ता तयार करण्याचे काम सुरु असल्याची गोपनीय माहिती वनविभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वनअधिकारी व कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाड टाकली. कारवाईदरम्यान जंगल भागात दोन पोकलॅन्ड मशीन मोठ्या प्रमाणात खोदकाम करताना आढळून आल्या. कोणतीही अधिकृत परवानगी नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर वनविभागाने दोन्ही मशीन ताब्यात घेत जप्त केल्या. संबंधित चालकांविरुद्ध वनकायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. जंगल परिसरात हा मार्ग नेमका कोणासाठी आणि कोणाच्या आदेशावर तयार केला जात होता, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. मात्र प्राथमिक तपासात या रस्त्याचा उपयोग रेती तस्करीसाठी केला जाण्याचा संशय व्यक्त केला जात आहे. नदी घाटापर्यंत पोहोचण्यासाठी जंगलातून नवीन मार्ग तयार करण्याचा प्रयत्न होत असल्याची शक्यता अधिक बळावली आहे. या कारवाईनंतर परिसरात अवैध हालचालींचे मोठे जाळे (पान २ वर)

# दर्यापूर-दहीहांडा रोडसाठी खासदार व आमदारांच्या विरोधात वंचितची फलकबाजी

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर-दहीहांडा या रोडसाठी जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे व दर्यापूरचे आमदार गजानन लवटे यांच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीचे दर्यापूर तालुकाध्यक्ष चंदू रायबोले यांनी दर्यापूर ते सुकळी दरम्यान रोडवर फलक लावून खासदार व आमदार (पान २ वर)

### विरोधात दुसऱ्यांदा फलकबाजी

खासदार बळवंत वानखडे व आमदार गजानन लवटे यांच्या विरोधात आज दुसऱ्यांदा फलकबाजी करण्यात आली आहे. याआधी दर्यापूर येथील ओम राणे यांनी सांगळूदकर नगर ते हिंगणी या रोडसाठी फलकबाजी केली होती. व आज (दि.४) दुसऱ्यादा चंदू रायबोले यांनी खासदार व आमदार यांच्या विरोधात फलकबाजी केली.

### युवासेनेने फलक फाडले



दर्यापूर-दहीहांडा रस्त्यावर लोकप्रतिनिधी जोमात तर जनता कोमात अश्या आशयाचे निषेध करणारे फलक युवासेना तालुकाप्रमुख सागर गिरे यांना दिसताच त्यांनी निषेध करणारे फलक फाडून टाकले. आमदार,खासदार हे दर्यापूरच्या हिताचेच काम करीत असून राजकारण करण्यासाठी लोकप्रतिनिधीना बदनाम करण्याचा (पान २ वर)

# प्राणघातक हल्ल्याच्या गुन्ह्यात २४ तासांत आरोपी अटकेत

**फ्रेजरपुरा पोलिसांची वेगवान कारवाई**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या प्रयत्नाच्या गंभीर गुन्ह्यात पोलिसांनी केवळ २४ तासांत आरोपींना जेरबंद करत उल्लेखनीय यश मिळवले आहे. या कारवाईमुळे परिसरात कायदा व सुव्यवस्थेवर पुन्हा विश्वास निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी उमा संघपाल बोरकर (रा. संजय गांधी नगर क्र. २, अमरावती) यांच्या तक्रारीवरून हा प्रकार समोर आला. ३१ (पान २ वर)

# भटक्या श्वानाला अमानुष मारहाण

**राजापेठ परिसरात संताप, वॉचमनविरुद्ध गुन्हा दाखल**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत भटक्या श्वानाला निर्दयी मारहाणीचा प्रकार समोर आला असून, या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. बडनेरा रोडवरील एमजी मोटर्स शोरूम परिसरात कार्यरत वॉचमनविरुद्ध प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३० मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे ८.५० वाजता तक्रारदार कार्तिक विलास गोले (वय २५, रा. गुरूछाया कॉलनी) हे त्यांच्या मित्रांसोबत बडनेरा रोडवरील चाय


फाईल चित्र

सुट्टा बार परिसरात चहा पिण्यासाठी गेले होते. याच वेळी एमजी मोटर्स शोरूमसमोर एक वॉचमन भटक्या श्वानाला लाकडी दांड्याने अत्यंत निर्दयीपणे मारहाण करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. हा प्रकार पाहून कार्तिक गोले व त्यांच्या मित्रांनी तत्काळ हस्तक्षेप करत श्वानाला वाचवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी श्वान गंभीर जखमी अवस्थेत होता आणि त्याच्या तोंडातून रक्त येत असल्याचे दिसून आले. मारहाणीत तो लंगडत असल्याचेही निदर्शनास आले.

तक्रारीनुसार, संबंधित वॉचमन लक्ष्मण नेवारे (वय २६) याला मारहाणीचे कारण विचारले असता, 'श्वान (पान २ वर)

# गोवंश तस्करीचा डाव उधळला ७ जनावरांची सुटका

**फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई,**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत पोलिसांनी अवैध गोवंश तस्करीचा प्रयत्न हाणून पाडत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत ७ गोवंश जनावरांची सुटका करण्यात आली असून एक तवेरा वाहन जप्त करण्यात आले आहे. या संपूर्ण कारवाईत सुमारे ४ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३



एप्रिल रोजी पहाटे फ्रेजरपुरा पोलीस पथक नियमित गस्त घालत असताना मार्डी रोडवरील केके कॅम्प्स स्कूलसमोर एक संशयित वाहन उभे असल्याची गुप्त माहिती (पान २ वर)

# खारी गावात आगीचे तांडव

**-चार कुटुंबांचा संसार राखरांगोळी**

**धारणी/प्रतिनिधीः-** धारणीपासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावर असलेल्या खारी गावात शुक्रवारी मध्यरात्री भीषण आग लागून चार कुटुंबांचे संसार अक्षरशः राखरांगोळी झाले. रात्री साडेदहाच्या सुमारास लागलेल्या या आगीने काही क्षणांतच रौद्र रूप धारण केले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र घरांसह धान्य, कपडे आणि संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाल्याने चारही कुटुंबे उघड्यावर आली आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गावातील नागरिक झोपेच्या तयारीत असतानाच अचानक


फाईल चित्र

घरांना आग लागली. वाऱ्याचा वेग अधिक असल्याने आगीने क्षणार्धात परिसर व्यापला आणि परिस्थिती गंभीर झाली. या आगीत अंजन सुरेज घुले, शैलेश घुले, युवराज प्रकाश धुर्वे आणि हंसराज प्रकाश धुर्वे यांची घरे पूर्णपणे जळून खाक झाली. घरातील साठवलेले धान्य, कपडे, भांडी आणि इतर साहित्य पूर्णतः नष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच धारणी नगर पंचायतीचे अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्याचबरोबर खारी ग्रामपंचायतीने पाण्याचा टँकर उपलब्ध करून दिला. गावकरी आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी (पान २ वर)

# साइड न दिल्याने मारहाण दोन्ही गटांवर गुन्हे दाखल

**अमरावती :** मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाणे हद्दीतील चिचोली गावात साइड न दिल्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये वाद होऊन मारहाणीची घटना शुक्रवारी घडली आहे. मोटरसायकलने जात असलेल्या रवि ज्ञानेश्वर राऊत यांना साइड न दिल्याच्या कारणावरून रवि शेंद्र, सतीश अडकणे आणि दुर्गेश झोले यांनी वाद घालत मारहाण केली, अशी तक्रार दाखल करण्यात आली आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, याच प्रकरणात रवि शेंद्र यांच्या तक्रारीवरून रवि राऊत, अविनाश राऊत, विशाल बमनोटे आणि प्रफुल बमनोटे यांच्या विरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही बाजूंच्या तक्रारीनुसार पोलिसांनी स्वतंत्र गुन्हे नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## पंचायत समिती गोदामातून लोखंड चोरी

**अमरावती :** तिवसा पोलीस ठाणे हद्दीत पंचायत समिती परिसरातील गोदामातून लोखंडी गडर चोरी झाल्याची घटना शुक्रवारी उघडकीस आली आहे. चोरट्यांनी गोदामातील टीनपत्रे वाकवून आत प्रवेश करत ७ लोखंडी गडर चोरून नेले आहेत. याची किंमत ६,३०० रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणी भांडारपाल सुनील साहबराव उल्हे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी मृत्यूंजय उर्फ कपिल वानखडे (वय २३) आणि लोकेश रमेश मेश्राम (वय २१, दोघे रा. तिवसा) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## टॉवरवरील बॅटऱ्या चोरी

**अमरावती :** वरूड पोलीस ठाणे हद्दीत जामठी–गणेशपूर शेत परिसरातील टॉवरवरून दोन बॅटऱ्या चोरीला गेल्याची घटना शुक्रवारी समोर आली आहे. अज्ञात चोरट्यांनी ही चोरी करून सुमारे १६ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. या प्रकरणी शुभम तायडे यांच्या तक्रारीवरून वरूड पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

# एसटी चालकाच्या सतर्कतेने टळला अनर्थ

**अवैध गौण खनिज टिप्परमुळे होणार होता अपघात**

**चांदुर बाजार/प्रतिनिधीः-** तालुक्यातील ब्राह्मणवाडा ते शिरजगाव कसबा मार्गावर अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्या विना नंबरच्या टिप्पर मुळे दुर्घटना होता होता टळली. एसटी चालकाच्या सतर्कतेने बस मध्ये



बसलेल्या प्रवाशांचे जीव वाचले. माहिती नुसार अवैध गौण खनिज घेऊन जाणारा टिप्पर अचानक एसटी बस समोर आला. (पान २ वर)

## अज्ञात वाहनाच्या धडकेत कोल्ह्याचा मृत्यू

**परतवाडा-चिखलदरा मार्गावरील घटना**

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा चिखलदरा मार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत एका कोल्ह्याचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच वन्यजीव प्रेमी तिथे पोहोचले त्यांनी घटनास्थळाचे निरीक्षण केले आणि वन विभागाला याची माहिती दिली. वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल (पान २ वर)



## प्रदीप भुसारी यांना मातृशोक पंचफुलाबाई भुसारी यांचे निधन



**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** दै.जनमाध्यमचे धामणगाव रेल्वे तालुका प्रतिनिधी प्रदीप भुसारी व संतोष भुसारी यांची आई पंचफुलाबाई गुलाबराव भुसारी (वय ८५) यांचे आज शनिवारी दि.४ एप्रिल २०२६ ला सायंकाळी ६ वाजता निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा उद्या दि.५ एप्रिल २०२६ रविवारला दुपारी १२ वाजता राहते घरी नगरपरिषद समोर येथून निघेल.

# एलपीजी ट्रकमधून १६ गॅस सिलेंडरची चोरी

**गाडगे नगर पोलिसांचा तपास सुरू**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात एलपीजी गॅस सिलेंडर चोरीची धक्कादायक घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्यांनी ट्रकमधून तब्बल १६ भरलेले सिलेंडर लंपास केल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी गाडगे



नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मोहम्मद साजीद मोहम्मद नासिर (वय ३६, रा. अकबरनगर, अमरावती) हे एलपीजी ट्रक (पान २ वर)

# अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक ; १ जण गंभीर

**वणी ममदापूर फाट्यावर अपघात**

**तिवसा/प्रतिनिधीः-** अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत ५३ वर्षीय दुचाकीस्वार शेतकरी गंभीर जखमी झाल्याची घटना आज सकाळी १० वाजता वणी ममदापूर फाट्यावर घडली.

नीलकंठ माधवराव कोहळे (वय,५३,रा.सारसी) असे अपघातात गंभीर जखमी झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. आज सकाळी ते त्यांच्या MH




27,BP-5465 दुचाकीने ममदापूर येथील शेताकडे गेले असता (पान २ वर)



सारांश


जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

रविवार, ५ एप्रिल २०२६ E-paper - www.janmadhyam.com

***गेल्या काही वर्षांमध्ये देशातील उत्तरेकडील राज्ये आणि दक्षिणेकडील राज्ये यांच्यामध्ये लोकसंख्येबाबत उघडपणाने वादंग निर्माण झाल्याचे दिसून आले आहे. यामागे वित्त आयोगाच्या निधी वाटपामध्ये लोकसंख्या नियोजनात यशस्वी ठरलेल्या राज्यांना दुय्यम स्थान मिळत असल्याची भावना हे प्रमुख कारण आहे. आजवर चर्चेपुरता असणाऱ्या या वादाचे पडसाद आता धोरणात्मक पातळीवर उतरू लागले आहेत. आंध्र प्रदेशाने नुकताच एक निर्णय घेऊन यावर शिक्कामोर्तब केले आहे. या धोरणानुसार, या राज्यामध्ये दुसऱ्या किंवा तिसऱ्या अपत्याला जन्म देणाऱ्या दाम्पत्यांना २५ हजार रुपयांचे प्रोत्साहन दिले जाणार आहे. या निर्णयाचे पडसाद इतर राज्यांतही उमटण्याची शक्यता आहे.***

# लोकसंख्या नियोजनाची उलटी गंगा!

गेल्या काही वर्षांमध्ये देशातील उत्तरेकडील राज्ये आणि दक्षिणेकडील राज्ये यांच्यामध्ये लोकसंख्येबाबत उघडपणाने वादंग निर्माण झाल्याचे दिसून आले आहे. यामागे वित्त आयोगाच्या निधी वाटपामध्ये लोकसंख्या नियोजनात यशस्वी ठरलेल्या राज्यांना दुय्यम स्थान मिळत असल्याची भावना हे प्रमुख कारण आहे. आजवर चर्चेपुरता असणाऱ्या या वादाचे पडसाद आता धोरणात्मक पातळीवर उतरू लागले आहेत. आंध्र प्रदेशाने नुकताच एक निर्णय घेऊन यावर शिक्कामोर्तब केले आहे. या धोरणानुसार, या राज्यामध्ये दुसऱ्या किंवा



तिसऱ्या अपत्याला जन्म देणाऱ्या दाम्पत्यांना २५ हजार रुपयांचे प्रोत्साहन दिले जाणार आहे. या निर्णयाचे पडसाद इतर राज्यांतही उमटण्याची शक्यता आहे.

लोकसंख्येच्या व्यवस्थापनासाठी गेल्या अनेक दशकांपासून भारताने 'हम दो, हमारे दो' हे ब्रीदवाक्य प्रमाण मानले होते. मात्र काळाच्या ओघात आणि बदलत्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीमुळे आता हे चित्र पालटू लागले आहे. आंध्र प्रदेश सरकारने नुकतेच एक क्रांतिकारी, परंतु तितकेच वादग्रस्त लोकसंख्या व्यवस्थापन धोरण जाहीर केले आहे. या धोरणामुळे अधिक अपत्ये जन्माला घालण्यासाठी प्रोत्साहन देणारे आंध्र प्रदेश हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. या निर्णयाने केवळ राज्याच्या लोकसंख्याशास्त्रीय रचनेवरच नव्हे, तर देशाच्या संघराज्यीय संरचनेवर आणि सामाजिक प्रगतीवरदेखील अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. आंध्र प्रदेशच्या या नवीन धोरणानुसार, दुसऱ्या किंवा तिसऱ्या अपत्याला जन्म देणाऱ्या दाम्पत्यांना २५ हजार रुपयांचे प्रोत्साहन दिले जाणार आहे. इतकेच नव्हे तर वंध्यत्वावर उपचार करण्यासाठी 'इन विट्रो फर्टिलायझेशन' (आयव्हीएफ) उपचारांवरही सरकारी सबसिडी देण्याची योजना आहे. राज्याचा एकूण प्रजनन दर (टीएफआर) सध्या १.५ वर आला आहे, जो प्रतिस्थापन स्तर २.१ पेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहे. ही घटती प्रजनन क्षमता आणि त्यातून उद्भवणारी भविष्यातील संकटे रोखण्यासाठी राज्य सरकारने हे पाऊल उचलले आहे. मात्र या धोरणामागचा उद्देश आणि त्याचे संभाव्य परिणाम यांचा सखोल विचार करणे आवश्यक आहे.

आंध्र प्रदेशच्या या चिंतेमागे दोन मुख्य कारणे आहेत. पहिले म्हणजे राजकीय प्रतिनिधित्व. आगामी काळात होणाऱ्या मतदारसंघांच्या पुनर्रचना प्राढियेत (डीलिमिटेशन), ज्या राज्यांची लोकसंख्या कमी झाली आहे, त्यांचे संसदेतील प्रतिनिधित्व कमी होण्याची भीती दक्षिण भारतीय राज्यांना वाटत आहे.

दुसरे कारण म्हणजे आर्थिक निधीचे वाटप. वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्राकडून मिळणारा निधी हा राज्याच्या लोकसंख्येवर आधारित असतो. अशा स्थितीत लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी ठरलेल्या राज्यांनाच राजकीय आणि आर्थिक स्तरावर नुकसान सोसावे लागत आहे, असा या राज्यांचा समज आहे, परंतु आंध्र प्रदेशचा हा दृष्टिकोन काहीसा संकुचित वाटतो. याचे पहिले कारण म्हणजे यात असलेला प्रादेशिक किंवा वांशिक पूर्वग्रह. ही नीती प्रामुख्याने तेलुगू भाषिक लोकसंख्या वाढवण्यासाठी आखली गेल्याचे दिसून येते. जर ओळखीचे निकष केवळ भौगोलिक सीमांवर आधारित असतील, तर आंध्र प्रदेशात वर्षानुवर्षे वास्तव्यास असलेल्या इतर राज्यांतील लोकांचे काय? पिढय़ान्पिढय़ा तिथे राहणारे बंगाली किंवा पंजाबी नागरिक या सबसिडीसाठी पात्र ठरणार का? तसेच मोठय़ा प्रमाणात तेलंगणा, कर्नाटक किंवा महाराष्ट्रात राहणाऱ्या तेलुगू भाषिकांच्या प्रश्नांचे काय? अशा प्रकारची धोरणे राष्ट्राच्या एकात्मिक स्वरूपाच्या विरोधात जाऊ शकतात.

या धोरणाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे मानवी संसाधनांच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम. भारतात प्रजनन दर कमी होण्यामागे शिक्षण आणि वाढते उत्पन्न ही मुख्य कारणे आहेत. अशा परिस्थितीत सरकारी सबसिडीच्या लोभाने अधिक अपत्ये जन्माला घालणारा वर्ग हा बहुधा गरीब किंवा आर्थिकदृष्टय़ा दुर्बल असू शकतो. राज्य सरकारने जरी तिसऱ्या मुलासाठी ठरावीक काळापर्यंत पोषण भत्ता किंवा मोफत शिक्षणाचे आश्वासन दिले असले तरी मुलाच्या संगोपनाचा संपूर्ण खर्च यातून निघू शकत नाही. जगातील ज्या देशांनी अशा प्रकारचे प्रयोग केले आहेत, त्यांना घटता प्रजनन दर रोखण्यात फारसे यश मिळालेले नाही, असा इतिहास सांगतो. सर्वात गंभीर परिणाम महिलांच्या अधिकारांवर होण्याची शक्यता आहे. कमी प्रजनन दर हे महिलांच्या सक्षमीकरणाचे लक्षण मानले जाते. लहान कुटुंबामुळे महिलांना त्यांच्या शिक्षण आणि करीअरवर लक्ष केंद्रित करण्यासाठी वेळ मिळतो. पितृसत्ताक मानसिकतेच्या समाजात पुन्हा एकदा अधिक मुले जन्माला घालण्याचे प्रोत्साहन दिल्यास महिलांचे स्वातंत्र्य मर्यादित होऊ शकते.

भारतासारख्या देशात जिथे अजूनही स्त्री-पुरुष समानतेसाठी मोठा लढा द्यावा लागत आहे, तिथे अशा प्रकारची धोरणे प्रतिगामी ठरू शकतात. आंध्र प्रदेशने हा विचार करणे आवश्यक आहे की, भारत हा एक अखंड देश आहे. विकासासाठी आवश्यक असलेले कौशल्य आणि श्रमशक्ती देशाच्या कोणत्याही कोपऱ्यातून मिळवता येते. प्रवासन किंवा स्थलांतर हा कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचा कणा असतो. त्यामुळे केवळ लोकसंख्या वाढवून समस्या सुटणार नाहीत, तर असलेल्या लोकसंख्येला गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आरोग्य सुविधा देणे अधिक महत्त्वाचे आहे. या धोरणाच्या निमित्ताने केंद्र-राज्य संबंधांमधील तणावदेखील अधोरेखित झाला आहे.

दक्षिण भारतातील प्रगत राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणाचे उद्दिष्ट गाठले, परंतु आता त्यांनाच त्याचे राजकीय परिणाम भोगावे लागत आहेत. यावर उपाय म्हणून लोकसंख्या वाढवण्याऐवजी संसदेतील जागांचे वाटप आणि निधीचे वाटप करताना राज्यांच्या कामगिरीला (उदा. शिक्षण, आरोग्य, आर्थिक विकास) अधिक महत्त्व देणारी नवीन सूत्रे शोधण्याची गरज आहे. केवळ आकडय़ांच्या जोरावर लोकशाहीचे निर्णय घेणे हे प्रगत राज्यांवर अन्यायकारक ठरेल. लोकसंख्या नियोजनाची ही उलटी गंगा सामाजिक प्रगतीला खिळ घालणारी ठरू शकते. राजकीय प्रतिनिधित्व आणि आर्थिक वाटपाच्या पारींवर तोडगा काढण्यासाठी केंद्र व राज्यांनी मिळून संविधानिक मार्गांचा विचार करणे गरजेचे आहे, न की अधिक मुले जन्माला घालण्यासाठी प्रोत्साहन देणे.

लोकसंख्या वाढवणे हे केवळ आकडेवारीचे खेळ नसून ते मानवी हक्क आणि सामाजिक विकासाशी जोडलेले संवेदनशील मुद्दे आहेत. आंध्र प्रदेशच्या या निर्णयाचे पडसाद इतर राज्यांतही उमटण्याची शक्यता आहे. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावर यावर चर्चा होणे काळाची गरज आहे.

# आरोग्यविमा नि हताश रुग्ण

एका वर्षात तब्बल २६ हजार कोटी रुपयांचे विमा दावे फेटाळले जाणे, ही बाब लाखो कुटुंबांच्या हतबलतेची आणि फसवणुकीची करुण कहाणी आहे. राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांनी संसदेत उपस्थित केलेला हा मुद्दा आजच्या आरोग्य व्यवस्थेतील सडलेल्या भागावर नेमके बोट ठेवणारा आहे. आरोग्य हीच खरी संपत्ती, हे सुभाषित आता केवळ पुस्तकांपुरते मर्यादित राहिले असून, प्रत्यक्षात मात्र आजारपण हा सामान्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा आर्थिक आघात ठरत आहे. भविष्यातील अनपेक्षित वैद्यकीय संकटांपासून संरक्षण मिळावे, या उदात्त हेतूने सामान्य माणूस आपल्या कष्टाच्या कमाईतील मोठा हिस्सा आरोग्य विम्याच्या हप्त्यापोटी खर्च करतो. मात्र, जेव्हा प्रत्यक्ष उपचारांची आणि देयके चुकती करण्याची वेळ येते, तेव्हा अनेक विमा कंपन्या आणि खासगी रुग्णालये यांच्यातील छुपे साटेलोटे सामान्यांच्या विश्वासाचा अक्षरशः लचका तोडतात. खासगी रुग्णालये आणि विमा कंपन्यांचे हे जे जाळे विणले गेले आहे, ते इतके गुंतागुंतीचे आहे की, त्यात अडकलेला सामान्य रुग्ण स्वतःला सावरूच शकत नाही.

विम्याच्या योजना विकताना कंपन्यांकडून स्वर्गीय सुखाची आश्वासने दिली जातात. 'कॅशलेस' उपचारांच्या नावाखाली ग्राहकांना आकर्षित केले जाते. मात्र, रुग्णालयात दाखल झाल्यापासून ते डिस्चार्ज मिळेपर्यंतचा प्रवास हा अनेकांना मानसिक छळाचा ठरतो. अनेकदा असे दिसून येते की, ज्या आजारासाठी विमा उतरवला आहे, त्याच आजाराच्या उपचारावेळी 'तांत्रिक कारणांचे' कुंपण घातले जाते. नियमावलीतील बारीक अक्षरातील अटी आणि शर्तींचा आधार घेऊन दावे फेटाळले जातात किंवा मंजूर केलेली रक्कम उपचार खर्चाच्या तुलनेत अत्यंत तुटपुंजी असते.

संसदेत मांडलेल्या मुद्द्याप्रमाणे, विमा कंपन्या दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा प्रीमियम जमा करतात, परंतु परताव्याच्या वेळी हात आखडता घेतात. भारतीय विमा विनियामक आणि विकास प्राधिकरणाची (आयआरडीए) २०२४ ची आकडेवारी डोळे उघडणारी आहे. एकाच वर्षात २६ हजार कोटी रुपयांचे दावे नाकारले जाणे, हे या क्षेत्रातील पारदर्शकतेच्या अभावाचे लक्षण आहे. विमा कंपन्या जेव्हा ग्राहकांना पॉलिसी विकतात, तेव्हा त्यांच्या प्रतिनिधींकडून बहुतेकदा सर्व अटी आणि शर्तींमधील क्लिष्टता स्पष्टपणे सांगितली जात नाही.



> **सामान्य माणूस कंपनीवर विश्वास ठेवून सही करतो, पण संकटाच्या वेळी त्याचा विश्वासघात होतो. विमा कंपन्यांच्या या मनमानी कारभारावर अंकुश ठेवणारी कोणतीही ठोस यंत्रणा सध्या प्रभावीपणे काम करताना दिसत नाही, ही मोठी शोकांतिका आहे. यातील दुसरा आणि गंभीर पैलू म्हणजे खासगी रुग्णालयांची भूमिका. अनेकदा विमा कंपन्या आणि मोठी खासगी रुग्णालये यांच्यात एक प्रकारचे अघोषित साटेलोटे असल्याचे आरोप होतात.**

सामान्य माणूस कंपनीवर विश्वास ठेवून सही करतो, पण संकटाच्या वेळी त्याचा विश्वासघात होतो. विमा कंपन्यांच्या या मनमानी कारभारावर अंकुश ठेवणारी कोणतीही ठोस यंत्रणा सध्या प्रभावीपणे काम करताना दिसत नाही, ही मोठी शोकांतिका आहे. यातील दुसरा आणि गंभीर पैलू म्हणजे खासगी रुग्णालयांची भूमिका. अनेकदा विमा कंपन्या आणि मोठी खासगी रुग्णालये यांच्यात एक प्रकारचे अघोषित साटेलोटे असल्याचे आरोप होतात.

विशिष्ट रुग्णालयात उपचार घेतल्यास विमा दावा लवकर मंजूर होईल किंवा विशिष्ट प्रकारच्या चाचण्या केल्यास विमा कवच मिळेल, अशा प्रकारची गणिते मांडली जातात. उपचारादरम्यान रुग्णाचा मृत्यू झाल्या तर परिस्थिती अधिकच भीषण होते. अशा वेळी थकीत देयकांचे कारण सांगून मृतदेह ताब्यात देण्यास नकार देण्याच्या घटना घडल्या आहेत. विमा कंपनीने दावा फेटाळला की, रुग्णालय प्रशासनाचा सगळा दबाव मृताच्या नातेवाईकांवर येतो. दुःखाच्या डोंगराखाली दबलेला परिवार अशा वेळी आर्थिक विवंचनेत होरपळून निघतो.

विमा क्षेत्रातील या अनागोंदी कारभाराचे मूळ कारणांचा शोध घेतल्यास असे जाणवते की, ग्राहक आणि कंपनी यांच्यातील माहितीची दरी खूप मोठी आहे. विमा दस्तऐवजांची भाषा इतकी तांत्रिक आणि क्लिष्ट असते की, सर्वसामान्य सुशिक्षित व्यक्तीलाही ती सहजासहजी उमजत नाही. याच अज्ञानाचा फायदा कंपन्या उचलतात. जेव्हा एखादा दावा फेटाळला जातो, तेव्हा त्यासाठी दिली जाणारी कारणे इतकी वरवरची असतात की, त्याविरुद्ध दाद मागणे सामान्य माणसाला परवडणारे नसते.

विमा लोकपाल किंवा ग्राहक न्यायालयातील प्रक्रियेला लागणारा वेळ पाहता, बहुतांश लोक नशिबाला दोष देऊन गप्प बसतात. विमा कंपन्यांच्या मनमानीवर लगाम लावण्यासाठी एका राष्ट्रीय मानकाची नितांत गरज आहे. प्रत्येक आजारासाठी लागणारा साधारण खर्च आणि विमा कवचाची व्याप्ती यामध्ये सुसूत्रता असायला हवी. तसेच, विमा दावे फेटाळण्याच्या प्रक्रियेची त्रयस्थ संस्थेकडून चौकशी होणे आवश्यक आहे. जर एखादा दावा तांत्रिक कारणास्तव नाकारला जात असेल, तर त्यामागील तर्कसंगत स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी कंपनीवर निश्चित केली पाहिजे.

खासगी रुग्णालयांच्या नफेखोरीवरही नियंत्रण आणणे गरजेचे आहे. विमा असलेल्या रुग्णाकडून अवाजवी शुल्क आकारले जाते का, याची पडताळणी करणारी यंत्रणा हवी. आरोग्य विमा हा केवळ व्यवसाय नसून, तो सामाजिक सुरक्षेचा एक भाग आहे, याचे भान कंपन्यांना करून देणे आवश्यक आहे. आज सामान्य माणूस आपल्या भविष्यातील सुरक्षिततेसाठी विम्याचा आधार घेतो, पण जर हा आधारच पोखरलेला असेल, तर संपूर्ण आरोग्य व्यवस्था कोलमडून पडेल. आरोग्य विम्याच्या नावाखाली चालणारा हा 'विश्वासाचा व्यापार' थांबवण्यासाठी ग्राहकांनीही जागरूक होणे आवश्यक आहे.

पॉलिसी घेताना केवळ आश्वासनांवर न जाता, प्रत्येक कलमाचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे.

प्रशासनाने विमा कंपन्या आणि रुग्णालयांच्या या अभद्र युतीचा पर्दाफाश करून, दोषींवर कठोर कारवाई करायला हवी. जोपर्यंत व्यवस्थेत उत्तरदायित्व निर्माण होत नाही, तोपर्यंत सामान्यांच्या कष्टाचा पैसा असाच विमा कंपन्यांच्या तिजोरीत जात राहील आणि उपचाराच्या वेळी त्यांच्या हाती केवळ 'दावा फेटाळल्याचे' पत्र पडत राहील.

# 'दिएगो गार्सिया'चे स्थानमहात्म्य

दिएगो गार्सिया (७.३० अंश दक्षिण अक्षांश / ७२. ४४ अंश अतिशय पूर्व रेखांश ) हे हिंदी महासागरातील बेट इस्रायल, अमेरिका आणि इराण संघर्षादरम्यान आता एक महत्त्वपूर्ण ठिकाण बनले आहे. दिएगो गार्सिया हे ३२.५ चौरस किमी क्षेत्रफळ असलेले एक लहान प्रवाळ बेट आहे. परंतु जागतिक सुरक्षा आणि भू-राजकारणामध्ये त्याची भूमिका अत्यंत मोठी आहे. हे बेट अमेरिकेच्या महत्त्वाच्या सामरिक लष्करी तळांपैकी एक आहे. बेटाच्या भौगोलिक स्थानामुळे हिंदी महासागर, पश्चिम आशिया आणि इंडो-पॅसिफिक क्षेत्राच्या सर्व भागांतून इथे वेगाने लष्करी हालचाली करणे शक्य होते. आपल्या भौगोलिक स्थानामुळे, या बेटाला पाळत ठेवण्याची अतुलनीय क्षमता, नौदल वर्चस्व आणि रसद पुरवठ्याची जबरदस्त ताकद मिळाली आहे. जागतिक महासत्तांमध्ये जसजसा संघर्ष वाढत जातो, तसतसे दिएगो गार्सियाचे महत्त्व वाढत जाते. २१ मार्च २०२६ रोजी, इराणने दिएगो गार्सियावर दोन बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. या हल्ल्यामुळे संपूर्ण जग हादरून गेले. या घटनेने इराणची वाढती क्षेपणास्त्र क्षमता अधोरेखित केली. ही क्षेपणास्त्रे लष्करी तळावर आदळली नाहीत, मात्र या घटनेने दिएगो गार्सियाचे महत्त्व इतके का आहे, हे पुन्हा सिद्ध केले.

दिएगो गार्सिया हे मध्य हिंदी महासागरात, मालदीवच्या दक्षिणेकडील टोकाशी असलेल्या अडू सिटी पासून सुमारे ७३३ किलोमीटर अंतरावर स्थित असलेले एक दुर्गम आणि घोड्याच्या नालेच्या आकाराचे प्रवाळ बेट आहे. हे 'चागोस द्वीपसमूहा'तील मोठे बेट असून, ते 'ब्रिटिश इंडियन ओशन टेरिटरी'चा एक भाग आहे. एका उथळ आणि खाऱ्या पाण्याच्या १० मीटर खोल असलेल्या सरोवराला वेढून टाकणारे हे बेट, हिंदी महासागराच्या मध्यभागी स्थित एक धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा लष्करी तळ म्हणून कार्य करते. दिएगो गार्सिया हे मध्य हिंदी महासागरातील एक प्रवाळ बेट आहे. हे बेट विषुववृत्ताच्या दक्षिणेस केवळ ८०० किमी अंतरावर स्थित आहे. छागोस द्वीपसमूहातील हे सर्वात मोठे बेट आहे. हे बेट मालदीवच्या दक्षिणेस स्थित आहे. हे बेट भारताच्या दक्षिण टोकापासून १,७९६ किमी नैऋत्येस वसलेले आहे. ते टांझानियाच्या पूर्वेस ३,५३५ किमी अंतरावर स्थित आहे. या बेटाचा आकार इंग्रजी 'व्ही' किंवा घोड्याच्या नालेसारखा आहे. दिएगो गार्सियाचे खाऱ्या पाण्याचे सरोवर, 'लॅगून', आकाराने मोठे असून ते जवळपास पूर्णपणे प्रवाळ खडकांनी वेढलेले आहे.

हे अटोल 'छागोस लखदीव' पर्वतरांगेचा एक भाग आहे. ही



एक पाण्याखालील पर्वतरांग आहे. या रांगेमध्ये लक्षद्वीप, मालदीव आणि छागोस बेटे यांचा समावेश होतो. जवळच असलेला 'छागोस बँक' हा जगातील सर्वात मोठा प्रवाळ अटोल संरचना असलेला भाग आहे. छागोस बेटांच्या समूहामध्ये हिंदी महासागरातील काही सर्वोत्तम प्रवाळ-भित्ती परिसंस्था आढळतात.

दिएगो गार्सिया बेटाचा शोध सर्वप्रथम १६ व्या शतकात युरोपीय सत्तांनी लावला आणि त्यानंतर हे बेट ब्रिटिश-नियंत्रित छागोस द्वीपसमूहाचा भाग बनले. १९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला, युनायटेड किंगडम आणि अमेरिका यांची संयुक्त लष्करी छावणी उभारण्यासाठी मूळ रहिवासी असलेल्या छागोसियन जनतेचे विस्थापन करण्यात आले. तेव्हापासून, हे बेट हिंदी महासागरातील सामरिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठाणे बनले आहे. दिएगो गार्सियाचा शोध १५१२ मध्ये पोर्तुगीज खलाशांनी लावला. १५४४ मधल्या दुसऱ्या एका मोहिमेत, दिएगो गार्सिया दे मोगुएर नावाचा एक स्पॅनिश संशोधक सहभागी होता. या बेटाचे नाव त्याच्या नावा वरून च ठेवले गेले असावे, असे मानले जाते. शोध लागल्यानंतर सुमारे २०० वर्षे हे बेट मानवी वस्तीविरहित राहिले. 'दिएगो गार्सिया' असे नाव दर्शवणारा पहिला नकाशा एडवर्ड राईट यांनी तयार केला आणि तो १५९९ मध्ये प्रकाशित करण्यात आला. १७८० च्या दशकात फ्रेंचांनी या बेटावर आपली वसाहत स्थापन केली. त्यांनी आफ्रिका आणि भारतातून गुलाम म्हणून कामगारांना येथे आणले. या कामगारांनी येथे नारळाच्या समृद्ध बागा (मळे) विकसित केल्या. १८१४ मध्ये, पॅरिसच्या तहानुसार या बेटाचे स्वामित्व फ्रान्सकडून ब्रिटनकडे हस्तांतरित झाले. त्यानंतर, ब्रिटिश अधिपत्याखालील 'मॉरिशस वसाहती'चा एक भाग म्हणून ते ओळखले जाऊ लागले. १९६५ मध्ये, ब्रिटनने छागोस द्वीपसमूह मॉरिशसपासून वेगळा केला. १९६७ ते १९७३ या काळात, ब्रिटिश सरकारने सर्व छागोसवासीयांना बळजबरीने विस्थापित केले. दिएगो गार्सिया येथे अमेरिकेचा लष्करी तळ उभारण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले होते. यांपैकी बहुतेकांना मॉरिशसमध्ये हलवण्यात आले.

# अभिनेत्री सोनाली बेंद्रे अडचणीत



अनेक वर्षांपासून प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारी प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली बेंद्रे आणि तिचे पती गोल्डीबेहल सध्या मोठ्या अडचणीत सापडले आहेत. पुण्यातील मावळमधील सुमारे ३० गुंठे जमिनीच्या व्यवहारात फसवणूक आणि नियमांचं उल्लंघन केल्याचा आरोप या सेलिब्रिटी जोडप्यावर करण्यात आला आहे.

सोनाली बेंद्रे आणि तिचा पती गोल्डी यांच्याविरोधात पुण्यातील वडगाव मावळ न्यायालयात याचिका दाखल करण्यात आला असून मौजे-उकसानमधील सर्व्हे नंबर १२१/१ येथील ३० गुंठे जागा परस्पर खरेदी केल्याचा आरोप चंद्रकांत बाळू शिंदे यांनी केला आहे. या प्रकरणानंतर सोनाली आणि गोल्डी बेहल यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. पण, सोनाली बेंद्रे यांचा या प्रकरणाशी काहीही संबंध नसल्याचा दावा, त्यांचे वकील राजू शिंदेंनी केला आहे.

१९५७ पासून ही जमीन माझे आजोबा केसू बाबाजी शिंदेंच्या नावावर असल्यानं या जागेवर तक्रारदार चंद्रकांत शिंदेंनी कुळ हक्क दाखवला आहे. मात्र, १९६५ सालीचं मावळच्या तत्कालीन तहसीलदारांनी केसू शिंदे या जागेचे मालक नाहीत, असं स्पष्ट केल्याचा दावा वकील राजू शिंदेंनी केलाय.

पैसे उकळण्यासाठी चंद्रकांत शिंदेंकडून सोनाली बेंद्रे आणि गोल्डी बेहल यांच्यावर आरोप केले जात आहेत. असा प्रतिदावा वकील शिंदेंनी केला आहे. अभिनेत्री सोनाली बेंद्रे आणि गोल्डी बेहल यांच्या बाजूनं वकीलांनी हे सर्व आरोप फेटाळले असून मुळात सोनाली बेंद्रेच्या नावावर ही जमीन नाही, त्यामुळे त्यांचा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही. असा दावा वकिल राजू शिंदे यांनी केला आहे.

तसेच, ८ जून १९६५ रोजी मावळच्या तत्कालीन तहसीलदारांनी दिलेल्या आदेशानुसार केसू शिंदे हे त्या जमिनीचे मालक नसल्याचं स्पष्ट करण्यात आलं होतं. याबरोबरचं यापूर्वी अनेक वेळा तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी स्तरावर अपील करण्यात आलं. मात्र, प्रत्येक वेळी निर्णय त्यांच्या विरोधात गेला असल्याचा दावा बचाव पक्षाकडून करण्यात आला आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये मावळच्या तहसीलदारांनी तक्रारदाराचे अपील फेटाळले होते, त्यानंतर पुन्हा उपविभागीय अधिकाऱ्यांकडे हे प्रकरण गेलं. फक्त पैसे उकळण्यासाठी सतत हे प्रकरण उभं केलं जात आहे...' असा प्रतिदावा वकील राजू शिंदेंनी केला आहे.

या संपूर्ण प्रकरणानंतर अभिनेत्री सोनाली बेंद्रे आणि पती गोल्डी बेहल यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

# अरबाज आणि निक्की विवाहबंधनात अडकणार ?

टेलिव्हिजन विश्वात सध्या रिॲलिटी शो मोठ्या प्रामणात गाजताना पाहायला मिळतात. हे शो अनेक गोष्टींमुळे चर्चेतही असतात. या रिॲलिटी शोमधील भाडणं, वादविवाद, याबरोबरच अनेकांच्या जोड्याही जुळतात. मात्र, शो संपल्यानंतर यांपैकी काही जोड्या कायम एकत्र राहतात तर काही जोड्या तुटतात. अशीच एक सतत चर्चेत असणारी जोडी म्हणजे अरबाज पटेल आणि निक्की तांबोळी ही आहे. निक्की आणि अरबाज ही जोडी बिग बॉस मराठीच्या मागील पर्वात सहभागी झालेली. त्यावेळी बिग बॉसच्या घरात दोघांची मैत्री झाली आणि मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. शोनंतर दोघांनी आपल्या नात्याची कबुली दिली. तर हे कपल सोशल मीडियावरही एकमोकांबद्दल प्रेम व्यक्त करत असतात. ही जोडी नुकताच पुन्हा एकदा 'द ५०' या रिॲलिटी शोमध्येदेखील सहभागी झालेली या शोमध्ये दोघांची केमिस्ट्री सर्वांना प्रचंड आवडली. बिग बॉसच्या घरातून सुरू झालेलं यांचं नातं अजूनही टिकून आहे, त्यांच्या जोडीवर चाहतेही सतत प्रेमाचा वर्षाव करत असतात. अशातच आता दोघांना अनेकवेळा लग्न करणार का? असा प्रश्न विचारला जातो.



नुकताच द ५० रिॲलिटी शोचा फिनाले पार पडला असून या शोचा विजेता शिव ठाकरे ठरला आहे. या शोनंतर एका मुलाखतीत बोलत असताना अरबाजने शोमधील वाद, राडा यासोबतच त्याच्या आणि निक्कीच्या नात्याबद्दलही गप्पा मारल्या. यादरम्यान दोघेही लग्न कधी करणार? या प्रश्नाचंही उत्तर अरबाजनं दिलं आहे. दोघांच्या लग्नाबद्दल बोलताना अरबाज म्हणाला की आमच्याबद्दल तुम्ही एवढा चांगला विचार करताय, हे ऐकून खूप आनंद होतोय, लवकरच एक चांगला मुहूर्त काढू, जो चांगला मुहूर्त असेल, त्या मुहूर्तावर लग्न करू, पण सध्या ही काम करण्याची आणि यश मिळवण्याची वेळ आहे. हे वय आणि ही वेळ पैसे कमावण्याचं आणि जीवनात पुढे जाण्याचं आहे. तर जेवढ्या चांगल्या गोष्टी होतील, तेवढ्या लवकर आम्ही

# सलमान खानसोबत रोमान्स करणार साऊथची लेडी



तमिळ चित्रपट सृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री नयनतारा, ही चित्रपट निर्माते वामशी पैडिपल्ली यांच्या आगामी चित्रपटात अभिनेता सलमान खानसोबत झळकणार आहे. यासंदर्भातील अधिकृत घोषणा चित्रपटाच्या निर्मात्यांनी बुधवारी केली. या अ?क्शन-ड्रामा चित्रपटाची निर्मिती निर्माते दिल राजू यांच्या 'श्री व्यंकटेश्वरा क्रिएशन्स' या बॅनरखाली करण्यात येत आहे. या चित्रपटाच्या चित्रीकरणाला या महिन्याच्या अखेरीस सुरुवात होणार आहे. नयनताराची ओळख ही लेडी सूपरस्टार अशी आहे. नयनतारा हे दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील अत्यंत नावाजलेल्या नावांपैकी एक आहे. तिने अनेक तमिळ, तेलुगू आणि मल्याळम चित्रपटांमध्ये मुख्य भूमिका साकारल्या आहेत. तिच्या काही गाजलेल्या चित्रपटांमध्ये 'चंद्रमुखी', 'गजनी', 'बिल्ला', 'राजा राणी', 'नानम राउडी धान' आणि 'विश्वासम' यांचा समावेश होतो. तिने २०२३ मधील ब्लॉकबस्टर चित्रपट 'जवान' द्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या चित्रपटात तिने शाहरुख खानसोबत काम केले होते. जागतिक बॉक्स ऑफिसवर १,००० कोटींहून अधिक कमाई करणाऱ्या या चित्रपटाचे दिग्दर्शन ॲटली यांनी केले होते.

पैडिपल्ली हे 'येवडू', 'ऊपिरी', 'महर्षी' आणि 'वारिसू' यांसारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांसाठी ओळखले जातात. सलमान खान आपल्याला आगामी चित्रपट 'मातृभूमी' मध्ये दिसणार आहे. या चित्रपटाचे पूर्वीचे शीर्षक 'बॅटल ऑफ गलवान' असे होते. हा चित्रपट भारत आणि चीन यांच्यात २०२० मध्ये झालेल्या गलवान खोऱ्यातील संघर्षावर आधारित आहे. याचे दिग्दर्शन 'शूटआउट ?ट लोखंडवाला' या चित्रपटासाठी प्रसिद्ध असलेल्या अपूर्व लाखिया यांनी केले आहे.

# लोकप्रिय अभिनेत्याचे १२ वर्षांनी कमबॅक



'तू तिथे मी' या मालिकेतील सत्यजित अर्थात अभिनेता चिन्मय मांडेकर १२ वर्षांनी पुन्हा परतणार आहे. या मालिकेचा चाहतावर्ग खूप मोठ्या प्रमाणात होता. यातील मंजिरीची भूमिका लोकप्रिय अभिनेत्री मृणाल दुसानिस साकारली होती. आता सत्यजितला पुन्हा एकदा नव्या मालिकेत पाहण्यासाठी प्रेक्षक प्रचंड उत्सुक आहेत. हा सत्यजित 'झी मराठी'च्या 'सनई चौघडे' मालिकेत एन्ट्री घेणार आहे.

'अगदी योग्य मुहूर्तावर होणार सत्यजितची दणक्यात एन्ट्री!' असं कॅप्शन या पोस्टला झी मराठीने दिलं आहे.

मात्र, यामध्ये चिन्मय मांडलेकरचा पूर्ण चेहरा अद्याप रिव्हिल करण्यात आलेला नाही.

पण, या व्हिडीओमध्ये त्याची लहानशी झलक पाहायला मिळाल्याने प्रेक्षकांनी आपल्या लाडक्या सत्यजितला अगदी अचूक ओळखलं आहे. या व्हिडीओमध्ये चिन्मय मांडलेकर एकदम डॅशिंग लूकमध्ये एन्ट्री घेताना दिसत आहे. तो 'सनई चौघडे' मालिकेत पुन्हा एकदा सत्यजित ही भूमिका साकारणार आहे. नेटकऱ्यांनी या प्रोमोवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. चिन्मय मांडलेकरचं कमबॅक पाहून चाहत्यांनीही आनंद व्यक्त केला आहे. सध्या या मालिकेत शर्वरी नव्या नोकरीच्या शोधात असल्याचं पाहायला मिळतं आहे. आता शर्वरीचा नवा बॉस सत्यजित असणार का? हे लवकरच स्पष्ट होईल.

# 'भाभीजी घर पर है' टीव्ही शो बंद होणार



छोटया पडद्यावरील प्रसिद्ध टीव्ही शो 'भाभीजी घर पर है' अखेर बंद होणार आहे. गेल्या ११ वर्षांपासून या शोला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. टीव्हीवरील शो बंद होत असला तरी हा शो एका ओटीटीवर दिसणार आहे, अशी माहित 'भाभीजी घर पर है' या शोमधील अंगुरी भाभीची भूमिका साकारणा?या शिल्पा शिंदे हिने एका प्रसारमाध्यमाशी बोलताना दिली आहे.

# 'रहमान डकैत' ते 'थेट शुक्राचार्य'

धुरंधर २ सिनेमानं जगभरात धूमाकूळ घातली आहे. धुरंधर २ सिनेमा प्रदर्शित झाल्यापासून सर्वत्र रणवीर सिंह आणि राकेश बेदी यांची जोरदार चर्चा होत आहे. मात्र, याआधी धुरंधर रिलीज झाल्यानंतर रहमान डकैत अर्थात अक्षय खन्नाची चर्चा जोरदार रंगलेली. धुरंधर २ सिनेमा पाहिल्यानंतर अनेकांनी रहमान डकैतची आठवण काढली. धुरंधरमध्ये रहमान डकैतची भूमिका साकारलेल्या अभिनेता अक्षय खन्नानं आपल्या दमदार अभिनयानं प्रेक्षकांच्या मनावर एक वेगळीच छाप पाडलीय. पण, धुरंधर सिनेमात अक्षय खन्नाचा मृत्यू झाल्याचं दाखवलंय आणि सिनेमाच्या पटकथेतलं त्याचं पात्र तिथेच संपलं.

मात्र, आता अक्षय खन्ना पुन्हा एका नव्या दमदार भूमिकेतून प्रेक्षकांची मने जिंकण्यासाठी सज्ज झाला आहे. लवकरच अक्षय खन्ना एका नव्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच



अभिनेता अक्षय खन्नाचा ५१ वा वाढदिवस पार पडला. त्यानिमित्तानं अक्षयच्या आगामी सिनेमातला त्याचा लूक सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. अक्षयचा हा लूक एका तेलुगू सिनेमातला असून बॉलिवूड गाजवणारा अभिनेता अक्षय खन्ना आता साऊथ इंडस्ट्रीत झळकणार आहे. अक्षयचा हा लूक रहमान 'रहमान डकैत'च्या भूमिकेपेक्षा पूर्णपणे वेगळा असून 'महाकाली' या आगामी सिनेमात दिग्दर्शक प्रशांत वर्मांच्या सिनेमॅटिक युनिव्हर्सचा भाग आहे. काही दिवसांपूर्वी या सिनेमाचं पोस्टर रिलीज करण्यात आलं होतं, ज्यात अक्षय खन्नाचा हटके लूक पाहायला मिळाला. दिग्दर्शकानं आता सेटवरील एक ँऊए फोटो शेअर केला आहे. यामध्ये अभिनेता अक्षय खन्ना गुरू शुक्राचार्यांच्या वेशात दिसत असून लांब पांढरे केस, दाढी, तीक्ष्ण आणि तेजस्वी डोळ्यांसह अक्षयचा हा लूक पाहून अभिनेत्याला या भूमिकेत पाहण्यासाठी चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे.

# 'छावा २' प्रेक्षकांच्या भेटीला येणार ?

बॉलिवूडमध्ये गाजलेला आणि प्रेक्षकांची मनं जिंकणारा २०२५ मधील छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनगाथेवर आधारित असणारा छावा सिनेमा बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित आणि विक्की कौशल स्टारर 'छावा' सिनेमा आपल्या धमाकेदार यशानंतर पुन्हा एकदा ही जोडी इतिहास घडवण्यासाठी एकत्र येणार असल्याची चर्चा होत आहे. छावा सिनेमानं प्रदर्शनानंतर बॉक्स ऑफिसवर तब्बल ८०७ कोटींची दमदार कमाई केली. या विक्रमी यशानंतर आता छावा सिनेमाचे निर्माते लवकरच छावा २ प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येण्यासाठी सज्ज झाले आहेत. मराठा साम्राज्यातील आणखी एका महान व्यक्तिमत्त्वाची कथा या पुढील भागात दाखवली जाणार असल्याच्या चर्चा जोरदार रंगल्या आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार लक्ष्मण उतेकर आणि विक्की कौशल 'छावा' चा सिक्वेल बनवण्याच्या तयारीत असून 'छावा'मध्ये संभाजी महाराजांच्या शौर्याची कथा दाखवण्यात आली होती, तर या सिनेमाच्या सीक्वेलमध्ये त्यांचे सुपुत्र 'शाहू महाराज' यांच्या जीवनावर आणि त्यांच्या संघर्षांवर आधारित कथा मांडली जाणार असल्याची माहिती आहे. विक्की कौशलनं या कथेबद्दल विशेष रस दाखवला असून तो पुन्हा एकदा दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांच्या दिग्दर्शनाखाली काम करण्यास उत्सुक आहे. सध्या हा प्रोजेक्ट सुरुवातीच्या टप्प्यात असून सर्व काही सुरळीत झालं, तर पुढच्या वर्षी किंवा २०२८ च्या सुरुवातीला या सिनेमाचं शुटिंग सुरू होण्याची शक्यता आहे.

या नव्या सिनेमाची चर्चा सुरु असली तरी विक्की आणि लक्ष्मण उतेकर सध्या त्यांच्या इतर प्रोजेक्ट्समध्ये व्यस्त असून लक्ष्मण उतेकर सध्या 'ईथा' या सिनेमाच्या दिग्दर्शनात गुंतले असून त्यात श्रद्धा कपूर मुख्य भूमिकेत आहे. हा सिनेमा पूर्ण केल्यानंतरच ते शाहू महाराजांच्या कथेची तयारी सुरु करणार आहेत.

तर विक्की कौशलही खूप व्यस्त असून सध्या विक्की संजय लीला भन्साळींच्या 'लव्ह अँड वॉर' या सिनेमाचं शूटिंग करत असून त्यानंतर भगवान परशुरामांवर आधारित 'महावतार' या मोठ्या प्रोजेक्टसाठी तयारी करणार आहेत. पण, या नव्या सिनेमाबाबत विक्की कौशल किंवा लक्ष्मण उतेकर यांच्याकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

# महिलांना नसतो हृदयविकाराचा धोका ?



हृदयविकाराचा झटका हा आजच्या काळातील सर्वात धोकादायक आणि सामान्य आजारांपैकी आहे. जेव्हा हृदयाकडे होणारा रक्तप्रवाह थांबतो. तेव्हा हृदयविकाराचा झटका येतो. शरीरातील कोलेस्ट्रॉलचं प्रमाण वाढल्यानं हृदयविकाराची समस्या उद्भवते.

हृदयविकाराच्या झटक्याचं नेमकं कारण काय?


वाढतं कोलेस्ट्रॉल, मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, अनुवांशिक घटक, तंबाखू आणि मद्यपान, अतिरिक्त ताण आणि हृदयाचे जुनाट आजार यांसारख्या गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यास हृदयविकाराच्या झटक्याचा धोका वाढतो.

महिलांपेक्षा पुरुषांना हृदयविकाराचा धोका जास्त

हृदयविकाराचा झटका हा आजार सामान्य झाला असला तरी पुरुष आणि स्त्रियांमध्ये हृदयविकाराचा झटका येण्याच्या प्रमाणात मोठा फरक आढळतो. हा आजार पुरुष आणि स्त्रियांसाठीही धोकादायक आहे, परंतु आकडेवारीनुसार पुरुषांना हृदयविकाराचा जास्त धोका असतो. पुरुषांमध्ये पहिल्या हृदयविकाराच्या झटक्याचे सरासरी वय सुमारे ६५ वर्षे असते, तर स्त्रियांमध्ये ते सुमारे ७२ वर्षे असते. याचा अर्थ असा की, स्त्रियांमध्ये हा धोका पुरुषांपेक्षा अंदाजे १० वर्षांनी उशिरा वाढतो. तज्ज्ञांच्या मते, महिलांना हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका कमी असतो, ज्याचं मुख्य कारण इस्ट्रोजेन हे असू शकते. जरी हे पूर्णपणे सिद्ध झाले नसले तरी, असे मानले जाते की यामुळे हृदयाच्या आरोग्याचे रक्षण होण्यास मदत होते. तर दुसरीकडे, पुरुष जास्त प्रमाणात तंबाखू आणि मद्यपान करतात, जे हृदयविकाराचे प्रमुख कारण आहेत. , पुरुषांमध्ये तणाव व्यवस्थापनाची क्षमता महिलांपेक्षा कमी असते असे मानले जाते. सततचा ताण आणि मानसिक दबावाचा हृदयावर नकारात्मक परिणाम होतो, ज्यामुळे हृदयविकाराच्या झटक्याचा धोका वाढण्याची शक्यता असते.

हे समजून घेणं महत्त्वाचं फार महत्वाचं आहे की, योग्य ती काळजी घेतल्यास हृदयविकाराचा झटका पूर्णपणे टाळता येतो. त्यामुळे नियमित आरोग्य तपासणी करणं आणि रक्तातील साखर, कोलेस्ट्रॉल व रक्तदाब नियंत्रणात ठेवणं अत्यंत महत्त्वाचं आहे. याबरोबरच फळ, पालेभाज्या, मीठ आणि साखर कमी असलेला आरोग्यदायी आहार घेणं आपल्या हृदयासाठी फायदेशीर ठरते.

# उशीरा जेवणाची सवय ठरते धोकादायक



आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत वेळेवर जेवण करणे अनेकांसाठी कठीण झाले आहे. कामाचा ताण, उशिरापर्यंत जागरण आणि बदललेली दिनचर्या यामुळे अनेकजण रात्री उशिरा जेवतात. मात्र आयुर्वेदानुसार ही सवय आरोग्यासाठी घातक ठरू शकते. योग्य वेळी अन्न न घेतल्यास पचनक्रिया बिघडते आणि अनेक आजारांना आमंत्रण मिळते. आयुर्वेदात पचनशक्तीला 'अग्नी' असे म्हटले जाते. सूर्य उगवल्यानंतर आणि दिवसभरात ही पचनशक्ती सर्वाधिक सक्रिय असते. त्यामुळे दिवसाच्या वेळेत घेतलेले अन्न सहज पचते. मात्र सूर्यास्तानंतर शरीराची पचनशक्ती कमी होत जाते. अशा वेळी जड किंवा उशीरा घेतलेले अन्न नीट पचत नाही आणि शरीरात टॉक्सिन तयार होऊ लागतात. उशीरा जेवण केल्यामुळे झोपेवरही परिणाम होतो. अनेकांना रात्री नीट झोप लागत नाही किंवा झोपेची गुणवत्ता कमी होते. त्यामुळे सकाळी उठल्यावर शरीर थकलेले, सुस्त वाटते. दिवसभर ऊर्जा कमी जाणवते. ही समस्या दीर्घकाळ सुरू राहिल्यास मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. याशिवाय, उशीरा जेवणामुळे पचनसंस्थेवर ताण येतो. अन्न नीट पचत नसल्याने गॅस, अ?सिडिटी, बद्धकोष्ठता अशा समस्या निर्माण होतात. आतड्यांमध्ये टॉक्सिन साचल्यामुळे शरीराची नैसर्गिक प्रक्रिया बिघडते. परिणामी शरीराची ऊर्जा पातळी कमी होते आणि थकवा वाढतो.

आयुर्वेद तज्ज्ञांच्या मते, रात्रीचे जेवण शक्यतो सूर्यास्तानंतर ७ ते ८ वाजण्याच्या आत करावे. जेवण हलके, पचायला सोपे आणि कमी तेलकट असावे. यामुळे पचनक्रिया सुरळीत राहते आणि शरीरावर अतिरिक्त ताण येत नाही. जेवणानंतर लगेच झोपणे टाळावे. त्याऐवजी थोडे चालणे किंवा काही वेळ वज्रासन मध्ये बसणे फायदेशीर ठरते. यामुळे अन्न पचायला मदत होते आणि पोटाशी संबंधित तक्रारी कमी होतात.

आयुर्वेदानुसार दिवसाच्या वेळेत, सूर्यप्रकाशात अन्न घेणे अधिक योग्य मानले जाते. यामुळे शरीराला आवश्यक पोषण व्यवस्थित मिळते. संतुलित, हलके आणि योग्य वेळी घेतलेले अन्न हेच चांगल्या आरोग्याचे गमक आहे. एकंदरीत, उशीरा जेवणाची सवय केवळ पचनावरच नाही, तर झोप, ऊर्जा आणि मानसिक स्थितीवरही परिणाम करते.

त्यामुळे आरोग्य चांगले ठेवायचे असेल, तर वेळेवर आणि योग्य पद्धतीने जेवणे अत्यंत गरजेचे आहे.

# दुपारी वामकुक्षी घेण्याचे फायदे



सकाळची कामे आवरल्या नंतर गृहिणींना दुपारी थोडा वेळ वामकुक्षी घेतात. पण आता प्रश्न असा आहे की, दुपारी डुलकी घ्यावी की नाही? खरं तर, तुम्ही किती वेळ आणि केव्हा झोपता यावर अवलंबून, दुपारची छोटी डुलकी फायदेशीर आणि हानिकारक दोन्ही असू शकते. तुम्ही डुलकी घ्यावी की नाही? दिवसा घेतलेली छोटी डुलकी शरीराला ताजेतवाने करते. जर तुम्हाला सकाळी थकवा किंवा कामाचा ताण जाणवत असेल, तर १५ ते २० मिनिटांची डुलकी शरीराला ऊर्जावान ठेवण्यास मदत करू शकते. दुपारची डुलकी एकाग्रता वाढवते आणि सुस्ती दूर करते, ज्यामुळे तुम्हाला संध्याकाळी अधिक उत्साही वाटते. तसेच दुपारची थोड्या वेळाची डुलकी आपल्या मेंदूसाठी अधिक उत्तम मानली जाते. यामुळे आपली स्मरणशक्ती सुधारते आणि सर्जनशीलता वाढते.

दुपारचे झोपण्यामुळे आपल्या मनावर आणि शरीरावर येणारा तणाव कमी होतो आणि मनःस्थिती देखील सुधारते. काही संशोधनानुसार, नियमितपणे आणि योग्य वेळी छोटी डुलकी घेणे हृदयाच्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर ठरू शकते. यामुळे शारीरिक आणि बौद्धिक कार्यक्षमता सुधारते, परिणामी कामाची कार्यक्षमता वाढते.

दुपारची छोटी डुलकी मेंदूला आराम देण्यास मदत करू शकते, ज्यामुळे केवळ स्मरणशक्तीच तीक्ष्ण होत नाही तर एकाग्रता देखील सुधारते. दुपारी १-२ तास झोपल्याने रात्रीच्या झोपेवर परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे निद्रानाश किंवा सकाळी सुस्ती येण्यासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे, जास्त वेळ झोपणे हानिकारक असू शकते. दुपारी जास्त वेळ झोपल्याने केवळ वजनच वाढत नाही, तर इन्सुलिनच्या कार्यावरही परिणाम होऊ शकतो. या समस्या टाळण्यासाठी, दुपारी जास्त वेळ झोपणे टाळावे.

# 'पोटाची चरबी कमी करायची आहे?



उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये वाढत्या तापमानामुळे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होतात. शरीरात पाण्याची कमतरता, पचन बिघडणं, थकवा आणि उष्माघात यांसारख्या तक्रारी वाढतात. त्यामुळे या काळात योग्य आहार घेणं खूप गरजेचं असतं. अशा वेळी साधा आणि सहज उपलब्ध होणारा दोडका हा आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर पर्याय ठरतो. दोडक्यामध्ये पाण्याचं प्रमाण खूप जास्त असतं. त्यामुळे तो शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करतो. उन्हाळ्यात घामामुळे शरीरातील पाणी कमी होतं, पण दोडका खाल्ल्याने ही कमतरता भरून निघते. त्यामुळे शरीर आतून थंड राहतं आणि उष्माघाताचा धोका कमी होतो. पोषणमूल्यांच्या दृष्टीने पाहिलं तर दोडक्यामध्ये फायबर, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, लोह, कॅल्शियम आणि पोटॅशियम यांसारखे आवश्यक घटक भरपूर प्रमाणात आढळतात. हे घटक पचनक्रिया सुधारण्यास मदत करतात. त्यामुळे बद्धकोष्ठता, गॅस, अपचन यांसारख्या समस्या कमी होतात. दोडका हलका आणि पचायला सोपा असल्यामुळे तो लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी योग्य आहे.

वजन कमी करण्यासाठीही दोडका उपयुक्त मानला जातो. यामध्ये कॅलरीज कमी आणि फायबर जास्त असल्यामुळे पोट लवकर भरल्यासारखं वाटतं. त्यामुळे अनावश्यक खाणं टाळलं जातं आणि वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. पोटावरील चरबी कमी करण्यासाठीही हा भाजीपाला फायदेशीर ठरतो.हआयुर्वेदानुसार, दोडका शरीरातील पित्त दोष कमी करण्यास मदत करतो.


उन्हाळ्यात पित्त वाढल्यामुळे शरीरात उष्णता वाढते आणि पचनावर परिणाम होतो.

अशा वेळी दोडक्याचा आहारात समावेश केल्यास शरीराला थंडावा मिळतो. तसेच खोकला, ताप, श्वसनाचे त्रास आणि पोटातील जंत यांवरही तो उपयोगी ठरतो. त्वचेसाठीही दोडका लाभदायक आहे. उन्हाळ्यात त्वचेवर पुरळ, खाज किंवा रॅशेस येण्याची शक्यता असते. दोडक्यातील अँटीऑक्सिडंट्स त्वचेचं संरक्षण करतात आणि त्वचा निरोगी व तजेलदार ठेवण्यास मदत करतात.

दोडका बनवणं खूप सोपं आहे. तो चण्याच्या डाळीसोबत, बटाट्यासोबत किंवा साध्या फोडणीत शिजवता येतो. काही लोक तो दह्यासोबतही खातात, ज्यामुळे त्याचा थंडावा अधिक वाढतो. दुपारच्या किंवा रात्रीच्या जेवणात तो सहज समाविष्ट करता येतो. एकूणच, दोडका ही स्वस्त, सहज उपलब्ध आणि अत्यंत पौष्टिक भाजी आहे. उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी, पचन सुधारण्यासाठी आणि वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी दोडक्याचा आहारात नक्की समावेश करावा.

# 'या' छोट्या चुका मेंदू कमकुवत करताय

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत आपण शरीराच्या फिटनेसकडे लक्ष देतो, पण मेंदूच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष करतो. तज्ज्ञांच्या मते, आपल्या काही रोजच्या सवयी हळूहळू मेंदूवर वाईट परिणाम करत असतात. या सवयी 'सायलेंट किलर'सारख्या काम करून स्मरणशक्ती आणि विचार करण्याची क्षमता कमी करू शकतात. सर्वात मोठी चूक म्हणजे अपुरी झोप. झोप ही मेंदूसाठी खूप महत्त्वाची असते. झोपेत असताना मेंदू स्वतःची दुरुस्ती करतो आणि दिवसभरात शिकलेल्या गोष्टी व्यवस्थित साठवतो. पण जर सतत कमी झोप घेतली, तर मेंदूला पुरेसा आराम मिळत नाही. यामुळे स्मरणशक्ती कमी होणे, लक्ष न लागणे आणि नवीन गोष्टी शिकण्यात अडचणी येऊ लागतात.



दुसरी मोठी समस्या म्हणजे जास्त गोड खाण्याची सवय. जास्त साखर खाल्ल्यामुळे शरीरात आणि मेंदूत सूज (इन्फ्लेमेशन) वाढू शकते. दीर्घकाळ असेच चालू राहिल्यास विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता कमी होऊ शकते. त्यामुळे गोड पदार्थांचे सेवन मर्यादित ठेवणे गरजेचे आहे.

धूम्रपान आणि मद्यपान या सवयी देखील मेंदूसाठी अत्यंत घातक आहेत. सिगारेटमधील हानिकारक घटक मेंदूपर्यंत पोहोचणाऱ्या ऑक्सिजनची मात्रा कमी करतात. यामुळे मेंदूच्या पेशींना नुकसान होते. तसेच जास्त प्रमाणात मद्यपान केल्यास न्यूरॉन्स कमकुवत होतात आणि निर्णयक्षमता बिघडते. शारीरिक हालचालींचा अभाव हीदेखील एक गंभीर समस्या आहे. दिवसभर एका ठिकाणी बसून राहिल्याने मेंदूकडे जाणारा रक्तप्रवाह कमी होतो. यामुळे मेंदूला आवश्यक पोषण आणि ऑक्सिजन मिळत नाही. त्यामुळे मेंदूची कार्यक्षमता कमी होते. दररोज किमान ३० मिनिटे चालणे किंवा हलका व्यायाम करणे मेंदूसाठी फायदेशीर ठरते.

तणाव हा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. सतत तणावात राहिल्याने शरीरात 'कॉर्टिसोल' नावाचा हार्मोन वाढतो. हा हार्मोन मेंदूच्या स्मरणशक्तीशी संबंधित भागावर परिणाम करतो. यामुळे चिडचिड, थकवा आणि मानसिक ताण वाढतो. त्यामुळे तणाव कमी ठेवण्यासाठी ध्यान, योग किंवा आवडीच्या गोष्टी करणे आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात स्क्रीन टाइम खूप वाढला आहे. झोपण्यापूर्वी मोबाईल किंवा लॅपटॉप वापरण्याची सवय झोपेच्या गुणवत्तेला बाधा आणते. स्क्रीनमधून निघणारी निळी प्रकाश किरणे मेंदूला सतत जागृत ठेवतात, ज्यामुळे मेंदूला पूर्ण विश्रांती मिळत नाही. परिणामी एकाग्रता आणि स्मरणशक्तीवर परिणाम होतो. या सर्व सवयी वेळेत बदलल्यास मेंदूचे आरोग्य सुधारता येऊ शकते. योग्य झोप, संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि तणावमुक्त जीवनशैली यामुळे मेंदू तंदुरुस्त राहतो.

# भारतातल्या महिलांना लवकर सुरू होतोय मेनोपॉज



मेनोपॉज म्हणजे महिलांच्या रजोनिवृत्तीचा काळ. मासिक पाळी सुरू होण्याचा काळ जसं प्रत्येक मुलीच्या शारिरीक आणि मानसिक आरोग्यात खूप बदल घडवून आणणारा असतो, तसाच मासिक पाळी जाण्याचा म्हणजेच मेनोपॉज किंवा रजोनिवृत्तीचा काळही महिलांच्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाचा असतो. आतापर्यंत रजोनिवृत्तीचं वय साधारण पन्नाशीच्या नंतर असायचं. त्यानंतरच महिलांची पाळी बंद व्हायची. पण आता मात्र मागच्या काही वर्षांपासून भारतीय महिलांचं रजोनिवृत्तीचं वय अलिकडे आलं असून पंचेचाळिशीनंतरच कित्येकींची पाळी बंद होत आहे.

नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे यांच्या आकडेवारीनुसार जवळपास १६ टक्के महिलांना ४० ते ४४ या वयातच मेनोपॉज सुरू झाला होता. त्याची अनेक कारणंही आहेत.

व्यायाम, डाएट करूनही वजन कमी का होत नाही? पाहा ३ कारणं- बघा काय करायचे उपाय.

तणाव, जीवनशैलीमध्ये झालेला बदल, शारिरीक ताण, मद्यपान किंवा धुम्रपान यासारख्या सवयी, पचनक्रिया किंवा चयापचय क्रियेसंबंधी असणारे आजार, थायरॉईड अशी अनेक कारणं यामागे असू शकतात, असं तज्ज्ञ सांगतात.

# ना तासभर, ना अर्धा तास रोज फक्त २ मिनिटे करा प्लँक

जे लोक जिममध्ये जातात त्यांना गाइड करण्यासाठी तिथे ट्रेनर असतो, पण जे लोक घरीच व्यायाम करतात त्यांना अनेकदा प्रश्न पडतो की, कोणता व्यायाम कशासाठी करावा? त्यामुळे आज आम्ही आपल्यासाठी २ मिनिटांच्या एका खास व्यायामाची माहिती घेऊन आलो आहोत. हा व्यायाम म्हणजे प्लँक. प्लँकने स्नायू मजबूत होतात. महत्वाची बाब म्हणजे हा व्यायाम करण्यासाठी आपल्याला फार जास्त मेहनत घ्यावी लागत नाही. कारण हा एक फार सोपा, कमी वेळ करता येणारा आणि घरीच करता येणारा व्यायाम आहे. पण याचे फायदे मात्र अनेक आहेत. तेच आपण जाणून घेणार आहोत.

प्लँकने पोटाचे स्नायू टार्गेट होतात. नियमितपणे प्लँकने ॲब्स टोन होतात, सोबतच पोटाच्या आतील स्नायू देखील मजबूत होतात. जर आपण डेस्ट जॉब करत असाल तर प्लँक आपल्यासाठी वरदान ठरू शकतो. याने मणक्यावर जास्त जोर टाकता कोर मजबूत होतो. ज्यामुळे पाठीच्या खालच्या भागात होणाऱ्या वेदना दूर होतात.रोज फक्त काही मिनिटे प्लँक केल्याने हाडं आणि जॉइंट्सची अलायन्मेंट सुधारते. रोज प्लँक केल्याने शरीराचं संतुलन योग्य राहतं. प्लँक एक्सरसाईनमध्ये आपल्या शरीराची हालचाल होत नाही. पण याने इतर कोणत्याही एक्सरसाईजपेक्षा जास्त कॅलरी बर्न होतात. तसेच याने आपला मेटाबॉलिक रेटही सुधारतो.

प्लँकने शरीराच्या मागच्या बाजूचे स्नायू जसे की, कॉलरबोन, कांधे आणि पोटऱ्यांमध्ये लवचिकता वाढते. हे अवयव आणखी मजबूत होतात.

तसेच प्लँक व्यायामाने कोअर मजबूत झाल्यामुळे कंबरदुखीचा त्रास कमी होण्यास मदत मिळते. प्लँक करताना शरीराला स्थिर ठेवण्यासाठी ताकद आणि सहनशक्ती वाढते. लठ्ठपणा किंवा पोट वाढण्याची समस्या अनेकांना असते. जर नियमितपणे प्लँक कराल तर बाहेर आलेलं पोट आत जाईल आणि आपण स्लीम फिट दिसाल.

प्लँकची सुरूवात करत असाल तर कमी वेळ म्हणजे २ ते ३ मिनिटे ठेवा. नंतर हळूहळू सवय होईल, सहनशक्ती वाढेल आणि आत्मविश्वास वाढेल तेव्हा वेळ वाढवत रहा. एकाचवेळी जास्त वेळ व्यायाम करू नका.

# सकाळी उठल्यानंतर ब्रश न करता पाणी प्यायल्याने काय होते?

सकाळी उठल्यानंतर तोंड न धुता पाणी पिणं ही आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर सवय मानली जाते. यामुळे शरीराला बरेच फायदे मिळतात. रात्री झोपेत आपल्या तोंडात लाळ तयार होते. यात पाचक एन्जाईम्स असतात. पाणी प्यायल्यानं ही लाळ पोटात जाते आणि पचनक्रिया सुधारते.शरीरातील विषारी पदार्थ बाहेर निघण्यास मदत होते. ज्यामुळे रक्त शुद्ध होते आणि शरीर नैसर्गिकरित्या डिटॉक्स होण्यास मदत होते.

ज्यांना बद्धकोष्टतेचा किंवा गॅसचा त्रास आहे त्यांच्यासाठी हे रामबाण औषध आहे. यामुळे सकाळी पोट साफ होण्यास मदत होते.

रक्ताभिसरण सुधारल्यामुळे चेहऱ्यावरील पिंपल्स कमी होतात आणि त्वचा तजेलदार आणि निरोगी दिसते.लाळेतील नैसर्गिक बॅक्टेरियाज शरीराची इम्युनिटी वाढवतात. ज्यामुळे आजारांशी लढण्यास मदत होते.सकाळी रिकाम्यापोटी पाणी प्यायल्यानं शरीराचा मेटाबॉलिझ्म रेट वाढतो. ज्यामुळे कॅलरीज लवकर जळतात आणि डोकेदुखीचा त्रास कमी होतो.

